जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार २६ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०



ना कुणी मोठा, ना कुणी लहान, संविधानाने दिला, प्रत्येकाला समान सन्मान ! संविधान हा केवळ कायद्यांचा दस्ताऐवज नाही, तर प्रत्येक भारतीयाच्या स्वाभिमानाचा आधार आहे.

सर्व भारतीयांना संविधान दिनाच्या मंगलमय शुभेच्छा!

टाटा मोटर्सच्या जमशेदपूर प्लांटचे उत्पादन बंद !

जमशेदपूर / वृत्तसंस्था- टाटा मोटर्सच्या जमशेदपूर येथील प्लांटमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाने बुधवारी सकाळी अत्यंत उग्र रूप धारण केले. आंदोलकांनी प्लांटचे सर्व प्रवेशद्वार पूर्णपणे रोखून धरल्याने 'ए' आणि 'जनरल' शिफ्टमधील एकाही कामगार किंवा अधिका-याला कंपनीत प्रवेश मिळाला नाही. परिणामी, सुमारे ५,००० कामगार आणि अधिका-यांना कामावर न जाताच घरी परतावे लागले. या कोंडीमुळे कंपनीच्या उत्पादनाला मोठा फटका बसला असून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. टाटा मोटर्सच्या इंजिन डिव्हिजनमध्ये कार्यरत असलेले कर्मचारी सुबोध पात्रो हे काही दिवसांपूर्वी कंपनीतील एका अपघातात जखमी झाले होते. सुबोध यांचे पुत्र सहदेव पात्रो यांनी आरोप केला आहे की, कंपनी व्यवस्थापनाने हा अपघात 'इंज्युरी ऑन ➪(पान २ वर)



भर दिवसाढवळ्या पुणे कोर्टाबाहेर आरोपीवर हल्ला

४ दिवसापूर्वीच जामीन, ५ जण दुचाकीवरून आली अन् काटा काढला





पुणे/प्रतिनिधी- पुणे कोर्ट गेट क्रमांक ४ बाहेर धक्कादायक घटना घडली. या घटनेने एकच खळबळ उडाली. गेल्या काही दिवसांपासून पुणे कोर्टाला बॉम्बने उडवण्याची धमकी दिली जात होती. त्यातच पुणे कोर्टाबाहेर कोणीही ज्याचा विचार केला नाही, अशी घटना घडली. पोलिस स्टेशन, कोर्ट अशाठिकाणी कोणावर हल्ला होईल, याचा विचारही कोणी करू शकत नाही, पण पुणे कोर्टाबाहेर हे घडले. एका हत्या प्रकरणातील आरोपी असलेल्या व्यक्तीवर पुणे कोर्टाबाहेर पाच ते सहा जणांनी हल्ला केला. पहिल्यांदाच त्याच्यावर गोळीबार करण्यात आला. पण निशाणा चुकला. त्यानंतर हल्लेखोरांनी थेट या व्यक्तीवर कोयत्याने सपासप वार केले. पुणे कोर्ट म्हणजे वर्दळीचे ठिकाण आहे. तिथे हा हल्ला करण्यात आला. हल्लेखोरांनी या हल्ल्यानंतर पळ काढला.

हेच नाही तर बंदूक घटनास्थळीच फेकून देत हल्लेखोर पळून गेले. या गोळीबारानंतर हा व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. हा व्यक्ती एका हत्या प्रकरणातील आरोपी होता. शुभम चव्हाण हत्या प्रकरणातील हा व्यक्ती आरोपी होता. तो पुणे कोर्टात आला होता. घटनेची माहिती मिळताच पुणे पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तोपर्यंत उशीरा झाला होता. आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. यादरम्यान प्रत्यक्षदर्शींनी मोठा दावा केला आहे, आम्ही तात्काळ १००, १०८ नंबरवर फोन केले पण एकही फोन लागला नसल्याचा दावा प्रत्यदर्शींकडून करण्यात आला. आता या घटनेचा पूर्ण सीसीटीव्हीही पुढे आला आहे. हा व्यक्ती हा कात्रजचा राहणारा असल्याची माहिती मिळत आहे. त्याचे नाव मंदार किवळे असल्याचे कळत आहे. हल्लेखोरांचा नेम चुकल्यानंतर त्यांनी मंदारवर कोयत्याने अनेक वार केले. पुणे कोर्ट गेट नंबर ४ वर ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच वकिलांसह कोर्टात उपस्थित असलेल्या लोकांनी धाव घेतली. मंदार किवळे याने शुभम चव्हाण याची हत्या केली होती. २० एप्रिल २०२५ मध्ये कात्रजमध्ये शुभम चव्हाण याची हत्या मंदार याने केली होती.

दिसला की तोडला, टार्गेट ऑन दी स्पॉट!

पुण्यात मंदार किवळेला मारण्यासाठी वर्षभरापूर्वीच प्लॅन

पुण्यात शुभम चव्हाण हत्या प्रकरणातील आरोपी मंदार किवळे याच्यावर कोयत्याने सपासप वार करण्यात आले. त्याच्यावर एकूण सहा जणांनी हल्ला केला. या घटनेचे हादरवून टाकणारे व्हिडीओ समोर आले आहेत. दिसला की तोडला, टार्गेट ऑन दी स्पॉट! पुण्यात मंदार किवळेला मारण्यासाठी वर्षभरापूर्वीचषडरत्नरंजित हल्ल्याचा प्लॅन समोर! या हल्ल्यामध्ये मंदार किवळे रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसतेय. हल्ला एवढा निर्घृण होता की यात त्याचे दोन्ही हात तुटून लटकत असल्याचे दिसते. शुभम चव्हाण याच्या हल्ल्याला एक वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी चव्हाण यांचे सहकारी यांनी या आधीच प्लॅन बनवायला सुरुवात केली होती. शुभमच्या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी त्यांनी त्याच्या मारेकऱ्यांना संपवण्याचा डाव आखला.या प्रकरणात आरोपी असलेला मंदार किवळे हा चार ते पाच दिवसांपूर्वी जामीनावर तुरुंगातून बाहेर आला होता. किवळे हा बाहेर आल्या असल्याची माहिती आरोपींना मिळाली होती. त्यानुसार त्याच्यावर एक ते देऊन दिवसांपासून आरोपींनी 'ट्रॅप' लावला होता. किवळे हा न्यायालीन कामकाजासाठी आज शिवाजीनगर भागातील जात असताना दबा धरलेल्या आरोपींनी त्याच्यावर गोळीबार करत कोयत्याने वार केले.



कायद्याचा धाक संपला! विरोधकांकडून टीका

पुणे / प्रतिनिधी- न्यायालयातील चेंबर क्रमांक ६३ बाहेर मंदार किवळे या व्यक्तीवर ६ जणांनी आधी बंदुकीने गोळीबार केला. त्यानंतर, त्याच्यावर सपासप कोयत्याने वार केले. यामध्ये तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. तो एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या शुभम सुभाष चव्हाण हत्या प्रकरणातील आरोपी असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणावरून आता विरोधकांनी सत्ताधा-यांना लक्ष्य केले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.



काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार या प्रकरणावर म्हणाले की, 'पुण्यात गुंडगिरीने आता सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. पुण्यात कोयता गँगची दहशत असतानाच आता थेट न्यायालय परिसरात गोळीबार आणि कोयत्याने हल्ले होत आहेत. गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही, हेच या घटनांमधून स्पष्ट होते. कधी गुन्हेगार हॉस्पिटलमधून पळून जातात, कधी त्यांच्या दहशतीच्या रील्स व्हायरल होतात, तर आता थेट न्यायालयाच्या परिसरात गोळीबार केला जातो. ज्या ठिकाणी न्याय मिळण्याची अपेक्षा असते, त्याच न्यायालयाच्या दारात कायद्याचे धिंडवडे निघत आहेत.' अशी टीका त्यांनी यावेळी केली आहे. 'गृहमंत्र्यांच्या भाषणांत कायदा-सुव्यवस्थेचे गोडवे आणि आकडेवारी चांगली दिसते. पण प्रत्यक्ष जमिनीवर कायदा-सुव्यवस्था काय आहे हे आज स्पष्ट झाले. प्रत्येक घटनेनंतर चौकशीचे आदेश आणि कारवाईची आश्वासने देऊन सरकारची जबाबदारी संपत नाही. या घटनेची जबाबदारी कोण घेणार? पोलिस यंत्रणेच्या भूमिकेची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे.' अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

कायदा-सुव्यवस्थेचे अक्षरशः तीनतेरा : सुप्रिया सुळे



पुण्याच्या कायदा-सुव्यवस्थेचे अक्षरशः तीनतेरा वाजले आहेत. जर न्यायालयासारख्या अतिसंवेदनशील ठिकाणीच नागरिक सुरक्षित नसतील, तर शहरातील इतर भागांत राहणा-या सर्वसामान्य जनतेच्या जीवाची हमी कोण घेणार? असा सवाल खासदार सुळे यांनी केला. पुणे पोलिस आयुक्तांनी आणि राज्याच्या गृहखात्याने या घटनेचे गांभीर्य ओळखून यातील सर्व गुन्हेगारांना तात्काळ अटक करावी आणि त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करावी.

गुंडांवर पोलिसांचा वचक राहिलाय का? : ठोंबरे

पुणे पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा सुरू आहे. गुंडांवर पोलिसांचा वचक किंवा काही धाक राहिलाय का? हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. घटनास्थळी बंदूक सापडली आहे. सहा लोक या प्रकरणात असल्याची माहिती आहे. कोयते हातात घेणारी अल्पवयीन मुलं वेगळी, आजची घटना ही गुन्हेगारीतून घडलेली आहे. आजची घटना ही टिपिकल गुन्हेगारी आहे. पोलिस यंत्रणा अंकुश ठेवण्यात कमी पडली आहे, असे रुपाली ठोंबरे-पाटील म्हणाल्या.

किवळे हल्लाप्रकरणात ६ आरोपींवर कारवाई



: पुण्यामधील घटनेने आज राज्यभर खळबळ उडाली आहे. या घटनेची चर्चा देशभर रंगली आहे. आधी गोळीबार नंतर कोयत्याचे वार करुन आरोपी फरार झाले. पण आता या पुणे प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पुण्यातील शिवाजीनगर कोर्ट परिसरात मंदार किवळे याच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत ६ जणांना ताब्यात➪(पान २ वर)

५०० कोटींच्या आरोपाप्रकरणी एसआयटीचे अधिकारी जरांगेंच्या घरी दाखल



पुणे/प्रतिनिधी- मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या ५०० कोटी रुपयांच्या आरोपप्रकरणी चौकशीला वेग आला आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीचे (विशेष तपास पथक) अधिकारी बुधवारी सायंकाळी ७.३० वाजता अंकुशनगर येथे मनोज जरांगे पाटील यांच्या निवासस्थानी दाखल झाले. जरांगे यांच्याकडे असलेले संबंधित ऑडिओ रेकॉर्डिंग तसेच अन्य पुरावे ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने हे पथक आल्याची माहिती आहे. पथकात ६ अधिकारी आहे. त्यांच्या आता चर्चा सुरु आहे.काही दिवसांपूर्वी जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन कथित ५०० कोटी रुपयांच्या व्यवहारासंदर्भातील ऑडिओ क्लिप सार्वजनिक केली होती. या ऑडिओ क्लिपमधील संभाषणावरून राज्याच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा केली होती. एसआयटीने या ऑडिओ क्लिपची सत्यता पडताळणे, त्यातील आवाजांची ओळख पटविणे तसेच रेकॉर्डिंगचा मूळ स्रोत शोधण्याच्या दृष्टीने तपास सुरू केला आहे. दरम्यान, एसआयटीचे अधिकारी थेट जरांगे पाटील यांच्या निवासस्थानी दाखल झाल्याने या तपासाला आता महत्त्व प्राप्त झाले आहे.

पाटील कुटुंबातील ६ जणांना कालव्यात फेकले

सुरत : महाराष्ट्रातील जळगाव येथील एका कुटुंबातील सहा सदस्यांना गुजरातमधील सुरत जिल्ह्यात कालव्यात फेकून देण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून, दोघे जण बेपत्ता आहेत, तर १३ वर्षांचा मुलगा सुदैवाने वाचला. तो पोहत बाहेर आल्यामुळेच या प्रकरणाचा उलगडा होण्यास मदत झाली, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. ही घटना २१ नोव्हेंबर रोजी सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यात घडली. प्राथमिक माहितीनुसार, हल्लेखोर हे पीडित कुटुंबाच्या ओळखीचेच होते, असे पोलिसांनी सांगितले.

गाडीने पाठलाग करुन अडवले- पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, पाटील कुटुंब काही कामानिमित्त सुरतला जात होते. यादरम्यान, दुसऱ्या गाडीतून त्यांचा पाठलाग करणाऱ्या चौघा जणांनी बारडोलीतील ➪(पान २ वर)

सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

सोनं ४ हजारांनी तर, चांदी १० हजारांनी स्वस्त

मुंबई/प्रतिनिधी- तुळशीचं लग्न झालं की, लग्नसराईची लगबग सुरु होते. लग्न म्हटलं की सोनं खरेदीआलंच. सोनं - चांदी खरेदीसाठी ग्राहकांची रांग सराफाच्या दुकानाबाहेर लागते. सोन्याचा भाव वाढला की, लोक सोनं खरेदी करताना थोडा विचार करतात. कारण सोन्याचे भाव गगनाला भिडले की, मग सोनं खरेदी करताना खिशाला कात्री बसते, एवढं मात्र नक्की. पण गेल्या काही दिवसांपासून ग्राहकांना दिलासा देणारा सोन्याचा भाव समोर येत आहे. सोने अन् चांदीच्या दरात पुन्हा मोठी घसरण झाली असल्याची माहिती आहे. सोन्याच्या दरात ४ हजार रुपयांची घसरण तर, चांदीच्या दरात १० हजार रुपयांची घसरण झाली आहे. सोने आणि चांदी दरात पुन्हा मोठी घसरण झाली असल्याची माहिती समोर आली



आहे. जळगावच्या सुवर्णनगरीत सोन्याच्या दरात घसरण झाली आहे. सोन्याच्या दरात ४ हजार रुपयांची घसरण झाली आहे. काल म्हणजेच २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सोन्याचे दर १२६००० रुपये इतके होते. तर, आज २५ नोव्हेंबर २०२६ रोजी दरात घसरण झाल्यानंतर सोन्याचे दर १२२००० रुपये इतके झाले आहे. केवळ सोन्याच्या दरात घसरण झाली नाही तर, चांदीच्या दरातही घसरण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चांदीच्या दरात १० हजार रुपयांची घसरण झाली आहे. काल म्हणजे २४ नोव्हेंबर २०२६ रोजी चांदीचे दर १५८००० रुपये इतके होते. तर, आज २५ नोव्हेंबर २०२६ रोजी चांदीचा दर १४८००० रुपयांवर पोहोचला आहे. घसरलेले दर पाहून नक्कीच ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. अमेरिकन फेडरल बँकाच्या व्याज दरात वाढ➪(पान २ वर)

राजस्थानात २४ जिल्हा परिषदांमध्ये काँग्रेसचा अध्यक्ष

मुख्यमंत्री शर्मांच्या जिल्ह्यात भाजप उमेदवाराचा पराभव

जयपूर/वृत्तसंस्था- राजस्थानमधील सर्व ३७ जिल्ह्यांत आज झालेल्या जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. या निवडणुकीत काँग्रेस पक्षानं मोठा विजय मिळवला आहे. भाजपला या निवडणुकांमध्ये मोठा फटका बसला आहे. काँग्रेसचे २४ जिल्हा परिषदेत अध्यक्ष विजयी झाले आहेत. तर भाजपचा अध्यक्ष १० जिल्हा परिषदांमध्ये झाला आहे. डीडवाना जिल्ह्यात भाजप आणि काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारांना समान मतं मिळाली. त्यानंतर चिठ्ठी टाकून अध्यक्ष निवडण्यात आला, हा कौल भाजपच्या बाजूनं गेला. भारत आदिवासी पक्षाने २ जिल्ह्यांत, तर राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्षाने १ जिल्ह्यात विजय मिळवला



राजस्थानात आज ३७ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाच्या निवडीचे निकाल जाहीर करण्यात आले आहे. काँग्रेसचे अध्यक्ष २४ जिल्हा परिषदांमध्ये झालेत तर भाजपला १० जागा मिळाल्या आहेत. २ जिल्ह्यात भारत आदिवासी पार्टी आणि एका जिल्ह्यात राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टीचा अध्यक्ष निवडून आला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीमध्ये मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांना त्यांच्या जिल्ह्यात धक्का बसला आहे. भरतपूरच्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत काँग्रेसच्या रेणू बाला विजयी झाल्या आहेत. काँग्रेसला १७ मतं मिळाली तर भाजपला १४ मतं मिळाली.

ब्यावर जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी भाजपकडे बहुमत असून देखील भाजपचा अध्यक्ष झालेला नाही. काँग्रेसच्या ममता गुर्जर यांचा क्रॉस वोटिंगमुळं विजय झाला आहे. ब्यावर जिल्हा परिषदेत भाजपकडे २७ पैकी १४ जिल्हा परिषद सदस्य होते. मात्र, त्यांचा पराभव झाला.

राजस्थानातील ३७ पैकी तीन जिल्हा परिषदेत काँग्रेसचे अध्यक्ष बिनविरोध निवडून आले. दौसा, सवाई माधवपूर आणि जैसलमेरमध्ये काँग्रेसनं बिनविरोध विजय मिळवला. जैसलमेरमध्ये २१ वर्षांच्या संतोष कुमारी यांची बिनविरोध➪(पान २ वर)

समुद्रात कोसळले विमान; दोन लहान मुलांसह सहा ठार

न्यूयॉर्क/ वृत्तसंस्था- अमेरिकेत एका विमानाचा भयंकर अपघात झाला. मिसिसिपीमधील एका बेटाजवळ हे विमान समुद्रात कोसळले. यात दोन लहान मुलांसह सहा जणांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तटरक्षक दलाने शोध आणि मदत मोहीम सुरू केली. समुद्रातून सहा जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. अमेरिकेच्या तटरक्षक दलाने विमान अपघातात सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे.अपघातानंतर विमानात मृत्यू झालेल्या सहा जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आणि त्यानंतर शोधकार्य थांबवण्यात आले. विमान समुद्रात कोसळले तेव्हा आतमध्ये ८ वर्षे आणि १० वर्षे वयाच्या दोन मुलांसह ४ इतर प्रवासी होते. हे सेसना सेंटुरियन विमान होते. मंगळवारी दुपारी त्याचा अपघात झाला. दुपारी ३.४५ वाजता अमेरिकेच्या तटरक्षक दलाला विमानाचा संपर्क तुटल्याची माहिती देण्यात आली.

माहीम परिसरात सोन्याच्या दुकानावर गोळीबार झाल्यानं खळबळ

मुंबई/प्रतिनिधी- पुण्यात गोळीबाराची घटना ताजी असतानाच आज मुंबईतील माहीम परिसरात देखील गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. पी सी जैन ज्वेलर्स नावाच्या सोन्याच्या दुकानावर गोळीबार झाला आहे. या घटनेमुळं खळबळ उडाली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेत सुदैवाने कोणीही जखमी नाही. या घटनेनंतर माहीम पोलीस पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

सोन्याच्या दुकानात गोळीबार झाल्याच्या घटनेनंतर परिसरात खळबळ- आज दुपारी पुण्यात देखील गोळीबाराची घटना घडली होती. यामध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे. त्यानंतर संध्याकाली ➪(पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

हिवरखेड-मोर्शी मार्गावर पल्सरच्या धडकेत ५५ वर्षीय व्यक्ती गंभीर

-सावजी रेस्टॉरंटसमोर अपघात; डोक्याला गंभीर दुखापत

मोर्शी/प्रतिनिधीः- घरी परतण्याच्या प्रवासात असलेल्या ५५ वर्षीय दुचाकीस्वाराला भरधाव पल्सरने दिलेल्या धडकेत गंभीर दुखापत झाली. हिवरखेड-मोर्शी मार्गावरील सावजी रेस्टॉरंट अँड बारसमोर १६ नोव्हेंबर रोजी दुपारी घडलेल्या या अपघातात विजय गुलाबराव लोखंडे (रा. हिवरखेड) जखमी झाले. त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांना पुढील उपचारांसाठी नागपूर येथे हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय लोखंडे हे मोळवण शिवारातून दुचाकीने आपल्या गावाकडे परतत होते. दुपारी सुमारे २.३० वाजता ते सावजी रेस्टॉरंटसमोर आले असता दुसऱ्या बाजूने येणाऱ्या पल्सर दुचाकीने त्यांच्या स्प्लेंडरला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता अधिक असल्याने लोखंडे यांना गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जखमी अवस्थेतील लोखंडे यांना उपचारासाठी नागपूर येथील गेटवेल रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या प्रकृतीबाबत कुटुंबीयांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पल्सरचालकाने वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालविल्यामुळे अपघात घडल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. जखमीचे पुत्र मिथिलेश लोखंडे यांनी या घटनेची तक्रार मोर्शी पोलिसांकडे केली. त्यानुसार पोलिसांनी पल्सरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.

सोलर प्लांटचे कुंपण कापून ५.५५ लाखांच्या केबलवर डल्ला

-तीन हजार मीटर केबल आणि ५८ हार्नेस सेट गायब

अमरावती/प्रतिनिधीः- सौरऊर्जा निर्मितीसाठी उभारण्यात आलेल्या प्लांटमध्ये सुरक्षा व्यवस्थेला चकवा देत अज्ञात चोरट्यांनी मोठी चोरी केली. धानोरा परिसरातील शेतशिवारात असलेल्या सोलर प्लांटचे मागील बाजूचे तारेचे कुंपण कापून चोरट्यांनी आत प्रवेश केला. त्यानंतर तब्बल तीन हजार मीटर केबल आणि ५८ केबल हार्नेस सेट असा एकूण ५ लाख ५५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना १९ ते २० नोव्हेंबरदरम्यान घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी रात्री ८ वाजेपर्यंतच्या कालावधीत चोरट्यांनी प्लांटमध्ये प्रवेश केला. यासाठी त्यांनी मागील बाजूचे तारेचे कंपाउंड कापल्याचे तक्रारीत नमूद आहे. आत प्रवेश केल्यानंतर सोलर पॅनलसाठी वापरण्यात येणारी जुनी केबल आणि जोडणीसाठी असलेले हार्नेस सेट चोरून नेण्यात आले. चोरीस गेलेल्या तीन हजार मीटर केबलची किंमत २ लाख २५ हजार रुपये आहे. तर ५८ केबल हार्नेस सेटची किंमत ३ लाख ३० हजार ६०० रुपये असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले. अशा प्रकारे कंपनीचे एकूण ५ लाख ५५ हजार ६०० रुपयांचे नुकसान झाले आहे. ही चोरी लक्षात आल्यानंतर कंपनीच्या वतीने पोलिसांत धाव घेण्यात आली. हेड रिफ्युअल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे कर्मचारी मनीष पारचा (वय ४०, रा. सुभाषनगर, विक्रोळी, मुंबई) यांनी लोणी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) आणि ३२४(४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. शेतशिवारातील प्लांटमध्ये प्रवेश करून एवढ्या मोठ्या प्रमाणात साहित्य नेण्यासाठी चोरट्यांनी कोणते साधन वापरले आणि चोरीचा माल कुठे विक्रीस नेला, याचा तपास लोणी पोलीस करीत आहेत.

घरातील पोत्यातून १.७२ लाखांची रोकड गायब

वृद्धाच्या घरात चोरी

अमरावती/प्रतिनिधीः-

घरातील मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कपड्यांच्या पोत्यातूनच रोख रक्कम गायब झाल्याचा प्रकार रासेगाव येथे उघडकीस आला आहे. महादेव शंकर नेमाडे (वय ८५) यांनी बँकेतून काढून आणलेली १ लाख ७२ हजार रुपयांची रक्कम घरात ठेवली होती. मात्र, कुटुंबीय शेतात गेले असताना अज्ञात व्यक्तीने घरात प्रवेश करून ही रोकड लंपास केल्याची तक्रार दाखल झाली आहे. ही घटना १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजताच्या दरम्यान घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. नेमाडे यांनी बँकेतून काढलेली रक्कम कपडे ठेवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिकच्या पोत्यात ठेवली होती. त्यानंतर घरातील सर्व सदस्य आपापल्या कामासाठी शेतात गेले. घरात कोणी नसल्याची संधी साधून चोरट्याने ही रक्कम चोरून नेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कुटुंबीय घरी परतल्यानंतर पोत्यातील पैसे गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. घरात शोधाशोध करूनही रोकड मिळाली नाही. अखेर महादेव नेमाडे यांनी पथ्रोट पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदविली.

वृद्धाने मोठ्या विश्वासाने घरात ठेवलेली आयुष्यभराच्या कष्टाची रक्कम चोरीला गेल्याने परिसरात चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, घरातील सर्व सदस्य बाहेर असण्याच्या वेळेतच ही घटना घडल्याने चोरट्याला घरातील परिस्थितीची माहिती होती का, याचाही तपास होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी पथ्रोट पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चोरीस गेलेली रक्कम आणि आरोपीचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्त्यात वाढ

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता लागू आहे. त्यांच्या या भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत शासकीय, शासन अनुदानित व खासगी विनाअनुदानित महाविद्यालयातील (अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) आरोग्य विज्ञान व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांना शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी EBC, SEBC, EWS या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील पात्र विद्यार्थ्यांना (भोजन, निवास व निर्वाह) खर्च भागविण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता देण्यात येतो. या भत्त्यात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून वाढ करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या शहरात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता ३२,०००, निवास भत्ता २०,०००, निर्वाह भत्ता ८,००० असा एकूण ६०,००० तर इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता २८,०००, निवास भत्ता १५,०००, निर्वाह भत्ता ८,००० असा एकूण ५१,००० इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता २५,०००, निवास भत्ता १२,०००, निर्वाह भत्ता ६,००० असा एकूण ४३,००० तर तालुका ठिकाणी उच्च घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता २३,०००, निवास भत्ता १०,०००, निर्वाह भत्ता ५,००० असा एकूण ३८,००० रूपये असा करण्यात आला आहे.

महसूल दावा व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित होणार

एक जिल्हा - एक अपीलची तरतूद, अर्धन्यायिक प्रकरणांसाठी गतिमान प्रणाली

मुंबई/प्रतिनिधी- महसूल विभागांतील अर्धन्यायिक कामकाजाकरिता महसूल न्यायालय दावा व्यवस्थापन प्रणाली (रेव्हान्यू कोर्ट केस मॅनेजमेंट सिस्टीम) लागू करण्यात येणार आहे. तसेच या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी एक जिल्हा एक अपील तरतूद लागू केली जाणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यात महसूल विभागांतर्गत विविध स्तरावर अर्धन्यायिक महसुली प्रकरणे प्रलंबित राहतात. अशी प्रकरणे प्रलंबित राहिल्यास संबंधित जमिनीचा विकास करणे, हस्तांतरण करणे अशा बाबींवर परिणाम होतो. पर्यायाने नागरिकांसाठीही अडचणी निर्माण होतात आणि शासन महसुलाची हानी होते, असे आढळून आले आहे. त्यामुळे अशा अर्धन्यायिक कामकाजामध्ये प्रक्रियात्मक सुधारणा करण्यात येणार आहे. त्यासाठी अर्धन्यायिक प्रकरणांची सुनावणी ऑनलाईन पध्दतीने करता येईल, यासाठी महसूल न्यायालयीन दावा व्यवस्थापन प्रणाली (िनहल एर्दू ंैी ईैंीसह एेब्रस्) राबविण्यात येणार आहे. तसेच अशा प्रकरणांमधील अनावश्यक अपिलांचे टप्पे कमी करण्यावर भर दिला जाणार आहे. अशी अर्धन्यायिक प्रकरणे विहीत वेळेत निकालात काढण्याकरिता 'एक जिल्हा, एक अपील' अशी पद्धती अवलंबिली जाणार आहे. या दोन्ही बांबीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये तरतूद करावी लागणार आहे.

पान १ व १० वरून

अदानी समूहाचा जलविद्युत ङ्काल्प

जंगलतोड केली जात आहे. प्रति एकर २५२ झाडांप्रमाणे सुमारे १ लाख ४९ हजार ४३६ वृक्ष तोडले जाणार आहेत. भूवैज्ञानिक सर्वेक्षणासाठी बोरिंग खोदले जाणार आहे.मेळघाट परिसरात राहणाऱ्या कोरकू व इतर आदिवासी समाजाची उपजीविका पूर्णपणे याच जंगलावर अवलंबून आहे. स्थानिकांच्या रोजगार, निवास व पारंपरिक हक्कांवर यामुळे गदा येण्याची शक्यता आहे.मेळघाट पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील आहे. मेळघाटात समृद्ध जैवविविधता आहे. अशात जंगलतोड झाल्याने पर्यावरणाचा समतोल बिघडू शकतो. याकडे लक्ष वेधत या प्रकल्पाला विरोध केला जात आहे.वन विभागाच्या भूमिकेवरही यात प्रश्न उपस्थित होत आहेत. आदिवासींवर अन्याय होऊ नये, यासाठी हा प्रकल्प लवकरात लवकर रद्द करावा, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

कोणार्कच्या स्वच्छता कंत्राटाची

निवासाला जर ३० वर्षांची मुदत पूर्ण झाली असेल, तर ती मालमत्ता स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या नावावर करण्याचे नियम आहेत. अमरावतीत १३८ क्वार्टर्स अलॉट केले गेले आहेत. याबाबत रेग्युलरायझेशनचे निर्देश देण्यात आले आहेत.

सर्व योजनांसह नमस्ते योजनेचाही लाभ मिळायला हवा, असे रवि कलोसे यांनी सांगितले. योजनांची माहिती स्वच्छता कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचली नाही. त्यांना याची माहिती देण्यात यावी. महात्मा फुले महामंडळाच्या सर्व योजनांचा लाभ मिळायला हवा,असे ही ते म्हणाले.

राष्ट्रीय आयोगाचे सदस्य रवि कलोसे यांनी सांगितले की, महानगरपालिकेच्या प्रत्येक क्षेत्रात अपेक्षित लाभ पोहोचला नाही. यासाठी मनपा प्रशासनाला त्यांनी चांगले धारेवर घेतले.

मेळघाटातील द्धआडनदीठ ङ्काल्पाच्या

झाल्यानंतर खड्डे बुजवून जंगल पूर्ववत केल्याचे पुरावे सादर करणे अशा अटींचा समावेश होता. तथापि, प्रत्यक्ष सर्वेक्षणादरम्यान या अटींचे उल्लंघन होत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

लैंगिक अत्याचारङ्काकरणातील मुख्य

असलेल्या मुलीला राजेश थोरात याने जबरदस्तीने भाड्याच्या खोलीत नेऊन अत्याचार केल्याचा आरोप होता. याबाबत कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले. पीडितेने वडिलांना प्रकार सांगितल्यानंतर २२ मे रोजी चांदूर रेल्वे पोलिसांत गुन्हा दाखल झाला. या खटल्यात सरकार पक्षाने १६ साक्षीदार तपासले. पीडित मुलगी, संबंधित डॉक्टर आणि सायबर तज्ज्ञ यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. मंगेश भागवत यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. न्यायालयाने पोक्सो कायद्याच्या कलम ६ अंतर्गत २० वर्षे सश्रम कारावास आणि २० हजार रुपये दंड सुनावला. कलम १२ अंतर्गत दोन वर्षे कारावास व पाच हजार रुपये दंड, तर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१(३) अंतर्गत दोन वर्षे कारावास व पाच हजार रुपये दंड ठोठावला. वसूल होणारी ३० हजार रुपयांची दंडाची रक्कम पीडितेला देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

राजकमल रेल्वे उड्डाणपुलाच्या तोडकामासाठी

अंबापेठकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूकही टप्प्याटप्प्याने बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे राजकमल चौक – हमालपुरा – जयस्तंभ चौक – रेल्वे स्टेशन चौक जोडणारा रेल्वे उड्डाणपूल, रेल्वे स्टेशन चौक ते सूर्योदय चौक मार्ग, मॉडर्न इलेक्ट्रिकल्सपासून अंबापेठकडे जाणारा मार्ग पादचाऱ्यांसह सर्व वाहनांसाठी प्रवेश बंदी राहणार आहे. वाहनांसाठी हमालपुराकडून येणारी वाहने ही बस स्टँड मार्गे रेल्वे स्टेशन – मर्क्युरी टी-पॉईंट असा मार्ग वापरावा. बस स्थानकाकडून येणाऱ्या वाहनांनी बस स्टँड मार्गे रेल्वे स्टेशन – मर्क्युरी टी-पॉईंट असा मार्ग वापरावा. राजकमल चौक व जयस्तंभ चौकाकडून येणाऱ्या वाहनांनी राजापेठ पोलीस ठाण्यासमोर – राजकमल चौक – जयस्तंभ चौक – मालवीय चौक या मार्गाचा वापर करावा. बेलपुरा व रेल्वे स्टेशनदरम्यान ये-जा करणाऱ्या वाहनांनी गद्रे चौक किंवा चिचफैल, रुक्मिणी नगर, विवेकानंद कॉलनीतील अंतर्गत मार्गाचा वापर करावा. अंबापेठ ते सतीधाम व परतीच्या प्रवासासाठी जयस्तंभ – राजकमल चौक मार्गाचा वापर करावा महारेलच्या विकासकाकडून पाडकाम व मलबा उचलण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर, रेल्वे पुलाखालून बेलपुरा व अंबापेठकडे जाणारे मार्ग वाहतुकीस सुरक्षित असल्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर गर्डरचे काम सुरू होईपर्यंत हे मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी खुले केले जातील. उड्डाणपुलाचे संपूर्ण विकासकाम पूर्ण होऊन संबंधित विभागाकडून वाहतूक सुरू करण्याचा अहवाल येईपर्यंत ही अधिसूचना लागू राहणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा १९८८ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलिस उपायुक्त प्रांजली सोनवणे यांनी कळविले आहे.

चांदूर रेल्वेच्या शेतशिवारात चोरट्यांचा

घटनांबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल केली असता अनेकदा केवळ अदखलपात्र स्वरूपात तक्रारींची नोंद केली जात असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे चोरट्यांवर कोणताही वचक निर्माण होत नसल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. वारंवार चोरीच्या घटना घडत असतानाही ठोस कारवाई होत नसल्याने चोरट्यांचे मनोबल वाढत आहे. शेतशिवारातील चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, चोरीच्या घटनांचा तपास करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच तहसील प्रशासनानेही या प्रश्नात लक्ष घालून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेवक हर्षल वाघ यांनी केली आहे. निसर्गाशी झुंज देणाऱ्या शेतकऱ्याला आता चोरट्यांपासूनही आपली शेती वाचवावी लागत आहे.

महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांचा

महापौर श्रीचंद तेजवानी, अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, उपमहापौर सचिन भेंडे, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, नगरसेवक अजय जयस्वाल, महानगरपालिका कर्मचारी व कामगार संघटनेचे अध्यक्ष रमेश पांडे, सरचिटणीस आकाश तिरथकर, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

कारची दुचाकीला धडक,पति-

नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. माहिती नुसार, मारेगावच्या दिशेने करंजीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने एमएच ३४ सीआर ७५४८ जळका येथील पांढरदेवी मंदिराकडून मुख्य रस्त्यावर येणाऱ्या सिडाम दाम्पत्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील सविता सिडाम उंच उडून रस्त्यावर आदळल्या. यात त्यांना गंभीर मार लागल्याने जागीच ठार झाल्या. तर पती बंडू सिडाम हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नागपूर येथे नेण्यात येत असल्याने वाटेत समुद्रपूर (जि. वर्धा) त्यांचा मृत्यू झाला.अपघातानंतर भरधाव कार रस्त्याच्या खाली उतरून शेतात शिरली. या वेळी कारमधील दोन एअरबॅग उघडल्याने कारमधील पती-पत्नी थोडक्यात बचावले. मात्र त्यांना किरकोळ जखमा झाल्या. घटनेचे वृत्त कळताच मारेगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले.बंडू सिडाम हे वणी तालुक्यातील वांजरी गावचे माजी सरपंच असून ते सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असत. सिडाम दाम्पत्याच्या अपघाती निधनाची बातमी कळताच, संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

फ्लॅटमधील कुंटणखान्याचा

युवती हैदराबाद येथून आल्याची प्राथमिक माहिती आहे. या प्रकरणात सर्वाधिक लक्ष वेधणारी बाब म्हणजे संबंधित फ्लॅटवर यापूर्वीही दोनदा पोलिसांनी छापा टाकल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आताची कारवाई तिसरी ठरते. वारंवार कारवाई होऊनही त्याच ठिकाणी पुन्हा हा प्रकार सुरू होत असेल, तर त्यामागे नेमकी कोणती व्यवस्था कार्यरत आहे, याचा शोध घेण्याची गरज आहे. फ्लॅटचा वापर कोणाच्या परवानगीने होत होता, त्याचे नियंत्रण कोणाकडे होते, आर्थिक व्यवहार कोण सांभाळत होते आणि अन्य व्यक्तींचा सहभाग आहे का, या प्रश्नांची उत्तरे तपासातून समोर येणे आवश्यक आहे.

श्रीक्षेत्र कौंडण्यपूर नगरी हरिनामाच्या

उपाध्यक्ष वसंत डाहे, विश्वस्त अशोक पवार, सुरेश चव्हाण व अतुल ठाकरे यांच्या उपस्थितीत नगरप्रदक्षिणा भक्तिभावाने पार पडली. सकाळी ५ ते ७ या वेळेत महापूजा, त्यानंतर १० ते ११ वाजता गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज मोझरी यांचे खंजिरी भजन झाले. दुपारी १२ ते २ या वेळेत काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते.

सायंकाळी ४.३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत दहीहंडी सोहळा पार पडला. यावेळी जगद्गुरु राजराजेश्वराचार्य महाराज, आमदार राजेश वानखडे, आरती वानखडे, रविराज देशमुख व सरपंच प्रेमदास राठोड यांची उपस्थिती लाभली. दहीहंडीच्या सोहळ्याने कार्तिक मास उत्सवाची सांगता झाली.संपूर्ण सोहळ्यात भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कौंडण्यपूरच्या धार्मिक परंपरेचे दर्शन घडले. श्रद्धा, भक्ती, वारकरी संस्कृती व सामाजिक एकतेचा संदेश देणारा हा कार्तिक मास सोहळा भाविकांच्या मनात भक्तिमय आठवणी निर्माण करून गेला. यावेळी संस्थान अध्यक्ष नामदेव अमाळकर, उपाध्यक्ष वसंत डाहे, सचिव सदानंद साधू, विश्वस्त हिम्मतराव टाकोणे, अशोक पवार, सुरेश चव्हाण, अतुल ठाकरे यांच्या सह समस्त गावकऱ्यांनी सहकार्य केले.

टाटा मोटर्सच्या जमशेदपूर

ड्युटी' म्हणून नोंदवला नाही आणि केवळ प्राथमिक उपचार करून त्यांना घरी पाठवून दिले. घरी गेल्यानंतर त्यांची प्रकृती अधिकच खालावली आणि शनिवारी रात्री १० वाजता टाटा मोटर्स रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संतप्त झालेल्या नातेवाईकांनी आणि कामगार नेते बंटी सिंह यांनी रविवारपासून कंपनीच्या मुख्य गेटवर ठिय्या आंदोलन सुरू केले.

शिफ्ट रद्द झाल्याने कामगार चिंतेत

रविवारपासून मुख्य गेट बंद असल्याने कर्मचारी आणि अधिकारी शेजारील 'टेल्कोन' कंपनीच्या आणि कॅन्टीनच्या गेटमधून पायी येजा करत होते. मात्र, बुधवारी सकाळी आंदोलकांनी हे सर्व पर्यायी गेटही बंद केले. पहाटे ४ वाजता घराबाहेर पडून कंपनीच्या बसने गेटवर पोहोचलेल्या कामगारांना आणि जनरल शिफ्टच्या अधिकाऱ्यांना प्रवेश नाकारण्यात आला.

नोकरीच्या मागणीवर आंदोलक ठाम

कंपनीचे मोठे नुकसान होऊ लागल्याने व्यवस्थापन आता बॅकफूटवर आले आहे. कंपनीने अपघाताची निष्पक्ष चौकशी करण्याचे आश्वासन देत गेट उघडण्याचे आवाहन केले आहे. मात्र, जेव्हा अपघाताची नोंदच झाली नाही, तर चौकशी कशाची करणार? यापूर्वी फॅक्टरी इन्स्पेक्टरने केलेल्या चौकशीतूनही काहीही निष्पन्न झाले नाही, असे म्हणत कामगार नेते बंटी सिंह आणि मृताच्या नातेवाईकांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला आहे.

किवळे हल्लाङ्काकरणात

घेतलं आहे. यातील २ जणांचा थेट हल्ल्यात सहभाग असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली. मंदार किवळेची प्रकृती आणि तपासाबाबत पोलिसांनी काय सांगितलं ते जाणून घेऊयात.

मंदार किवळे हल्ल्याप्रकरणीत आत्तापर्यंत सहा जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. यामध्ये दोन जणांचा थेट हल्ल्यात सहभाग आहे इतर चार जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतल आहे. मंदार किवळे याच्यावर सध्या ससून रुग्णालयात उपचार सुरू त्याची प्रकृती स्थिर आहे. कोर्टाबाहेरील सुरक्षेचा पुन्हा एकदा आढावा घेण्यात आला आहे. जुन्या प्रकरणातून मंदार किवळेवर हल्ला करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुणे पोलीस तपास करत आहे, अशी माहिती अमितेश कुमारांनी दिली आहे. दरम्यान, पुणे पोलिसांनी दुपारी पत्रकारांशी संवाद साधला होता. त्यावेळी या प्रकरणाचा तपास सुरु आहे. त्यासाठी पोलिसांचे पथकं हे क्राईम ब्रांचसोबत मिळून काम करत आहेत, घटनास्थळी पोहोचून पुरावे गोळा करत आहेत, असं स्पष्ट केलं होतं. त्यासोबतच पोलिसांनी तातडीने तब्बल ८ ते १० पथकं या गुन्ह्याप्रकरणी बनवून कामाला लावल्याची माहितीही दिली होती. पोलिसांनी स्पष्ट केलं होतं की, या प्रकरणातील कोणत्याही आरोपींना सोडणार नाही. दरम्यान, २०२५मध्ये पुण्यातील कात्रज या भागात एक हत्या करण्यात आली होती. ही हत्या होती शुभम चव्हाण नावाच्या व्यक्तीची. याच शुभमच्या हत्येमुळे आज किवळेवर हल्ला झाल्याचं पोलिसांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे हा सर्व प्रकार बदल्याच्या आगीतून घडला आहे, हे निष्पन्न झालं आहे. पुढील इतर सर्व आरोपी हे कोण आणि त्यांना कधी ताब्यात घेतलं जाणार, याकडे आता लक्ष लागलं आहे.

पाटील कुटुंबातील ६ जणांना

उवा गावाजवळ त्यांना अडवले आणि कालव्यात फेकून दिले.

मराठीत बोलणारा मुलगा पोलिसांकडे आला- दरम्यान, महुवा जवळील कालव्यातून तीन बॉडी सापडल्या आहेत, यामध्ये एका दाम्पत्याचा आणि ९ वर्षांच्या मुलीचा समावेश आहे. त्यांचा १३ वर्षांचा मुलगा पोहून बाहेर आला आणि त्याने रविवारी सकाळी मदतीसाठी विनवणी केली. बारडोली ग्रामीण पोलीस निरीक्षक पी. एन. जडेजा यांनी सांगितले की, 'कुटुंबातील इतर दोन सदस्य—एक २ वर्षांचे लहान बाळ आणि १६ वर्षांचा मुलगा—अद्याप बेपत्ता आहेत. त्या दोघांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि या गुन्ह्यामागचे नेमके कारण शोधण्याचे कामही सुरू आहे.'

सुरत ग्रामीणचे पोलीस अधीक्षक राजेश गाढिया म्हणाले, 'रविवारी सकाळी एक १३ वर्षांचा मुलगा पोलीस ठाण्यात आला. तो मराठी भाषेत बोलत होता. चौकशीदरम्यान असे समजले की, हे कुटुंब कामानिमित्त गाडीने सुरतला जात होते.'

सहा जणांना वेगवेगळ्या गाडीत बसवलं

त्यांनी सांगितले की, रात्रीच्या वेळी एका वाहनाने या कुटुंबाचा पाठलाग केला. हल्लेखोरांनी त्यांचे वाहन अडवून, मुलाचे आई-वडील आणि २ वर्षांच्या लहान भावंडाला एका वाहनात बसवले, तर १३ वर्षांचा मुलगा, त्याचा १६ वर्षांचा भाऊ आणि ९ वर्षांच्या बहिणीला दुसऱ्या वाहनात बसवले.

कालव्यातून पोहत बाहेर आला

पोलीस अधीक्षक म्हणाले, 'मुलाने सांगितले की, त्याला, त्याच्या १६ वर्षांच्या भावाला आणि ९ वर्षांच्या बहिणीला कालव्यात फेकून देण्यात आले. तो स्वतः पोहून बाहेर आला आणि त्याने घरी असलेल्या आपल्या मोठ्या बहिणीशी संपर्क साधला. आमच्या पथकाने त्या मोठ्या बहिणीला येथे आणले, तिचा जबाब नोंदवला आणि गुन्हा दाखल केला आहे.'पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शोध मोहिमेदरम्यान महुवा तालुक्यातील डुंगरीजवळ उकाई-काकरापार कालव्यातून एक पुरुष, एक महिला आणि एका मुलीचे मृतदेह सापडले आहेत. नातेवाईकांनी मृतदेहांची ओळख पटवली आहे. मृतांपैकी पुरुष नितीन ऊर्फ भुरिया पाटील आहे, तर महिला त्याची पत्नी कविता पाटील आहे. तिसरा मृतदेह त्यांच्या ९ वर्षांच्या मुलीचा असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

पहिल्या पतीच्या निधनानंतर नवा संसार

गाढिया यांनी सांगितले की, या प्रकरणाचा तपास करण्यासाठी सहा स्वतंत्र पोलीस पथके आणि एक विशेष तांत्रिक पथक तयार करण्यात आले आहे. 'आरोपींची ओळख पटली आहे,' असे त्यांनी सांगितले. कविता पाटील यांच्या पहिल्या पतीचे निधन झाल्यानंतर त्या नितीनसोबत राहत होत्या, असेही अधिकाऱ्याने नमूद केले. '१६ वर्षांचा मुलगा आणि २ वर्षांचे लहान मूल बेपत्ता आहेत. त्यांना शोधण्यासाठी पोलीस आणि अग्निशमन दलाची पथके कालव्यात शोध मोहीम राबवत आहेत,' असे त्यांनी पुढे सांगितले.

सोने-चांदीच्या दरात

होण्याची शक्यता पाहता, आणि डॉलर वधारल्याचा हा परिणाम मानला जात आहे. दोन्ही दर जी एस टी शिवायचे आहेत.

आंतरराष्ट्रीय बाजार कॉमेक्समध्ये तर सोन्याची किंमत ३,५५५.६० डॉलर प्रति औंस झाली आहे. मात्र IBJA नुसार २४ कॅरेट सोने १,२४,९४५ रुपये प्रति १० ग्रॅम आहे. २३ कॅरेट सोने १,२४,४४५ रुपये प्रति १० ग्रॅम, २२ कॅरेट सोने १,१४,४५० रुपये प्रति १० ग्रॅम आहे, १८ कॅरेट सोने ९३,७०९ रुपये प्रति १० ग्रॅम आणि १४ कॅरेट सोने ७३,०९३ रुपये प्रति १० ग्रॅम आहे. तर आंतरराष्ट्रीय बाजार यूएस कॉमेक्समध्ये चांदीची किंमत ४०.७२ डॉलर प्रति औंसवर आहे.

राजस्थानात २४ जिल्हा

अध्यक्ष म्हणून निवड झाली. राजस्थानचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते अशोक गेहलोत यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये पराभव झाल्यानंतर लोकांमध्ये संताप असल्याचं समोर आलं आहे. मात्र, मुख्यमंत्री, भाजप अध्यक्ष आणि इतर नेत्यांनी अद्याप अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. भाजप नेत्यांनी पराभव स्वीकारला पाहिजे. पराभवानंतर प्रतिक्रिया द्यायला पाहिजे होती. जनतेचा कौल आणि पराभव स्वीकारतो असं भाजप नेत्यांनी म्हणायला पाहिजे होतं. मात्र, त्यांनी असं केलेलं नाही, असं अशोक गेहलोत यांनी म्हटलं आहे.

माहीम परिसरात सोन्याच्या

मुंबईतील माहिम परिसरातील सोन्याच्या दुकानात गोळीबार झाल्याची घटना घडल्यानं खळबळ उडाली आहे. ही गोळीबाराची घटना नेमकी का घडली? यामागचा उद्देश काय होता? याबाबातची माहिती अद्याप मिळालेली नाही. दरम्यान, या प्रकरणाचा तपास तातडीने पोलिसांनी सुरु केल्याची माहिती मिळत आहे.

गोळीबाराच्या घटनांमुळं महाराष्ट्र हादरला- दरम्यान, बुधवारी दुपारीच पुण्यातील शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट नंबर ४ जवळ गोळीबाराची धक्कादायक घटना घडली होती. त्यानंतर लगेच मुंबईत देखील रात्री

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

रिसोडमध्ये अवैध रेती साठ्यांची तपासणी होणार

बांधकामस्थळांवरील साठ्यांचे पंचनामे करण्याचे तहसीलदारांचे आदेश

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड शहरातील अवैध रेती साठ्यांची तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी गंभीर दखल घेतली असून, शहरातील सुरू असलेल्या बांधकामस्थळांवरील रेती साठ्यांची तपासणी करून पंचनाम्यासह सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश महसूल अधिकाऱ्यांना दिले आहेत.



तहसीलदार कार्यालयाने २० नोव्हेंबर २०२६ रोजी यासंदर्भात आदेश काढून मंडळ अधिकारी व रिसोड भागातील तीन ग्राम महसूल अधिकाऱ्यांना तपासणीची जबाबदारी सोपवली आहे.

शहरात रेतीची वाहतूक आणि विक्री सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर अधिकृत परवानगी किंवा रॉयल्टी भरल्याचा पुरावा नसतानाही बांधकामस्थळांवर रेती पोहोचवली जात असल्याने शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

त्यानुसार शहरातील सर्व सुरू असलेल्या बांधकामस्थळांवरील रेती साठ्यांची वैधता तपासून अवैध साठा आढळल्यास संबंधित व्यक्तींची नावे आणि रेतीचे प्रमाण नमूद करून सविस्तर अहवाल तहसील कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेशाची प्रत जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या गौणखनिज शाखेलाही पाठविण्यात आली आहे.

कर्मचाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित होणार ! अवैध रेती साठेबाजांशी संगनमत करणाऱ्या किंवा त्यांना पाठीशी घालणाऱ्या कर्मचाऱ्यांचीही गय केली जाणार नसल्याचे संकेत मिळत आहेत. तपासणीत हलगर्जीपणा अथवा कर्तव्यात कसूर आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवरही कारवाई होऊ शकते. तहसीलदारांच्या आदेशामुळे रेती साठेबाजांचे धाबे दणाणले आहेत. मात्र, आदेश केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात किती बांधकामस्थळांची तपासणी होते, किती अवैध साठे उघडकीस येतात आणि दोषींवर काय कारवाई होते, याकडे रिसोडकरांचे लक्ष लागले आहे.

पोलीस पाटलांची ३७ पदे रिक्त! ८३ मंजूर पदांपैकी केवळ ४६ पदांवर नियुक्ती

■ प्रतिनिधी | मानोरा ■

मानोरा तालुक्यात पोलीस पाटील पदांची मोठ्या प्रमाणात रिक्तता असून, तब्बल ३७ पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पाटील हे महत्त्वाचे पद असताना, तालुक्यातील अनेक गावांमध्ये पोलीस पाटील नसल्याने ग्रामीण प्रशासनाच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

मानोरा तालुक्यात पोलीस पाटील पदांची मंजूर संख्या ८३ असून, त्यापैकी केवळ ४६ पोलीस पाटील कार्यरत आहेत. तर तब्बल ३७ पदे रिक्त आहेत. म्हणजेच मंजूर पदांच्या तुलनेत जवळपास निम्मी पदे रिक्त असल्याने गावपातळीवरील प्रशासनाला मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे.

पोलीस पाटील हे गावातील नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा मानले जातात. गावातील घडामोडींची माहिती पोलिसांना देणे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करणे, गावातील तंटे व वादविवादांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत करणे, अशा विविध जबाबदाऱ्या पोलीस पाटलांवर असतात.

मात्र, मोठ्या संख्येने पदे रिक्त असल्याने अनेक गावांमध्ये ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. ग्रामीण भागातील सुरक्षा व्यवस्था प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी रिक्त पदे भरणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

मालेगाव येथील खरेदी–विक्री संस्थेवर सहकार विकास पॅनलचा एकहाती सत्ता!

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुका शेतकरी संस्थेच्या सहकारी खरेदी-विक्री निवडणुकीत आमदार अमित झनक, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीपराव जाधव आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती गजानन देवळे यांच्या नेतृत्वाखालील सहकार विकास पॅनलने सर्व १३ जागांवर विजय मिळवत संस्थेवर एकहाती वर्चस्व प्रस्थापित केले. स्व. डॉ. अरुण बाबा इंगोले, जय हो बळीराजा व गजाननराव देवळे मित्र मंडळाच्या सहकार विकास पॅनलने शेतकरी सहकार परिवर्तन पॅनलचा दारुण पराभव केला. संस्थेच्या एकूण १३ जागांपैकी एक जागा बिनविरोध झाली होती. या जागेवर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीपराव जाधव यांची निवड झाली. उर्वरित १२ जागांसाठी २२ नोव्हेंबर रोजी मतदान झाले. सायंकाळी ६ वाजता मतमोजणी सुरू झाली. त्यात सहकार विकास पॅनलच्या सर्व उमेदवारांनी बाजी मारली. या निकालामुळे मालेगाव तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संस्थेवर सहकार विकास पॅनलचे वर्चस्व निर्माण झाले असून, विजयानंतर समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

प्रवर्गनिहाय विजयी उमेदवार : अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून सुरेश जामकर यांनी ५२६ मते मिळवून विजय मिळविला. प्रतिस्पर्धी संदीप सावळे यांना १६० मते मिळाली. इतर मागास प्रवर्गातून सुरेश शिंदे यांनी ४७१ मते मिळवून बाजी मारली. शंकर अवचार यांना १८७, तर अशोक गवळी यांना २१ मते मिळाली. महिला राखीव मतदारसंघातून वैशाली केळे (४८१ मते) आणि लिलावती शिंदे (४५३ मते) विजयी झाल्या. शोभा कुटे यांना १७१, तर गया टेकाळे यांना १४४ मते मिळाली.

वैयक्तिक सभासद मतदारसंघातून भगवान शिंदे (४६६ मते) आणि सुभाष देवळे (४५४ मते) यांनी विजय मिळविला. या मतदारसंघात अशोक गवळी यांना १३७, तर योगेश सौभागे यांना ७३ मते मिळाली. सोसायटी सभासद मतदारसंघातून प्रकाश कुटे (६१), भारत केळे (५९), रामभाऊ नवघरे (५८), भारत जोगदंड (५५), परमेश्वर वाझुळकर (५४) आणि भिकाराव घुगे (५२) विजयी झाले. या मतदारसंघात गजानन गवळी (२३), कैलासराव घुगे (२६), गणेश घुले (२४), संजय देशमुख (२८), सुरेश पाटील (२३) आणि गजानन मापारी (२१) यांना पराभवाचा सामना करावा लागला.

बाजारपेठेत १० व २० रूपयांसह नाण्यांची चणचण

व्यापाऱ्यांची होत आहे डोकेदुखी...

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगांव येथील बाजारपेठेत गेल्या काही महिन्यांपासून १० रुपये, २० रुपयाच्या नोटांसह नाण्यांची चणचण भासत असल्याने व्यवहार करतांना व्यापारी बांधव व ग्राहकांची डोकेदुखी होत आहे. मालेगांव ला लागून ४० पेक्षा जास्त खेडे आहेत. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी किराणा, कपडा, हार्डवेअर, दवाखाना, मेडिकल, दुध डेअरी आदीसाठी ग्रामीण भागातील सर्वांनाच मालेगांव येथे यावे लागते. परंतु येथील बाजारपेठेत गेल्या काही महिन्यांपासून १० रुपये, २० रुपये नोटांची व नाण्यांची चणचण भासत आहे. ग्राहक सामान घेतल्यानंतर अथवा १० रुपयाची वस्तू खरेदी केल्यानंतर १०० रुपयाची नोट दुकानदाराला दिल्या जाते. त्यावेळी दहा रुपये घेऊन ९० रुपये परत देतांना दुकानदाराची दमछाक होत आहे तर बऱ्याच वेळा व्यापारी व ग्राहक यांच्यात खटके उडत आहेत, तर चिल्लर नाही म्हणून बरेच वेळा ५, १०, २० रुपये चिल्लर अभावी ग्राहकांकडे तसेच बाकी राहतात. त्यामुळे एक प्रकारे नुकसान होत आहे. बहुतांश वस्तूवर नफा नगण्य अन् त्यातच चिल्लरची अडचण हे दुकानदारांसाठी फार मोठी समस्या निर्माण होत आहे. येथील काही व्यापारी बांधव दररोज १० रुपये, २० रुपये, १०-२० रुपयांचे डॉलर, एक, दोन, पाच रुपयाचे चिल्लर शोधतांना दिसत आहेत. तर चिल्लरची डोकेदुखी नको म्हणून काही व्यापारी बांधवांकडे स्कॅनर आहे.

क्रिकेटच्या मैदानावरून गावागावांत मैत्रीचा सेतू

मानोरा चॅम्पियन ट्रॉफी उत्साहात संपन्न!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

ग्रामीण भागातील खेळाडूंमधील क्रीडागुणांना वाव मिळावा, गावागावांतील एकोपा वाढावा आणि युवकांमध्ये संघभावना निर्माण व्हावी, या सामाजिक उद्देशाने हेमेंद्र ठाकरे मित्र मंडळ, ग्रामपंचायत धामणी व शिवाजीनगर, मानोरा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मानोरा चॅम्पियन ट्रॉफी – एक गाव, एक संघ' ग्रामीण क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना २४ नोव्हेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

१५ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू झालेल्या या स्पर्धेत ग्रामीण भागातील विविध संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर खेळाडूंनी क्रिकेटप्रेमींची मने जिंकली. स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांना आपले



क्रीडाकौशल्य दाखविण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले. संपूर्ण स्पर्धेदरम्यान प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेच्या अंतिम निकालात वाडेगाव, ता. बाळापूर संघाने प्रथम क्रमांक पटकावत ४० हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. जवळका रेल्वे संघाने द्वितीय क्रमांकासह २० हजार रुपये, तर लोही संघाने तृतीय क्रमांक पटकावत १० हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त केले.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ क्रिकेटचा खेळ नव्हे, तर गावागावांतील युवकांना एकत्र आणून त्यांच्यात मैत्री, शिस्त, खिलाडूवृत्ती आणि सामाजिक एकोपा वाढविण्याचा प्रयत्न आयोजकांनी केला. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील सुप्त क्रीडा प्रतिभेला संधी मिळण्यासोबतच युवकांना सकारात्मक दिशा मिळण्यास मदत होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक मंडळ, एमसीसी क्रिकेट क्लबचे खेळाडू, पंच, सहकार्य करणारे मान्यवर, ग्रामस्थ, क्रिकेटप्रेमी तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मोलाचे योगदान लाभले.

स्पर्धेचे आयोजक : निलेश उजवे, सिद्धू शिकारे, संतोष होलगरे, विवेक भोरकडे, चेतन तोष्णीवाल, अतुल आडूळे, आकाश राठी, अमोल पाटील, अमर धनकर, डॉ. अमोल भगत सर, महेश जाधव, योगेश राऊत, रवी पाटील, पंकज तोष्णीवाल, कुणाल नाईक, नितीन तळणे, गजानन होलगरे, इकबाल सर व एमसीसीचे सर्व खेळाडू.

आयोजकांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांतून ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. ग्रामीण युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देणारा आणि गावांमधील सामाजिक सलोखा दृढ करणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

त्या प्रकरणातील महिलेची न्यायालयीन कोठडीत रवानगी, चोरी गेलेले सोने केले जप्त



■ प्रतिनिधी | मानोरा ■

बसप्रवासादरम्यान महिलेच्या पर्समधील सोन्या-चांदीचे सुमारे २ लाख ७८ हजार रुपये किमतीचे दागिने चोरी झाल्याची घटना २३ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. या प्रकरणी मानोरा पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत विठोली येथून सात संशयित महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण ऐवज जप्त करण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणातील सातही आरोपी महिला अलबेली मुन्ना छट्टू (वय २३), शंकर अम्मा व्यंकटेश छट्टू (वय ३३), गीता राजू छट्टू (वय २१), कविता विष्णू छट्टू (वय २७), गीताई राजू छट्टू (वय २६), लक्ष्मी शिवा छट्टू (वय ३५) आणि सुप्रिया धर्मा छट्टू (वय २०), सर्व रा. चिखलठाणा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर अशी आहेत. सर्व आरोपींची पोलिस कोठडी संपल्यानंतर न्यायालयाने न्यायलयीन कोठडीत रवानगी केली.

वाशिम जिल्हा 'मन की बात' संयोजकपदी पांडुरंग कोठाळे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या लोकप्रिय संवाद कार्यक्रमाचा अधिकाधिक नागरिकांपर्यंत प्रसार व्हावा, या उद्देशाने भारतीय जनता पक्षाच्या वतीने संघटनात्मक स्तरावर विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत. याच अनुषंगाने वाशिम जिल्ह्याच्या 'मन की बात' संयोजकपदी भाजपचे कार्यकर्ते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग कोठाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच ग्रामीण भागातील विविध विषयांवर भाष्य करून नागरिकांना



सकारात्मक कार्यासाठी प्रेरित केले जाते. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेत त्यांच्या अनुभवांना देशासमोर मांडण्याचे कामही या कार्यक्रमातून केले जाते. पंतप्रधानांचा जनतेशी थेट संवाद साधणारा हा उपक्रम अधिक व्यापक करण्यासाठी भाजपने राज्य, जिल्हा व तालुकास्तरावर संयोजकांची नियुक्ती केली आहे.

पांडुरंग कोठाळे यांच्याकडे आता वाशिम जिल्ह्याची जबाबदारी सोपविण्यात आली असून, संघटनात्मक कार्याचा अनुभव आणि कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क लक्षात घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे. आगामी काळात जिल्ह्यातील विविध भागांत 'मन की बात' श्रवण कार्यक्रमांचे आयोजन वाढवून अधिकाधिक नागरिकांना या उपक्रमाशी जोडण्याचा प्रयत्न करणार असल्याचे कोठाळे यांनी सांगितले. आपल्यावर सोपविलेली जबाबदारी ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार घराघरांत पोहोचविण्याची संधी असून, आमदार शामभाऊ खोडे, आमदार सईताई डहाके आणि भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आपण पूर्ण ताकदीने कार्य करू, अशी ग्वाही पांडुरंग कोठाळे यांनी दिली.

पर्यावरण संवर्धनासाठी 'वसुंधरा मित्र' अभियानाची दमदार सुरुवात!



■ प्रतिनिधी | वाशिम ■

पर्यावरण संवर्धनाची जाणीव केवळ पुस्तकांपुरती मर्यादित न ठेवता ती विद्यार्थ्यांच्या विचारांत, सवयींत आणि प्रत्यक्ष कृतीत रुजविण्याच्या उद्देशाने एस. एम. सी. इंग्लिश स्कूल, वाशीम येथे 'वसुंधरा मित्र' कार्यक्रमाची प्रभावी सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत इयत्ता सातवी व नववीच्या विद्यार्थ्यांचे पर्यावरणविषयक बेसलाइन मूल्यांकन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

जागतिक स्तरावर वाढते प्रदूषण, हवामान बदल, वृक्षतोड, पाण्याची कमतरता आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास ही गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. या समस्यांवर भविष्यात सक्षमपणे मात करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच पर्यावरणीय जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण होणे गरजेचे आहे. हाच व्यापक दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून 'वसुंधरा मित्र' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

वाशिम जिल्ह्यात शिवसेनेची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | मानोरा ■

वाशिम जिल्ह्यातील शिवसेनेची संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त होऊन दोन महिने उलटले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात पक्षाचे संघटनात्मक कामकाज प्रभावीपणे सुरू राहण्यासाठी लवकरात लवकर नवीन कार्यकारिणी जाहीर करावी, अशी मागणी मानोरा तालुक्यातील शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांनी शिवसेना सचिव संजय मोरे यांची भेट घेऊन केली.

जिल्ह्यातील जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख यांच्यासह संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. आगामी काळात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होण्याची शक्यता लक्षात घेता पक्षाचे



संघटन अधिक मजबूत करण्यासाठी नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या तातडीने होणे आवश्यक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. पक्षासाठी आतापर्यंत कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता सातत्याने काम करणाऱ्या निष्ठावंत शिवसैनिकांना नवीन कार्यकारिणीत संधी देण्यात यावी. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्याचा उपयोग पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी व्हावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

शिरपूर येथे ज्ञानेश्वर महाराज यांचे जाहीर कीर्तन

■ प्रतिनिधी | शिरपूर जैन ■

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीचे जनक क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १३६ व्या स्मृतिदिनानिमित्त शिरपूर येथे भव्य कीर्तन व प्रबोधनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त, राष्ट्रीय कीर्तनकार तसेच महात्मा फुले यांच्या विचारांचे वारसदार म्हणून ओळखले जाणारे ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे, आळंदी हे आपल्या परखड वाणीतून उपस्थितांना प्रबोधन करणार आहेत. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता श्री जानगीर महाराज संस्थान,



कमानी जवळ, शिरपूर येथे होणार आहे.

'शिक्षण घ्या, संघटित व्हा, संघर्ष करा' या महात्मा फुले यांच्या संदेशाचा जागर करणाऱ्या या कार्यक्रमाला सर्व गावकरी व पंचक्रोशीतील नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाचे आयोजन क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले स्मृतिदिन समिती व समस्त गावकरी मंडळी, शिरपूर यांनी केले आहे.

कारंज्यातील मोफत सर्वरोग निदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद!

■ प्रतिनिधी | कारंजा ■

- २,५०० हून अधिक रुग्णांची तपासणी;
- ६०० रुग्ण पुढील उपचारांसाठी संदर्भित
- ४० तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग;
- विविध आजारांचे निदान व उपचारांची सुविधा मोफत उपलब्ध

सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि तज्ज्ञ वैद्यकीय सेवा मोफत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांच्या पुढाकारातून २२ नोव्हेंबर रोजी मंगरूळपीर रोडवरील शेतकरी निवास येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात तब्बल २ हजार ५०० हून अधिक रुग्णांची विविध आजारांसाठी तपासणी करण्यात आली, तर पुढील उपचार, शस्त्रक्रिया आणि विशेष वैद्यकीय तपासणीची आवश्यकता असलेल्या सुमारे ६०० रुग्णांना संबंधित रुग्णालयांत संदर्भित करण्यात आले.

स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या आरोग्यसेवेच्या कार्याचा वारसा जपणारा उपक्रम

स्व. प्रकाशदादा डहाके यांनी आपल्या



आमदारकीच्या कार्यकाळात मतदारसंघातील नागरिकांच्या आरोग्यविषयक प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले होते. गरजू रुग्णांना तातडीने वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असत. त्याच सामाजिक बांधिलकीतून आणि आरोग्यसेवेचा हाच सेवाभावी दृष्टिकोन पुढे नेण्याच्या भावनेतून आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांच्या पुढाकाराने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आर्थिक परिस्थितीमुळे दर्जेदार वैद्यकीय उपचारांपासून कोणीही वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू होता.

मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन

शिबिराच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुप धोत्रे होते, तर विदर्भ संघटन संयोजक दिनेश सूर्यवंशी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आमदार सईताई प्रकाशदादा डहाके, भाजपचे वाशिम जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, डॉ. राजीव काळे, माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, भाजपा म प्र उपाध्यक्ष सुधाताई नाईक, नगर परिषद गटनेत्या शालिनीताई प्रशांत ठाकरे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष अरुण ताथोड, प्रकाश लिंगाटे, डॉ. शार्दुल डोणगावकर, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी एन. पी. शिंगणे तसेच कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. प्रसाद देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय भाजपचे जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी, कृ.उ.बा.स. संचालक, न.प. नगरसेवक विविध आघाड्यांचे प्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

४० तज्ज्ञ डॉक्टरांकडून सर्वसमावेशक आरोग्य तपासणी

आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे), स्व. प्रकाशदादा डहाके मित्र मंडळ, विदर्भ कॅन्सर रिलीफ सेंटर आणि भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विविध वैद्यकीय विभागांतील तब्बल ४० तज्ज्ञ डॉक्टरांनी शिबिरात सहभागी होऊन रुग्णांची तपासणी केली. मेडिसिन, नेत्ररोग, शस्त्रक्रिया, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, त्वचारोग, कान-नाक-घसा, दंत व मुखरोग तसेच आयुर्वेद अशा विविध विभागांच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी सर्वसमावेशक आरोग्यसेवेचा लाभ घेता आला. उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, किडनीचे विकार, मोतीबिंदू, सांधेदुखी यांसह विविध आजारांचे निदान करण्यात आले. आवश्यकतेनुसार औषधोपचार, वैद्यकीय सल्ला आणि विविध तपासण्यांची सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्ष १५ ■ अंक १ ■ गुरुवार २६ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

एआयच्या जागतिक क्रांतीचे केंद्र बनणार वर्धा

तंत्रज्ञानाची नवी दिशा वर्ध्यातून ; सहा देशांतील संशोधनाचा महामेळावा

अदाणी विद्यापीठात २७ नोव्हेंबरपासून चौथी आंतरराष्ट्रीय परिषद; ६ देशांतील १,५०० संशोधन पेपर्सची नोंद, १ हजारावर प्रतिनिधींचा सहभाग अपेक्षित

वर्धा जनमाध्यम - आरोग्यसेवा असो, शिक्षण असो की औद्योगिक क्षेत्र... कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयने जगाच्या विकासाची दिशा बदलण्यास सुरुवात केली आहे. मानवी बुद्धिमत्तेला तंत्रज्ञानाची जोड देणारी ही क्रांती आता केवळ प्रयोगशाळांपुरती मर्यादित राहिलेली नाही. रुग्णांचे निदान, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि उद्योगांचे आधुनिकीकरण अशा प्रत्येक क्षेत्रात एआयचे महत्त्व वाढत आहे. याच जागतिक बदलांचा वेध घेण्यासाठी वर्धा आता आंतरराष्ट्रीय व्यासपीठ बनणार आहे. सावंगी (मेघे) येथील फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, एआयएचईआर (डीयू) यांच्या वतीने २७ आणि २८ नोव्हेंबर रोजी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन हेल्थकेअर, एज्युकेशन अँड इंडस्ट्री' या विषयावर चौथ्या डीएमआयएचईआर आयईईई आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेत भारतासह अमेरिका, ब्रिटन, चीन, सौदी अरेबिया आणि व्हिएतनाम येथून तब्बल १ हजार ५०० संशोधन पेपर्स प्राप्त झाले आहेत. ६०० हून अधिक विषयतज्ज्ञांनी या संशोधन पेपर्सचे परीक्षण केले. त्यापैकी ५१७ पेपर्स स्वीकारण्यात आले असून, ३९ तांत्रिक सत्रांमध्ये सादरीकरणासाठी २८९ संशोधन



पेपर्सची अंतिम निवड करण्यात आली आहे. एक हजाराहून अधिक प्रतिनिधींच्या सहभागाची अपेक्षा असून, दहा हून अधिक कीनोट स्पीकर्स, ५० निमंत्रित व्याख्याते आणि १०० हून अधिक सत्र अध्यक्ष या परिषदेत सहभागी होणार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित होत असताना मानवी जीवन, संवेदना आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व कायम राखणे आवश्यक आहे. याच दृष्टिकोनातून अदाणी युनिव्हर्सिटी, अहमदाबादचे प्रो-व्होस्ट डॉ. धवल पुजारा हे 'द ह्युमन साइड ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या विषयावर विशेष कीनोट व्याख्यान देणार आहेत. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी त्याचा अंतिम उपयोग मानवी कल्याणासाठीच व्हावा, या दृष्टीने या व्याख्यानाकडे लक्ष लागले आहे.परिषदेत आरोग्यसेवा, शिक्षण आणि उद्योग अशा तीन स्वतंत्र विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. आरोग्यसेवा क्षेत्रात एआय आधारित रोगनिदान, मेडिकल इमेजिंग, क्लिनिकल निर्णयप्रक्रिया आणि रुग्णसेवेतील नवकल्पनांचा वेध घेतला जाणार आहे. शिक्षण क्षेत्रात वैयक्तिक क्षमतेनुसार शिक्षण, डिजिटल अध्यापन पद्धती आणि बदलती शैक्षणिक व्यवस्था यावर विचारमंथन होईल. तर उद्योग क्षेत्रात ऑटोमेशन, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग, दूरसंचार आणि शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरावर चर्चा केली जाणार आहे. जागतिक तज्ज्ञांची मांदियाळी

२७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता परिषदेचा उद्घाटन समारंभ सुरू होणार असून, सकाळी ११ वाजता औपचारिक उद्घाटन होईल. यावेळी विमल वाखलू, डॉ. अविनाश सावजी, डॉ. सत्यनारायण भीसेट्टी आणि डॉ. भरत भानुदास काळे हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. जपान, दक्षिण कोरिया, अमेरिका, जर्मनी आणि कॅनडा येथील प्राध्यापक व तंत्रज्ञानतज्ज्ञही या परिषदेत सहभागी होणार आहेत. आयईईई महाराष्ट्र सेक्शन आणि आयईटीई एआयएचईआर यांचे तांत्रिक सहकार्य या परिषदेला लाभले आहे.

संशोधनासोबत संस्कृतीचा संगम- ज्ञान, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या चर्चेसोबतच सांस्कृतिक वारशालाही या परिषदेत स्थान देण्यात आले आहे. २७ नोव्हेंबरच्या संध्याकाळी 'धरोहर' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यात स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थी विविध सांस्कृतिक सादरीकरणे करणार आहेत. त्यामुळे जगभरातून आलेल्या प्रतिनिधींना भारतीय संस्कृती आणि स्थानिक कलावैभव अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

मागील तीन परिषदांना अनुक्रमे ११०, २३९ आणि २७९ संशोधन पेपर्स प्राप्त झाले होते. हे संशोधन पेपर्स आयईईई एक्सप्लोरमध्ये प्रकाशित करण्यात आले होते. यंदा संशोधन पेपर्सची संख्या १ हजार ५०० वर पोहोचल्याने परिषदेचा आंतरराष्ट्रीय विस्तार अधोरेखित झाला आहे.या परिषदेच्या आयोजनासाठी कुलपती डॉ. प्रीती अदाणी, डॉ. मलय महादेविया, सागर मेघे, कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख आणि पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संशोधक, विद्यार्थी, प्राध्यापक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी या जागतिक व्यासपीठाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

चहासाठी गॅस पेटवला अन् घराला आग; महिलेवर संकटाचा डोंगर



मांडगाव जनमाध्यम : आयुष्यभर कष्ट करून उभा केलेला संसार डोळ्यांदेखत जळून खाक झाल्याची हृदयद्रावक घटना बोथुडा येथे बुधवारी सायंकाळी ५ वाजता घडली. घरात चहा करण्यासाठी गॅसजवळ जाताच अचानक भडका उडाला आणि आगीने क्षणार्धात संपूर्ण घराला कवेत घेतले. या आगीत पाच खोल्यांचे घर आणि त्यातील संसारोपयोगी साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. गीता सुखदेव पाटील (५५) यांनी प्रसंगावधान राखत घराबाहेर धाव घेतल्याने त्यांचे प्राण वाचले. मात्र, या दुर्घटनेत त्यांचा संपूर्ण संसार राख झाला.

गीता पाटील या घरी चहा करण्यासाठी गॅसजवळ गेल्या असता अचानक गॅसने भडका घेतला. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. जीव वाचविण्यासाठी त्यांनी घराबाहेर धाव घेतली. आग इतक्या वेगाने पसरली की, घरातील एकही वस्तू बाहेर काढण्याची संधी मिळाली नाही.

माती, कवेलू आणि टिनाच्या पत्र्यांनी बांधलेल्या पाच खोल्यांच्या घरातील धान्य, कपाट, सोफा, दिवाण यासह सर्वच संसारोपयोगी साहित्य आगीत भस्मसात झाले.

घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी हिंगणघाट पोलिसांना कळविले. हिंगणघाट कृषी उत्पन्न बाजार समिती, हिंगणघाट नगर परिषद आणि वर्धा येथील अग्निशमन दलाची वाहने घटनास्थळी दाखल झाली. गावकऱ्यांच्या सहकार्याने अग्निशमन जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

सुमारे तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर रात्री आठ वाजताच्या सुमारास आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र, तोपर्यंत पाटील कुटुंबाच्या संसाराची राखरांगोळी झाली होती. एका क्षणात घर, धान्य आणि आयुष्यभराची जमापुंजी गमावल्याने कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. या आपत्तीग्रस्त कुटुंबाला शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे. हिंगणघाट पोलीस पुढील तपास करीत आहेत.

गांजाचा साठा पोलिसांच्या जाळ्यात

१७ हजारांचा ८६० ग्रॅम गांजा जप्त; नागपूरच्या एकास अटक, सावंगी पोलिसांची धडक कारवाई

वर्धा जनमाध्यम



जिल्ह्यात अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला असून सावंगी पोलिसांनी कारला परिसरात छापा टाकून १७ हजार रुपये किमतीचा ८६० ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मोसीन खान रशीद खान (वय ३२, रा. राजीव गांधी नगर, नागपूर, ह.मु. कारला) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री आणि तस्करी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सावंगी पोलिसांना कारला परिसरात गांजाची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित ठिकाणी धडक देत कारवाई केली.

कारला येथील मोसीन खान याच्या निवासस्थानाची पोलिसांनी बारकाईने झडती घेतली असता तेथे ८६० ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी हा गांजा जप्त केला असून त्याची किंमत १७ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी सावंगी पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडिक यांच्या मार्गदर्शनात सावंगीचे पोलिस निरीक्षक विनोद गिरी, पोलिस उपनिरीक्षक मधुकर सामलवार, राजेश राठोड, अनिल वैद्य, वैभव जगने आणि हर्षवर्धन मुन यांनी केली.

२३ लाखांचा शासकीय निधी हडपून कृषी विस्तार अधिकारी फरार

धडक सिंचन विहीर योजनेत आर्थिक घोटाळा; निलंबनाची कारवाई, देवळी पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू

देवळी जनमाध्यम : शेतकऱ्यांसाठी असलेल्या धडक सिंचन विहीर योजनेच्या शासकीय निधीवरच डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार देवळी पंचायत समितीत उघडकीस आला आहे. तब्बल २३ लाख २० हजार ६ रुपयांचा निधी स्वतःच्या नावाने धनादेश वटवून हडपल्याचा आरोप कृषी विस्तार अधिकारी दिनेश दखणे (रा. उमरी, मेघे) याच्यावर आहे. या प्रकरणी देवळी पोलिसांत गुन्हा दाखल होताच आरोपी पसार झाला असून, आता पोलिस त्याच्या मागावर आहेत.



पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रफुल्ल लोखंडे निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याची संधी साधून दखणे याने धडक सिंचन विहीर योजनेच्या निधीचा अपहार केल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले. स्टेट बँकेतील पंचायत समितीच्या खात्यातून स्वतःच्या नावे धनादेश वटवून शासकीय रक्कम काढण्यात आल्याचे निदर्शनास आले. शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी असलेला निधीच अशा प्रकारे वळविल्याने पंचायत समितीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या आर्थिक अनियमिततेची लेखा विभागातील लेखापाल अंकित पारिसे यांनी १९ नोव्हेंबर रोजी तक्रार दिली. त्यानंतर २२ नोव्हेंबर रोजी पोलिसांकडे अर्ज सादर करण्यात आला. प्राथमिक चौकशीत निधीचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी चौकशी अहवाल आणि बँकेच्या वितरण पत्रासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांनी दिनेश दखणे याला तत्काळ निलंबित केले. निलंबनाच्या काळात त्याला पंचायत समिती समुद्रपूर येथे रुजू होण्याचे आदेशही देण्यात आले. मात्र, कारवाईची चाहूल लागताच दखणे पसार झाल्याने पोलिसांसमोर त्याला शोधण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

पोलिस निरीक्षक संदीप काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली देवळी पोलिसांचे पथक फरार आरोपीचा शोध घेत आहे. आरोपीच्या पत्नी आणि पुतण्याला चौकशीसाठी बोलावण्यात आल्याची माहिती आहे.

शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी मंजूर झालेला निधीच अधिकारी स्वतःच्या नावावर वळवत असेल, तर पंचायत समितीतील आर्थिक व्यवहारांची तपासणी किती पारदर्शकपणे होते, हा गंभीर प्रश्न या प्रकरणातून उपस्थित झाला आहे. आता या प्रकरणात आणखी कोणाचे हात गुंतले आहेत का आणि शासकीय निधीच्या अपहाराची व्याप्ती किती आहे, हे पोलिस तपासातून स्पष्ट होणार आहे.

सत्याग्रही घाटात लोखंडी सळाखींचा ट्रेलर पलटी

चालकाच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला

तळेगाव शा. पंत, जनमाध्यम : नागपूर-अमरावती महामार्गावरील सत्याग्रही घाटात ब्रेक फेल झाल्याने लोखंडी सळाखींने भरलेला ट्रेलर पलटी झाला. मंगळवारी (दि. २४) घडलेल्या या अपघातात ट्रेलरचे मोठे नुकसान झाले असून चालक जखमी झाला. दरम्यान, ब्रेक निकामी झाल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखून ट्रेलर रस्त्याच्या बाजूला असलेल्या चहाडाच्या जागेत वळविला. त्यामुळे संभाव्य भीषण अपघात टळला.



प्राप्त माहितीनुसार, नागपूर येथील कंपनीतून लोखंडी सळाखी घेऊन जीजे १२ बीवाय १२४१ क्रमांकाचा ट्रेलर अहमदाबाद (गुजरात) येथे जात होता. दरम्यान, सत्याग्रही घाटातील अवघड वळणावर पोहोचताच अचानक ट्रेलरचे ब्रेक निकामी झाले. त्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटण्याची परिस्थिती निर्माण झाली.

अशा परिस्थितीत चालक मोहम्मद जाउल्ला (रा. दरभंगा, बिहार) याने प्रसंगावधान राखत ट्रेलर रस्त्याच्या बाजूला असलेल्या चहाडाच्या जागेत वळविण्याचा प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नात ट्रेलर पलटी झाला. चालकाने वेळीच निर्णय घेतल्याने घाटातील इतर वाहनांना धडक बसण्यासह मोठी जीवितहानी होण्याचा धोका टळला.अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी चालकाला मदत केली. त्यानंतर रुग्णवाहिकेने त्याला आर्वी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.सत्याग्रही घाटातील अवघड वळणे आणि अवजड वाहनांमधील तांत्रिक बिघाड यामुळे अपघातांचा धोका पुन्हा ऐरणीवर आला आहे. घाटातून प्रवास करणाऱ्या अवजड वाहनांची नियमित तपासणी आणि सुरक्षित वाहतुकीच्या उपाययोजनांची गरज या घटनेने अधोरेखित केली आहे.

माणुसकीला काळिमा : ६० वर्षीय वृद्ध महिलेवर सामूहिक अत्याचार

पती-पत्नीलाही कुऱ्हाडीने ठार मारण्याची धमकी, दोघे पोलिसांच्या ताब्यात

तळेगाव जनमाध्यम महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून तळेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पार्डी हेटी येथे माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. शेतात मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या ६० वर्षीय वृद्ध महिलेवर दोघांनी मद्यप्राशन करून सामूहिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. एवढेच नव्हे तर या अमानुष प्रकारानंतर पीडित महिला आणि तिच्या पतीला कुऱ्हाडीने जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी तळेगाव पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुधीर रामचंद्र दूधकवरे (वय ४१) आणि मनोहर रतीराम ठाकरे (वय ३५), दोघेही रा. पार्डी, अशी पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला आणि तिचे पती मागील दोन महिन्यांपासून पार्डी येथील देवानंद टिपले यांच्या शेतात राखणदारी तसेच मजुरीचे काम करीत होते. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास महिलेचे पती घरगुती वस्तू आणण्यासाठी शेतातून बाहेर गेले होते. त्यानंतर सकाळी ८ वाजताच्या सुमारास महिला शेतात कापूस वेचण्यासाठी गेली.



याच संधीचा फायदा घेत शेजारील शेतात असलेल्या दोघांनी मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत महिलेच्या शेतात प्रवेश केला. त्यांनी तिची छेड काढत जबरदस्तीने मद्य पाजले आणि आळीपाळीने अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. काही वेळाने महिलेचा पती शेतात परतला असता त्याला घडलेल्या प्रकाराची माहिती मिळाली. मात्र, आरोपींनी उलट पती-पत्नीलाच कुऱ्हाडीने जीवे मारण्याची धमकी दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

धमक्यांच्या दहशतीत गप्प राहिले दाम्पत्य- घटनेनंतर भयभीत झालेल्या पीडित महिला आणि तिच्या पतीने सुरुवातीला कोणालाही याबाबत सांगितले नाही. आरोपींकडून सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याने हे दाम्पत्य दहशतीखाली होते. अखेर काही दिवसांनी त्यांनी एका नातेवाईक महिलेला आपबिती सांगितली. नातेवाईकांच्या मदतीने पीडित महिलेने तळेगाव पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत गुन्हा नोंदविला असून दोन्ही संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. वृद्ध महिलेवरील या गंभीर अत्याचाराच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पुढील तपास तळेगाव पोलीस करीत आहेत.

कार्यालय नगर परिषद, वर्धा

कार्यालय दूरध्वनी क्र.(०७१५२)२४३२७८ फॅक्स नं.(०७१५२)२३१७११

ई-मेल co.wardha@gmail.com

निविदा सूचना (१ ली वेळ)(सन २०२६-२७)

सर्व सार्वजनिक बांधकाम विभाग पंजीबध्द कंत्राटदारास याद्वारे सुचित करण्यात येते की, नगर परिषद निधी सन २०२६-२७ अंतर्गत खालील निर्देशित कामाकरीता निविदा मागविण्यात येत आहे. १ टक्का ईसार रक्कम दिलेल्या मुदतीत भरावयाची आहे. दिलेल्या मुदतीत न येणाऱ्या निविदा स्विकृत करता येणार नाही. तसेच निविदा मंजुरीचे व नामंजुरीचे संपूर्ण अधिकार मुख्याधिकारी वर्धा यांनी राखून ठेवले आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय किंमत	१ टक्का इसार रक्कम	निविदा किंमत (ना-परतावा नगदी रक्कम)	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१.	प्रभाग क्र.१८ मधील श्री.बेसेकर यांचे घरासमोरील खुल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे	८२५७६९	८३००	५००	६० दिवस

प्रसिध्दीचे वेळापत्रक

अ.क्र.	तपशील	दिनांक व वेळ
१.	निविदा प्रसिध्द करणे	दि.२६.११.२०२६ ला सकाळी १०.०० वाजता
२.	कोरी निविदा प्रसिध्द	दि.२६.११.२०२६ ला सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०४.१२.२०२६ ला सायं.५.०० वाजेपर्यंत
३.	सिलबंद निविदा सादर करणे	दि.२६.११.२०२६ ते ०४.१२.२०२६ ला वेळ सायं. ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून)
४.	निविदा उघडणे	दि.०७.१२.२०२६ ला वेळ सकाळी १०.०० वाजता शथ्य झाल्यास

सदर कामाचा सविस्तर तपशील बांधकाम विभाग नगर परिषद, वर्धा येथे कार्यालयीन वेळेत बघण्यासाठी उपलब्ध आहे.

स्वा/-	स्वा/-	स्वा/-	स्वा/-
(श्रीमती राखी पांडे)	(श्री.प्रदीपसिंग ठाकूर)	(श्री.सुधीर पांगुळ)	(श्री.विजय देशमुख)
बांधकाम सभापती	उप-नगराध्यक्ष	नगराध्यक्ष	मुख्याधिकारी
नगर परिषद वर्धा	नगर परिषद वर्धा	नगर परिषद वर्धा	नगर परिषद वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

राज्यातील ३३ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोफत धान्य मिळणार

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पुढील तीन महिन्यांसाठी माणशी ५ किलो धान्य

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन मुंबई शहर, उपनगर आणि ठाणे जिल्हा वगळता उर्वरित ३३ जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या शेतकऱ्यांना मोफत धान्य देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. याचा फायदा राज्यातील ४२ लाख ३० हजार ७८३ शेतकऱ्यांना मिळणार आहे. राज्यात अभूतपूर्व अशी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत ५ कोटी ७९ लाख ३४ हजार ७०२ लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य तर १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील २१ लाख ६० हजार ६८२ शेतकऱ्यांना दरमहा १७० रूपये दिले जातात. दोन्ही योजनांचा लाभ न मिळणाऱ्या शेतकरी कुटुंबांचा विचार करून त्यांनाही दर महिन्याला माणशी पाच किलो अन्नधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे धान्य पुढील तीन महिन्यांसाठी वितरीत करण्यात येईल. तसेच त्यापुढील काळासाठी आढावा घेऊन योजना सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत अन्नधान्याचा लाभ तसेच एपीएल-डिबीटी योजनेचा रोख लाभ मिळत नसलेल्या एकूण ३३ जिल्ह्यातील ४२,३०,७८३ शेतकऱ्यांना दरमहिन्याला माणशी ५ किलो (३) किलो तांदूळ ₹ २ किलो गहू) या प्रमाणात ३ महिन्यांकरिता मोफत धान्य देण्यात येणार आहे. आधार सीडिंग पूर्ण झालेल्या शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस मशीनद्वारे बायोमेट्रिक पडताळणी करून धान्य वाटप करण्यात येणार आहे. उर्वरित लाभार्थ्यांचे आधार सीडिंग पूर्ण करून घेतल्यानंतरच त्यांना बायोमेट्रिक पडताळणीद्वारे हे धान्य देण्यात येईल. या मोफत धान्य वितरणाकरिता आवश्यक असणारे अतिरिक्त नियतन केंद्र शासनाच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाकडून मागणी करण्यास मान्यता देण्यात आली.

आर्थिक फसवणुकीतील संस्थांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रिया जलद होणार

विभागीय स्तरावर एमपीआयडी न्यायाधिकरण, ९० दिवसांत प्रकरण निकाली निघणार

मुंबई/प्रतिनिधी आर्थिक फसवणूक करणाऱ्या संस्थांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रिया जलद राबविता येईल, तसेच त्यासाठी विभागीय स्तरावर स्वतंत्र एमपीआयडी न्यायाधिकरण स्थापन करण्यास व या प्रकरणात नव्वद दिवसांच्या आत प्रकरण निकाली काढण्याची कालमर्यादा निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियममध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. वित्तीय संस्थामधील ठेवींवर अवास्तव परताव्याचे आमिष दाखवून, गुंतवणूकदारांना फसवणाऱ्या संस्था व व्यक्तींविरूद्ध कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ कायदा करण्यात आला आहे. यात फसवणूकीस आळा घालण्यासाठी संबंधित वित्तीय संस्था, व्यक्ती यांच्या मालमत्ता जप्त करून करून, ही जप्ती विशेष न्यायालयाकडून अंतिम केली जाते. त्यानंतर यातील मालमत्तांच्या विक्रीतून येणाऱ्या रकमेतून फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांना रक्कम परत केली जाते. यातील जप्तीची प्रक्रिया जलद व्हावी याकरिता विशेष न्यायालयाऐवजी विभागीय स्तरावर स्वतंत्र एमपीआयडी न्यायाधिकरण स्थापन करण्याची तरतूद करण्यात येणार आहे. तसेच असे प्रकरण दाखल झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत ते निकाली काढण्याची कालमर्यादा घालण्यात येणार आहे. या संबंधीच्या तरतुदींचे सुधारणा विधेयक विधिमंडळात सादर करण्यास मंजुरी देण्यात आली.

जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण नळ पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

मुंबई, दि. २५ : जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण नळ पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करण्याबरोबरच वीजजोडणीअभावी रखडलेल्या योजनांना जोडणी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असलेल्या भागांतील नळ पाणीपुरवठा योजनांची कामेही प्राधान्याने पूर्ण करण्यात येणार आहेत. धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांतून आलेल्या मागणीनुसार चारा छावण्या सुरू करण्यास परवानगी देण्यात आली असून, चारा पुरवठ्यासाठी यापूर्वीचे दरही मंजूर करण्यात आले आहेत. गायरान जमिनीवर गोशाळा उभारण्यासाठी इच्छुक संस्थांना दोन ते तीन वर्षांसाठी भाडेपट्ट्याने जागा देणे तसेच ग्रामपंचायतींच्या प्रस्तावानुसार गायरान जमिनीवर दोन ते तीन एकर क्षेत्राचे छोटे तलाव उभारणे या पर्यायांवरही राज्य शासन विचार करीत असल्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले. राज्यात यापुढे पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत. नव्याने बांधण्यात येणाऱ्या प्रत्येक पुलासोबत पूलवजा बंधारा उभारून या माध्यमातून नदी-नाल्यांमध्ये किमान एक मीटर पाणी अडविणे बंधनकारक करावे, असे निर्देश महसूल मंत्री तथा दुष्काळसंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

वि.श्री.एस.एस.भिंगारदेव व ते सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

मिस्कील अर्ज क्र.२४११/२०२६
Sakshi Alpesh Wankhade +
1 Versus NIL
पुढील ता.२४.१२.२०२६.

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. Sakshi Alpesh Wankhade, Aged about 25 yrs. Occ. Household
R/o. Dhamdari, Amravati. Tq. & Dis.. Amravati
2. Shubha Ashok Wankhade,
Aged about.. 58 yrs..Occ- Household
R/o. PWD Office, Salebid, Nearwada,
Tq. Achalpur., Dist. Amravati

...Versus...

Non- Applicant - NIL

वि.श्री.एस.एस.भिंगारदेव व ते सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

मिस्कील अर्ज क्र.२४०७/२०२६
Sayara Bano Chand Khan
Versus NIL
पुढील ता.२४.१२.२०२६.

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. Sayara Bano Chand Khan
Age 65 yrs. Occ. Household
R/o Near Masjid, Parvati Nagar, VMV
Amravati, Tq. & Dist. Amravati- 444 601

...Versus...

Non-Applicant - NIL

वि.श्री.एस.एस.भिंगारदेव व ते सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

मिस्कील अर्ज क्र.२४११/२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. **Shahnaz Bi W/o Shaikh Hasan**, Age 53 yrs. Occ. - Household
2. **Shahin Bani W/o Mohammad Wasim Shaikh.**
Age 40 yrs.,Occ. Household
R/o Ward No. 16, Subhash Nagar, Pulgaon.
Tq. Pulgaon. Dist. Wardha
3. **Shamim Bano W/o Hamid Kha.** Age 38 yrs.Occ.- Household
R/o Walgaon Road, Back Side Of Shaida Masjid.
Mansar Nagar, Amravati. Tq. & Dist Amravati
4. **Shaikh Mohsin S/o. Shaikh Hasan** Age 32 yrs. Occ. - Labour
5. **Ahdul Wasim S/o. Shaikh Hasan** Age 36 yrs. Occ. - Labour
Applicant No. 1,4 & 5 All R/o. Kampas Pura,
Old Town. Badnera. Amdajan. Tq. & Dist. Amravati

...Versus...

Non- Applicant - NIL

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. **Sakshi Alpesh Wankhade**, Aged about 25 yrs. Occ. Household
R/o. Dhamdari, Amravati. Tq. & Dis.. Amravati
2. **Shubha Ashok Wankhade,**
Aged about.. 58 yrs..Occ- Household
R/o. PWD Office, Salebid, Nearwada,
Tq. Achalpur., Dist. Amravati

...Versus...

Non- Applicant - NIL

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. **Sayara Bano Chand Khan**
Age 65 yrs. Occ. Household
R/o Near Masjid, Parvati Nagar, VMV
Amravati, Tq. & Dist. Amravati- 444 601

...Versus...

Non-Applicant - NIL

जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री नंदू बाबाराव बेसमुख व श्री शशांक नंदू बेसमुख, रा.नंदनवन कॉलनी, अमरावती, ता.जि. अमरावती यांचे म्हणे दिलेल्या माहितीनुसार ते अधिकाराबरून मे. सहदेव & + ज्यांचेकडे ता.ही. कॉलेज येथे नोंदणी, पोंदणी पोटपुतळी अमरावती आमीन कार्यालयाचे कार्य क्षेत्रात व अमरावती टिळक तांरांगण अमरावतीत ग्रामपंचायत वसुद. ता.जि.अमरावती येथील भूमापन क्र.६/११/७७, क्षेत्रफळ ०.४०.४६ आर चौ.मी. (१०२७.६३ चौ.फुट) आकारणी ५५ पै. या प्लॉट व या प्लॉटची चतुरसीमा खालीलप्रमाणे पूर्वेस - लेआऊट मधील ९ मीटर रुंदीचा रस्ता,पश्चिमेस- प्लॉट क्र ८७ व ८९ उत्तरेस प्लॉट क्र.८६, दक्षिणेस प्लॉट क्र.९८

यावेळ वर्णनाची मिळकत माझे पक्षकार हे अविनाश शंकरराव उकंडे, रा.अमरावती यांचे कडून खरेदी करणार असल्याने सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा प्रकारचा मालकी हक्क, रुडमालकी हक्क, बरसालहक्क, बोजा, ग्लाज, तारण बक्षीस, विक्रिलर ९, इस खपाती, भे डेव्हलो.न्यायालयीन वाद. मनाई हुकूम अथवा अन्य कोणत्याही कायदेशिर हक्क किंवा हितसंबंध असल्यास, तसेच सदर मिळकत हस्तांतरीत करण्यास कोणाही व्यक्तीची हरकत असल्यास, अशा संबंधित व्यक्तीने या जाहीर नोटिसाच्या प्रसिध्दीपासून ७ दिवसांच्या आत आपले लेखी हरकत अर्ज वर संबंधीच्या मुळ कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष किंवा लेखी स्वरुपात सादर करावेत, विहीत मुदतीत कोणतीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा हक्क, हितसंबंध अथवा हरकत नाही, असे समजून पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित हरकतदारांची राहील.

सदर जाहीर नोटीसचा सार्वजनिकांच्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी प्रसिध्द करण्याचा मे. आहे.

खरेदी घेणार तर्फे अधिकृत
ॲड.निरंजन पुरुषोत्तमराव देशपांडे
"निरंजन" १४ ब, पूर्व भाग कॉलनी
स्कूल ऑफ स्पेशल साईन्सचे मागे, अमरावती
मो.९४१२२८७६५

ठिकाण - अमरावती
दिनांक - २५/११/२०२६

जाहीर सूचना

आम जनतेस व जाहीर सुचनेद्वारे सूचित करण्यात येते की, **नरेश नानासाहेब कडू व मोनिका नरेश कडू,रा.अमरावती** यांच्या नावाची मौजा वेलोरा, प्रगणे-वलगांव, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.४४ अ मधील प्लॉट नं.१५, क्षेत्रफळ १३१.४० चौ.मी.(१४१० चौ.फुट) ही नावलत्त आहे. या संबंधी असलेले मूळ खरेदीखत त्यांचे वर्णन :-

१.खरेदीखत दस्त क्र.१९६१/२०२१ (अमरावती ३) दि.२६/०३/२०२१ देणार तिलोककुमार रामचंद्र ताहेकर देणार शोभा तिलोकराव शिरभाते हर्क दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती हर्क इनेश्वर रामचंद्र राऊत १४ वा.अधिकार.

२. खरेदीखत दस्त क्र.४२८१/१९८५ (अमरावती शहर) दि.१७/०४/१९८५ देणार शोभा तिलायतकर ड शिरभाते देणार कुसुम श्रीकृष्णराव भस्कर.

सदर मूळ खरेदीखत माझे पक्षकाराकडून हरवले आहे. त्यासंबंधी रीतसर तक्रार सुध्दा माझे पक्षकार यांनी पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती येथे दिलेली आहे. तरी ज्या कुणाला सदर खरेदीखत सापडले असेल त्यांनी मला खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर किंवा पत्त्यावर संपर्क साधावा.

कार्यालय - "श्री" भागवत नगर, यशवंत कॉलेज मागे,
राईनगर, अमरावती. मो.क्र.- ९४८५४८५४/७८

अमरावती.
दिनांक २५/११/२०२६.

स्वाक्षरी/-
ॲडव्होकेट पंकज एन.ठाकरे

परिशिष्ट दहा, कलम ४
दिवाणी न्यायालय क.स्तर दर्यापूर
पुष्पम समीर दास यांचे न्यायालयात
सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, दर्यापूर, दर्यापूर, अमरावती

कारण दाखवा नोटीस (सर्वसाधारण नमुना)
(आदेश ३८, नियम ६)
मिस्कील अर्ज/१२१/२०२६
भाऊराव गुलाबराव राणे वि.मंगलाबाई नामोराव गोरले
पुढील तारीख : २३/१२/२०२६

प्रति,
ताई माणिकराव जामनेकर तर्फे वारस रमेश माणिकराव जामनेकर
रा.पिंपळोद, ता.दर्यापूर, जि.अमरावती

ज्याअर्थी, वर नमूद विनंती अर्जाची प्रत या न्यायालयाकडे मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ४ अन्वये वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज केलेला आहे, कारण तुम्ही या अर्जास हरकत घेऊ इच्छिता, असे दिसून येते, त्याअर्थी तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येते की, तुम्ही किंवा तुमचे वकील दि.२३.१२.२०२६ रोजी सकाळी ११ वाजता तुमची व अर्जदाराची साक्ष होऊन व पुराव्यानिशी हजर राहावे, तसे करण्यास तुम्ही चुकता तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

आज दिनांक ०५.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, दर्यापूर

ecourts.gov.in या संकेतस्थळावर पुढील प्रक्रियेची माहिती "eCourts Services" हे मोबाईल ॲप डाऊनलोड करा.

परिशिष्ट दहा, कलम ४
दिवाणी न्यायालय क.स्तर दर्यापूर
पुष्पम समीर दास यांचे न्यायालयात
सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, दर्यापूर, दर्यापूर, अमरावती

कारण दाखवा नोटीस (सर्वसाधारण नमुना)
(आदेश ३८, नियम ६)
मिस्कील अर्ज/१२१/२०२६
भाऊराव गुलाबराव राणे वि.मंगलाबाई नामोराव गोरले
पुढील तारीख : २३/१२/२०२३

प्रति,
मंगलाबाई नामोराव गोरले
प.क्र.८८ नगरी, बालाजी लेआउट, खरपीटाळली रोड, अकोला, ता.जि.अकोला

ज्याअर्थी, वर नमूदविनंती अर्जाची प्रत या न्यायालयाकडे मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ४ अन्वये वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्जा केलेला आहे, कारण, माझे पक्षकार यांनी हरकत घेतली आहे, त्याअर्थी तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येते की, दिनांक दि.२३.१२.२०२६ रोजी सकाळी ११ वाजता तुम्ही या अर्जाविरुध्द कारण दाखवीण्याकरीता हजर राहावे, तसे करण्यास तुम्ही चुकता तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

आज दिनांक ०७.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, दर्यापूर

ecourts.gov.in या संकेतस्थळावर पुढील प्रक्रियेसाठी भेट द्या किंवा "eCourts Services" हे मोबाईल ॲप डाऊनलोड करा.

परिशिष्ट दहा, कलम ४
दिवाणी न्यायालय क.स्तर दर्यापूर
पुष्पम समीर दास यांचे न्यायालयात
सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, दर्यापूर, दर्यापूर, अमरावती

कारण दाखवा नोटीस (सर्वसाधारण नमुना)
(आदेश ३८, नियम ६)
मिस्कील अर्ज/१२१/२०२६
भाऊराव गुलाबराव राणे वि.मंगलाबाई नामोराव गोरले
पुढील तारीख : २३/१२/२०२३

प्रति,
बाबाराव गुलाबराव राणे तर्फे त्याचे वारस विपाली बाबाराव राणे
रा.पिंपळोद, ता.दर्यापूर, जि.अमरावती

ज्याअर्थी, वर नमूदविनंती अर्जाची प्रत या न्यायालयाकडे मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ४ अन्वये वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्जा केलेला आहे, कारण, माझे पक्षकार तुम्हाला तारीख देऊनही येत नाही, तारीख दि.२३.१२.२०२६ रोजी सकाळी ११ वाजता तुम्ही या अर्जाविरुध्द कारण दाखवीण्याकरीता हजर राहावे, तसे करण्यास तुम्ही चुकता तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

आज दिनांक ०५.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, दर्यापूर

ecourts.gov.in या संकेतस्थळावर पुढील प्रक्रियेसाठी भेट द्या किंवा "eCourts Services" हे मोबाईल ॲप डाऊनलोड करा.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

नवे पर्व

नेपाळचे पंतप्रधान बालेंद्र शाह यांची दोन दिवसांची भारतभेट हा केवळ एक राजनैतिक दौरा नव्हता, तर भारत-नेपाळ सहकार्याच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरणारी भेट होती. नेपाळमध्ये मार्च महिन्यात जेन-झीने मोठे आंदोलन उभे केले आणि त्यातून सत्तांतर झाले. बालेंद्र शाह यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. पंतप्रधान झाल्यानंतरची त्यांची ही पहिलीच भारतभेट. बालेंद्र शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील थेट चर्चेत दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ करण्यावर विशेष भर देण्यात आला. भारताने नेपाळला पंधरा हजार कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य जाहीर केले. अयोध्या-जनकपूर थेट रेल्वेसेवेला सुरुवात झाली, तर ऊर्जा आणि दळणवळण क्षेत्रातील परस्पर सहकार्यासाठीही सामंजस्य करार झाले. मोदी आणि बालेंद्र चर्चेमुळे नवी दिल्ली आणि काठमांडू यांच्यात मध्यंतरी निर्माण झालेला दुरावा कमी होण्यास मदत होईल. दोन्ही देशांतील गैरसमज दूर होऊन परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण होण्याची प्रक्रिया या भेटीने सुरू झाली आहे. त्यामुळे ही भेट दोन्ही देशांच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. मध्यंतरी भारत-नेपाळ संबंधांत अंतर निर्माण झाले होते. नेपाळने चीनबरोबरचे संबंध आणि आर्थिक देवघेव वाढवली होती. त्यामुळे भारताच्या दृष्टीने काहीशी चिंतेची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, या भेटीमुळे हे मळभ दूर होण्यास निश्चितच मदत होऊ शकते. परराष्ट्र धोरण राबवताना दोन देशांच्या परस्पर अपेक्षा वाढतात, कधी अपेक्षाभंग होतो, तर कधी मतभेदही निर्माण होतात. मात्र, अशा वेळी संवादाचे दरवाजे खुले ठेवणे महत्त्वाचे असते. मोदी-बालेंद्र भेटीनंतर 'देर आए, दुरुस्त आए' असे म्हणता येईल.नेपाळच्या चीनशी असलेल्या संबंधांबाबत भारताने कधीही आक्षेपार्ह भूमिका घेतली नाही किंवा नेपाळशी असलेले संबंध मर्यादित करण्याचा प्रयत्न केला नाही. भारताने नेपाळबरोबर चर्चेचे आणि व्यापाराचे दरवाजे नेहमीच खुले ठेवले. संकट काळातही भारताने नेपाळला मदतीचा हात दिला आहे. ही मदत केवळ मानवतावादी दृष्टिकोनातून नव्हे, तर शेजारी राष्ट्र म्हणून असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यातून केली आहे. भारत आणि नेपाळचे संबंध केवळ राजनैतिक पातळीपुरते मर्यादित नाहीत. या नात्याला ऐतिहासिक, भावनिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अधिष्ठान लाभले आहे. प्रभू रामचंद्र आणि सीतामाता हे दोन्ही देशांतील जनतेचे श्रद्धास्थान आहे. दोन्ही देशांतील लाखो नागरिकांचे परस्परांशी कौटुंबिक आणि सामाजिक संबंध आहेत. व्यापार-व्यवसायातूनही दोन्ही देश एकमेकांशी जोडले गेले आहेत. त्यामुळे भारत-नेपाळचे नाते हे परंपरेने जपलेले आपलेपणाचे नाते आहे. या भेटीमुळे हे नाते अधिक दृढ होण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. पूर्वी विवाहसंबंधांतून दोन्ही देशांतील नाती अधिक घट्ट होत होती. आता रेल्वे आणि हवाई मार्गांच्या माध्यमातून व्यापार, पर्यटन आणि विकासाला चालना दिली जात आहे. मोदी आणि शाह यांची भेट दोन्ही देशांमधील विश्वासाचे नाते पुन्हा प्रस्थापित करण्याबरोबरच सहकार्याच्या नव्या संधी शोधण्याच्या दृष्टीने महत्त्वाची होती. बालेंद्र शाह यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचीही भेट घेतली. जयशंकर यांच्याशी त्यांनी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.बालेंद्र हे नेपाळमधील नव्या युवा पिढीचे प्रतिनिधित्व करतात. पारदर्शक कारभार, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकास हा त्यांच्या राजकीय अजेंड्याचा प्रमुख भाग आहे. या पार्श्वभूमीवर भारताने नेपाळला जाहीर केलेले पंधरा हजार कोटी रुपयांचे (नेपाळी चलनात सुमारे २४ हजार कोटी रुपये) आर्थिक सहाय्य ही या भेटीतील महत्त्वाची घोषणा ठरली. पूरग्रस्त भागांचे पुनर्वसन, पायाभूत सुविधा आणि ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी या मदतीचा उपयोग होणार आहे. ऑगस्ट महिन्यात आलेल्या महापुरामुळे नेपाळचे मोठे नुकसान झाले होते. या आपत्तीत मोठ्या प्रमाणावर जीवित आणि आर्थिक हानी झाली होती. त्यामुळे भारताची ही मदत नेपाळसाठी मोलाची ठरणार आहे. नेपाळमध्ये जलविद्युत निर्मितीची प्रचंड क्षमता आहे, तर भारत ही मोठी ऊर्जा बाजारपेठ आहे. त्यामुळे ऊर्जा क्षेत्र हे दोन्ही देशांमधील सहकार्याचे महत्त्वाचे क्षेत्र ठरू शकते. नेपाळमधून भारताला होणारा वीजपुरवठा वाढवणे आणि ऊर्जा व्यापाराचा विस्तार करणे, हे बालेंद्र शाह यांच्या भारतभेटीचे महत्त्वाचे फलित ठरू शकते. अशा भागीदारीमुळे दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल.रक्सौल-काठमांडू रेल्वेमार्ग विद्युतीकरणासह ब्रॉडगेज करण्यासाठीच्या सर्वेक्षण प्रक्रियेलाही आता गती मिळण्याची अपेक्षा आहे. काठमांडू-भैरहवा-लखनौ हा हवाई मार्ग दोन्ही बाजूंनी सुरू करण्यास सहमती दर्शवली आहे. यामुळे पर्यटन आणि व्यापाराला चालना मिळेल. धारचुला-दर्चुला पुलाचे उद्घाटनही करण्यात आले. तसेच गुजरातमधील कांडला (दीनदयाळ) बंदराचा वापर करण्यासाठी नेपाळला नवा मार्ग उपलब्ध करून देण्याची तयारी भारताने दर्शवली. या सर्व उपाययोजनांमुळे नेपाळच्या दळणवळण आणि व्यापारविषयक संधी वाढण्यास मदत होईल. बालेंद्र शाह यांच्या भारतभेटीत जवळपास आठ सामंजस्य करार झाले. संरक्षण आणि पोलिस क्षेत्रातील सहकार्य, आरोग्य व वैद्यकीय सेवा, तसेच पशुधन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील सहकार्यालाही यांमुळे चालना मिळणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'विकसित भारत आणि समुन्नत नेपाळ' ही नवी संकल्पना दोन्ही देशांनी भागीदारीसाठी स्वीकारली आहे.आर्थिक आणि विकासात्मक भागीदारी, अवकाश संशोधन, डिजिटल सेवा, स्टार्टअप आणि तंत्रज्ञान, ऊर्जा व जलसंपदा, रेल्वे-रस्ते आणि डिजिटल संपर्क व्यवस्था, व्यापार व गुंतवणूक तसेच नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत परस्पर सहकार्य करण्यास दोन्ही देशांनी मान्यता दिली आहे. नेपाळ हा भारताचा शेजारी देश असल्यामुळे भौगोलिक आणि सुरक्षेच्या दृष्टीने त्याचे विशेष महत्त्व आहे. भारत आणि चीन या दोन मोठ्या देशांच्या मध्ये नेपाळचे स्थान आहे. नेपाळमधील रस्ते, पूल, पायाभूत सुविधा, रेल्वे आणि ऊर्जा क्षेत्रांत चीनने मोठी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे भारताच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणात नेपाळला महत्त्वाचे स्थान आहे. एका बाजूला नेपाळमध्ये चीनची गुंतवणूक वाढत असताना दुसऱ्या बाजूला भारताशी चांगले संबंध टिकवून ठेवणे, हे बालेंद्र शाह यांच्यासमोरील आव्हान आहे. दोन्ही देशात किमान चार ठिकाणी सीमावादाचे प्रश्न आहेत. परस्पर विश्वास, सहकार्य आणि विकासाच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने मोदी-बालेंद्र शाह भेट महत्त्वपूर्ण ठरली आहे. या भेटीतील घोषणा आणि सामंजस्य करार प्रत्यक्षात कितपत प्रभावीपणे राबवले जातात, यावर भविष्यातील संबंधांची दिशा अवलंबून असेल. मात्र, या भेटीने भारत-नेपाळ संबंधांमध्ये नव्या संवादाची आणि सहकार्याची दारे खुली केली आहेत. त्यामुळे दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये एका नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे.

दडलेल्या 'फाइल्स', सुप्रिया सुळेंची मखलाशी आणि काँग्रेसचे गूढ मौन



सत्तेच्या सारीपाटावर प्रत्येक प्यादे उघडपणे चालवले जात नाही; काही चाली पडद्याआड दडवलेल्या 'सीक्रेट फाइल्स'च्या जोरावर खेळल्या जातात. राजकारणात एखाद्याने स्वतंत्र भूमिका घेण्याची किंवा बंडखोरी करण्याची भाषा केली की, जुन्या प्रकरणांची धूळ खात पडलेली एखादी फाइल बाहेर काढण्याची धमकी दिली जाते, हा आता सर्वमान्य अलिखित नियम बनला आहे. राज्यातील नेतृत्वाकडे अशा फाइल्स असल्याने एक फुटलेला गट पुन्हा माघारी फिरू शकत नसल्याची चर्चा खासगीत होत असते. अर्थातच खोक्यांचा विषयही ओघाने येतोच.

मागील निवडणुकीच्या काळात भाजप आणि दिवंगत नेते अजित पवार यांच्यात ठिणगी पडली, तेव्हा बंद केलेली फाइल पुन्हा उघडण्याचा इशारा दिला गेला होता. त्यावर 'माझ्याकडेही तशीच एक फाइल आहे,' असे प्रत्युत्तर देत अजित पवारांनीही माध्यमांसमोर दंड थोपटले होते. सत्तेच्या या दबाव तंत्राचे सूत्र लावून पाहिले, तर आज महाराष्ट्राच्या राजकारणात एक गंभीर प्रश्न उभा राहतो. शरद पवार यांच्याकडे काँग्रेसच्या बाबतीत असे कोणतेतरी मोठे 'गुपित' किंवा 'फाइल' दडलेली आहे का?

हा संशय बळावण्याचे कारण म्हणजे, ज्या मुद्द्यांवरून भाजपला थेट राजकीय फायदा होऊ शकतो, अशा भूमिका शरद पवार आणि त्यांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे अत्यंत सहजतेने घेताना दिसतात; तरीही काँग्रेस त्यावर ब्र शब्द उच्चारायला तयार नसते. याची पहिली प्रचिती २०१४ साली न मागता पाठिंबा अन त्यासाठी केलेली मल्लीनाथी सर्वश्रुत आहे. हे जुने. आता अलिकडे उद्योगपती गौतम अदानी यांच्या प्रकरणात ही प्रचिती थोडी जास्तच ठळकपणे आली. अदानी आणि भाजप सरकारचे घनिष्ठ संबंध नव्याने सांगण्याची गरज नाही. मधल्या काळात राहुल गांधींनी अदानींच्या मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांवर प्रचंड टीकेची झोड उठवत त्यांना अक्षरशः कोंडीत पकडून त्यांना गर्भगळीत केले होते. नेमक्या त्याच निर्णायक क्षणी शरद पवार मैदानात उतरले आणि अदानींची पाठराखण करत त्यांना अलगद चिमटीत पकडत या राजकीय कचाट्यातून बाहेर काढून 'सेफ' केले.'अदानी एक अतिशय कष्टाळू उद्योजक आहेत,' असे प्रशस्तिपत्रक पवारांनी दिले, ज्याचा संदर्भ त्यांच्या आत्मचरित्रातही आढळतो. काँग्रेसच्या मुख्य राजकीय अजेंड्याला थेट छेद देणारी ही खेळी असूनही काँग्रेसने त्यावर कोणताही कठोर आक्षेप घेतला नाही.

याच मालिकेतील ताजा अंक म्हणजे मतदारसंघ पुनर्रचना अर्थात 'डिलिमिटेशन'च्या प्रस्तावावर सुप्रिया सुळे यांनी केलेली मखलाशी. प्रत्येक राज्यात सरसकट ५० जागा (किंवा चर्चिल्या गेल्याप्रमाणे ५० टक्के) वाढवण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा देताना सुळे यांनी दिलेले कारण हे एकतर अत्यंत बाळबोध आहे किंवा निव्वळ राजकीय लबाडी आहे. त्यांच्या मते, 'मी पहिल्यांदा निवडून आले तेव्हा मतदारसंघ १३-१४ लाखांचा होता, जो आता २५ लाखांवर पोहोचला आहे. काही मतदारसंघ तर ३०-४० लाखांचे झाले आहेत. वर्षाला मिळणाऱ्या ५ कोटींच्या खासदार निधीतून इतक्या लोकांची कामे कशी करणार? आम्ही तर हात जोडून हा निधीच नाकारला आहे. इतक्या लोकांपर्यंत पोहोचणे अशक्य आहे; कोणी 'सुपरमॅन' असेल तर त्यालाही हे मॅनेज करणे जमणार नाही. असे म्हणत केवळ 'देशाच्या हितासाठी' या प्रस्तावाला पाठिंबा देण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

सुळे यांचा हा युक्तिवाद संसदीय लोकशाहीच्या मूलभूत रचनेचीच थट्टा करणारा आहे. मुळात खासदाराचे काम हे प्रत्येक मतदाराला वैयक्तिकरीत्या भेटत फिरण्याचे नसते. खासदार हा केंद्रात धोरणे आणि राष्ट्रीय योजना आखण्यासाठी निवडून दिला जातो. वाचकहो, तुम्ही स्वत;ला विचारा आयुष्यात कधी कोणत्या खासदाराकडे कधी कोणतं काम घेऊन गेलात? प्रत्यक्ष भेटलात? थेट जनतेत जाऊन त्यांच्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी आमदार असतात, जे आपल्याकडे मुळातच मतदारसंघात फार कमी फिरतात. सामान्य जनतेचा खरा आणि थेट संबंध हा शहरात नगरसेवक, सरपंच आणि ग्रामसेवक यांच्याशीच येत असतो. असे असताना, '२५ लाख लोकांपर्यंत पोहोचता येत नाही' आणि '५ कोटींचा निधी पुरत नाही' अशी तकलादू कारणे पुढे करणे, हे केवळ भाजपच्या प्रस्तावाचे समर्थन कसे योग्य आहे, हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे.

सुप्रिया सुळे यांनी मांडलेले कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंतचे हे गणितच मुळात वास्तवाशी विसंगत आणि दिशाभूल करणारे आहे. जर प्रत्येक राज्यात सरसकट ५० जागा वाढवल्या, तर गोव्यासारख्या अवघ्या २ खासदार असलेल्या लहान राज्यात ५२ जागा होतील, तर सिक्कीम, मिझोराम, नागालँड यांसारख्या ईशान्येकडील राज्यांत १ जागेवरून थेट ५१ जागा होतील. जे भौगोलिक आणि लोकसंख्येच्या दृष्टीने निव्वळ असंभव आहे. बरे, हे विधान ५० जागांचे नसून 'कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत ५० टक्के जागावाढीचे' आहे असे जरी मानले, तरी त्यातील धोका अधिकच गडद होतो. ५० टक्क्यांच्या सूत्राने गोव्याच्या २ जागा ३ होतील, सिक्कीमच्या १ जागेची दीड जागा कशी करणार? याउलट, उत्तर प्रदेशच्या ८० जागा थेट १२० होतील आणि बिहारच्या ४० जागा ६० वर जातील. म्हणजेच, ज्या राज्यांमध्ये भाजपचे प्राबल्य आहे, तिथे लोकसभेच्या जागांचा मोठा डोंगर उभा राहील आणि लहान राज्ये व दक्षिणेकडील राज्यांचा आवाज संसदेत कायमचा क्षीण होईल. हा सर्व खटाटोप केवळ मतदारांची संख्या कमी करण्यासाठी नसून, भविष्यात लोकसभेत प्रचंड आणि एकतर्फी बहुसंख्याक बळ मिळवून कोणतीही वादग्रस्त विधेयके सहज मंजूर करून घेणे आणि अंतिमतः देशाची राज्यघटनाच (संविधान) बदलण्याची ही दूरगामी राजकीय खेळी तर नाही ना, असा गंभीर संशय निर्माण होतो. विरोधकांनी या संभाव्य धोक्याविरोधात दंड थोपटणे अपेक्षित असताना, सुळे मात्र 'देशहिता'च्या नावाखाली या धोकादायक प्रयोगाचे समर्थन करत आहेत, हे अधिकच धक्कादायक आहे.

डिलिमिटेशन हा केवळ खासदार निधीचा किंवा मतदारसंघाच्या आकाराचा तांत्रिक प्रश्न नसून, तो देशाच्या आगामी राजकीय सत्तेचा समतोल ठरवणारा अत्यंत संवेदनशील मुद्दा आहे. म्हणूनच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी सुळे यांच्या भूमिकेला विरोध दर्शवत लोकसभेची सदस्यसंख्या न वाढवता अस्तित्वात असलेल्या जागांमध्येच पुनर्रचना करण्याची मागणी केली आहे. तरीही, महिला आरक्षण आणि समान सूत्राच्या अटीवर या प्रस्तावाला पाठिंबा देण्याची तयारी राष्ट्रवादीने (शरदचंद्र पवार) दर्शवली आहे.

येथेच सर्वसामान्य राजकीय निरीक्षकाचे लॉजिक थांबते. देशातील इतर कोणत्याही प्रादेशिक पक्षाने भाजपकडे साधे तिरक्या नजरेने जरी पाहिले, तरी काँग्रेसकडून त्या पक्षावर तात्काळ 'भाजपची बी-टीम' असा शिक्का मारला जातो. तो पक्ष बाटला गेला किंवा भ्रष्ट झाला, अशी टीका करण्यास काँग्रेस नेते कार्यकर्ते अन समर्थक क्षणभरही विलंब लावत नाही. मग अदानींच्या मुद्द्यावर राहुल गांधींना तोंडघशी पाडणाऱ्या आणि आता भाजप सरकारला सोयीस्कर ठरेल अशा डिलिमिटेशनच्या मुद्द्यावर तद्दन तकलादू कारणे देऊन पाठिंबा देऊ करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसबाबत काँग्रेसच्या तोंडाला कुलूप का लागले आहे? किंबहुना आजतागायत याबद्दल राहुल गांधीनी कोणतीही प्रतिक्रिया का दिली नाही?

जाता जाता शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी आणखी एक स्फोटक बॉम्ब टाकत डिलिमिटेशन विधेयकासाठी प्रति खासदार १५० कोटी रुपयांचा 'बाजार' मांडला गेल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. भाजपला हे विधेयक मंजूर करण्यासाठी ४०-४५ खासदारांची कमतरता असल्याने पक्ष फोडण्याचे आणि निधी पुरवण्याचे काम महाराष्ट्रातील एका मंत्र्याकडे सोपवल्याचा दावा राऊतांनी केला आहे. एका बाजूला राऊत या विधेयकामागे कोट्यवधींच्या घोडेबाजाराचा आरोप करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्याच आघाडीतील सुप्रिया सुळे मात्र 'देशहिता'ची भाषा करत या प्रस्तावाला पाठिंबा देण्याची भाषा करत आहेत. महाविकास आघाडीतील हा विरोधाभास जनतेला संभ्रमात टाकणारा असून, या '१५० कोटींच्या' आरोपांची धग नेमकी कोणापर्यंत पोहोचते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

राजकारणात काहीही विनाकारण घडत नसते. एकीकडे इतरांना 'बी-टीम' ठरवण्याची घाई करायची आणि दुसरीकडे राष्ट्रवादीच्या या भाजपपूरक मखलाशीकडे सोयीस्कर कानाडोळा करायचा, हे दुहेरी निकष सहज पचनी पडणारे नाहीत. काँग्रेसच्या या अगतिकतेमागे शरद पवारांकडे असलेली तीच 'अदृश्य फाइल' किंवा पडद्यामागील कोणतेतरी मोठे 'सीक्रेट' दडलेले आहे का, हा प्रश्न आता उघडपणे विचारला जाऊ लागला आहे. या प्रश्नाचे उत्तर कदाचित भविष्यातील राजकीय घडामोडींतूनच समोर येईल.

-मिलिंद धुमाळे

कृषी क्षेत्रापुढील संरचनात्मक आव्हाने

भारताची अर्थव्यवस्था शेतीच्या पलीकडे जात असताना शेतीवर अवलंबून असलेल्या कोटयवधी लोकांचे भविष्य अधिक सुरक्षित आणि समृध्द कसे करायचे, हेच आपल्या विकायाचे खरे आव्हान आहे.

पूर्वार्ध

भारताला जगभरात कृषिप्रधान देश म्हणून ओळखले जाते. ही ओळख केवळ ऐतिहासिक नाही, तर भारतीय अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, संस्कृती आणि ग्रामीण जीवनाचा पाया शेतीमध्ये आहे. हजारो वर्षांपासून भारतीय समाजाची घडण शेतीभोवती झाली आहे. आपले सण-उत्सव, परंपरा, आहारसंस्कृती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांचा शेतीशी अतूट संबंध आहे. मात्र स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरण, माहिती तंत्रज्ञान, सेवा क्षेत्राचा विस्तार आणि शहरीकरण यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप झपाट्याने बदलले आहे.आर्थिक पाहणी २०२५-२६ नुसार चालू किमतींवर शेती आणि संलग्न क्षेत्रांचा सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाटा सुमारे १५.२ टक्के आहे. दुसरीकडे, पिरियॉडिक लेबर फोर्स सर्वे (आवधिक श्रमशक्ती सर्वेक्षण) २०२५ च्या वार्षिक अहवालानुसार, देशातील सुमारे ४३ टक्के कामगार शेती क्षेत्रात कार्यरत आहेत. यातून एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो - देशातील ४३ टक्के कामगार शेतीत गुंतलेले असताना आणि राष्ट्रीय उत्पन्नातील तिचा वाटा केवळ १५.२ टक्के असताना भारताला अजूनही कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणावे का? भारत आणखी किती काळ कृषिप्रधान राहणार? हा प्रश्न केवळ अर्थव्यवस्थेपुरता मर्यादित नसून देशाच्या भविष्यातील रोजगार, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण विकासाशी संबंधित आहे.

हरितक्रांती ते अन्नसुरक्षा

१९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतासमोर अन्नधान्यटंचाईचे मोठे संकट होते. परदेशातून अन्नधान्य आयात करण्याची वेळ येत होती. मात्र हरितक्रांतीने भारतीय शेतीचा इतिहास बदलला. सुधारित वाण, रासायनिक खते, सिंचन सुविधा, कृषी संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्या साहाय्याने भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. भारत केवळ अन्नधान्य आयात करणारा देश राहिला नाही, तर जगातील प्रमुख उत्पादक देशांमध्ये त्याने स्थान मिळवले.केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने २७ मे २०२६ रोजी जाहीर केलेल्या २०२५-२६ च्या तृतीय आगाऊ अंदाजानुसार, भारताचे एकूण अन्नधान्य उत्पादन विक्रमी ३७६.५६ दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे. मागील वर्षीच्या ३५७.७३ दशलक्ष टन उत्पादनाच्या तुलनेत ही सुमारे ५.३ टक्के वाढ आहे. यामध्ये तांदळाचे उत्पादन १५४.०२ दशलक्ष टन, गव्हाचे १२०.६६ दशलक्ष टन आणि डाळवर्गीय पिकांचे उत्पादन २७.४१ दशलक्ष टन अपेक्षित आहे.हे आकडे भारतीय कृषी संशोधन, पीक सुधारणा, सिंचन आणि शेतकऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करतात. अर्थात, ही तृतीय आगाऊ अंदाजाची आकडेवारी असून अंतिम उत्पादन आकडे नव्हेत. उत्पादनात मोठी वाढ झाली असली तरी राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा कमी झाला आहे. कारण उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. माहिती तंत्रज्ञान, बँकिंग, वित्तीय सेवा, दूरसंचार, बांधकाम, वाहतूक, व्यापार आणि पर्यटन ही अर्थव्यवस्थेची प्रमुख क्षेत्रे बनली आहेत.

रोजगारातील विसंगती

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत रोजगाराचा मोठा भाग शेतीतून उद्योग आणि सेवा क्षेत्राकडे वळतो. अर्थशास्त्रात या प्रक्रियेला 'संरचनात्मक आर्थिक परिवर्तन' म्हणतात. पूर्व आशियातील अनेक देशांनी शेतीतून बाहेर पडलेल्या मनुष्यबळाला उत्पादन आणि औद्योगिक क्षेत्रात सामावून घेतले. भारतात मात्र सेवा क्षेत्राचा विस्तार औद्योगिक रोजगारनिर्मितीपेक्षा अधिक वेगाने झाला. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलले.परंतु रोजगाररचनेत तितका बदल झाला नाही. पीरियॉडिक लेबर फोर्स सर्वे २०२५ नुसार, शेतीतील रोजगाराचा वाटा २०२४ मधील ४४.८ टक्क्यांवरून २०२५ मध्ये ४३ टक्क्यांवर आला आहे. त्याच काळात उत्पादन उद्योगातील रोजगाराचा वाटा ११.६ टक्क्यांवरून १२.१ टक्क्यांपर्यंत वाढला. शेतीतील रोजगाराचा वाटा आणि जीडीपीमधील योगदान यातील तफावत प्रतिकामगार उत्पादकता कमी असल्याचे सूचित करते. अनेक कुटुंबांमध्ये एकाच शेतावर अनेक सदस्य काम करतात; मात्र त्यांच्या श्रमाच्या तुलनेत मिळणारे उत्पन्न मर्यादित असते याला छुपी बेरोजगारी असे म्हणतात. मात्र प्रत्येक शेतकरी किंवा शेतमजूर अतिरिक्त मनुष्यबळ आहे, असा निष्कर्ष चुकीचा ठरेल. शेती अन्नसुरक्षा, कच्चा माल, ग्रामीण रोजगार आणि सामाजिक स्थैर्य पुरवते. त्यामुळे शेतीतील रोजगार कमी करणे हे एकमेव उद्दिष्ट नसावे. शेतीतील उत्पादकता आणि उत्पन्न वाढविणे, तसेच शेतीबाहेर जाणाऱ्यांना सन्मानजनक रोजगार उपलब्ध करून देणे हे खरे उद्दिष्ट असले पाहिजे.

परिवर्तनातील अडथळा

भारतीय शेतीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जमिनीचे सातत्याने होणारे विभाजन. कृषी जनगणना २०१५-१६ नुसार, देशात सुमारे १४.६५ कोटी परिचालनात्मक शेतजमीन धारणा होत्या. सरासरी धारणा केवळ १.०८ हेक्टर होती. त्यापैकी सुमारे ८६ टक्के जमीनधारणा दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या होत्या. लहान शेतांमध्ये प्रति हेक्टर अधिक उत्पादन आणि पीक विविधीकरण शक्य असते. परंतु यांत्रिकीकरण, सिंचन, साठवणूक, कर्ज आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यासाठी शेतकऱ्यांना अनेक अडचणी येतात. शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), सहकारी संस्था, कृषी यंत्रसामग्री भाडेतत्त्वावरील केंद्रे, डिजिटल बाजारपेठा आणि सामूहिक विपणन यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

नैसर्गिक संसाधनांचे संकट

भारतीय शेतीचे भविष्य ठरविणारा महत्त्वाचा घटक म्हणजे पाणी. केंद्रीय भूजल मंडळाच्या २०२५ च्या राष्ट्रीय मूल्यांकनानुसार, देशातील वार्षिक भूजल पुनर्भरण ४४८.५२ अब्ज घनमीटर असून, उपशासाठी उपलब्ध संसाधने ४०७.७५ अब्ज घनमीटर आहेत. प्रत्यक्ष वार्षिक भूजल उपसा २४७.२२ अब्ज घनमीटर नोंदविण्यात आला आहे. म्हणजे उपलब्ध उपसा योग्य संसाधनांपैकी ६०.६३ टक्के भूजल वापरले जात आहे. पंजाब, हरियाना आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील भात-गहू पीकपद्धतीने भारताच्या अन्नसुरक्षेत ऐतिहासिक योगदान दिले; मात्र त्याच पद्धतीमुळे भूजलावर मोठा ताण निर्माण झाला आहे. ठिबक व तुषार सिंचन, पीक विविधीकरण, शून्य मशागत, पीक अवशेष व्यवस्थापन आणि संवर्धनात्मक शेती यांना प्रोत्साहन द्यावे लागेल. भारताची अर्थव्यवस्था शेतीच्या पलीकडे जात असताना शेतीवर अवलंबून असलेल्या कोट्यवधी लोकांचे भविष्य अधिक सुरक्षित आणि समृद्ध कसे करायचे, हेच आपल्या विकासाचे खरे आव्हान आहे.

डॉ. किरण गायकवाड
मो.९९५३२५८२३४
(लेखक भारतीय कृषी संशोधन संस्थेत वरिष्ठ शास्त्रज्ञ आहेत.)

गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

२३ वर्षांनंतर पोलिसांच्या वर्दीवर हत्येच्या आरोपांचे सावट!

कोठडीतील दोन तरुणांच्या मृत्यूप्रकरणी सहा पोलिसांविरुद्ध खटल्याची प्रक्रिया तत्कालीन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चौकशीचेही न्यायालयाचे निर्देश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २५ : तब्बल २३ वर्षांपूर्वी पोलीस कोठडीत मृत्यू झालेल्या दोन तरुणांच्या प्रकरणाने पुन्हा एकदा पोलीस विभागात खळबळ उडवली आहे. सन २००३ मधील या गाजलेल्या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) तपासानंतर आता सहा पोलिसांविरुद्ध नव्याने आरोप निश्चित करून खटल्याची प्रक्रिया पुढे नेण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याची माहिती आहे. तत्कालीन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या भूमिकेची ही चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आल्याने जुन्या प्रकरणाला पुन्हा उजाळा मिळाला आहे. २००३ मध्ये यवतमाळातील बजाज कुटुंबीयांच्या निवासस्थानी दरोडा पडला होता. या प्रकरणाच्या तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने अजय मधुकर मोहिते (१९) आणि नेर तालुक्यातील घुई येथील सुरेश रामभाऊ सोनकुसरे (२१) या दोन तरुणांना संशयित म्हणून ताब्यात घेतले होते. मात्र, १ मे २००३ रोजी दोघांचाही पोलीस कोठडीत संशयास्पद मृत्यू झाला. पोलिसांच्या मारहाणीमुळे आणि विषप्रयोगा मुळे तरुणांचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांच्या नातेवाइकानी केला होता. या घटनेचे जिल्हाभर तीव्र पडसाद उमटले होते. प्रकरणाचा तपास सीबीआय कडे सोपविण्यात आला. सुरुवातीच्या आरोपपत्रात तत्कालीन पोलीस अधीक्षक अमितेश कुमार यांच्यासह काही व्यक्तींना आरोपी करण्यात आले नव्हते. तर तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक दिलदार तडवी, पोलीस उपनिरीक्षक तलवार व गवई तसेच पोलीस कर्मचारी प्रभाकर काळे, शकील आणि गणपत गिनगुले यांच्याविरुद्ध निष्काळजी पणाची जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. मात्र, या तपासावर असमाधान व्यक्त करीत मृत अजय मोहिते यांचे वडील मधुकर मोहिते आणि सामाजिक कार्यकर्ते शैलेश ठाकूर यांनी विशेष न्यायालयात धाव घेतली. केवळ निष्काळजी पुरती कारवाई मर्यादित न ठेवता मृत्यूच्या घटनांची सखोल चौकशी करून हत्येच्या आरोपांवर खटला चालविण्याची मागणी त्यांनी केली. आता न्यायालयाच्या नव्या निर्देशामुळे या प्रकरणातील जबाबदारी निश्चित होण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू होणार आहे. दोन तरुणांचा कोठडीत मृत्यू नेमका कसा झाला, त्यावेळी बंदोबस्त आणि देखरेखीची जबाबदारी कोणाची होती आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका काय होती, या प्रश्नांची उत्तरे न्यायालयीन प्रक्रियेतून समोर येणे अपेक्षित आहे. दोन दशकानंतरही न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या कुटुंबीयांसाठी ही घडामोड महत्त्वाची ठरणार आहे.

वैध सावकारीच्या संशयावरून बंजारा कॉलनीत दोन ठिकाणी धाडी..! आठ आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त

सहकार, महसूल आणि पोलिसांची संयुक्त कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. २५ : शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचनेचा फायदा घेत अवैध सावकारीचे व्यवहार सुरू असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर पुसद शहरातील बंजारा कॉलनीत प्रशासनाने दोन ठिकाणी एकाचवेळी धाडी टाकल्या. सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी सहकार, महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने केलेल्या या कारवाईत खरेदीखतांच्या छायांकित प्रती, विविध चिठ्ठ्या आणि डायरीसह आठ आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आली. त्यामुळे परिसरातील कथित अवैध सावकारी व्यवहारांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

बंजारा कॉलनीतील रहिवासी अरुण प्रल्हाद चव्हाण यांनी प्रभु उत्तमलाल जयस्वाल आणि पुनम प्रभु जयस्वाल यांच्याविरुद्ध अवैध सावकारी व्यवहाराबाबत जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अर्चना माळवी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत सावकारी पथकाने श्रीरामपूर, पुसद येथील संबंधितांच्या निवासस्थानी झडती घेतली. या झडतीत आठ संशयास्पद कागदपत्रे मिळून आली असून ती तपासासाठी जप्त करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, खरेदीखतांच्या प्रती, चिठ्ठ्या आणि डायरीतील नोंदींमधून नेमके कोणते व्यवहार समोर येतात, याकडे आता लक्ष लागले आहे. जप्त कागदपत्रांची सखोल पडताळणी केल्यानंतर सावकारी अधिनियमातील तरतुदींनुसार पुढील कारवाई प्रस्तावित केली जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक के. एस. मस्के यांच्या नियोजनाखाली ही कारवाई करण्यात आली. पथकात सहकार अधिकारी सी. आर. राठोड, एम. एस. चव्हाण, सहाय्यक सहकार अधिकारी ए. एम. काळमोरे, कनिष्ठ लिपिक ए. एम. काळे यांच्यासह पंच, पोलीस कर्मचारी आणि व्हिडीओ ग्राफर सहभागी होते. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा निबंधक (सावकारी) आणि पुसद तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली. मात्र, धाडीपुरतीच कारवाई मर्यादित न राहता जप्त कागदपत्रांमधील व्यवहारांची निष्पक्ष चौकशी करून अवैध सावकारी सिद्ध झाल्यास कठोर कारवाई होणार का, हा प्रश्न आता महत्त्वाचा ठरणार आहे.

थोडक्यात



पुसदच्या नवलबाबा वार्डात दोन धारदार शस्त्रांसह तरुणाला अटक

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई;लोखंडी सुरा व स्टीलचा चाकू जप्त!

पुसद:शहरातील नवलबाबा वार्ड परिसरात धारदार शस्त्रे बाळगून सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करण्याच्या तयारीत असलेल्या एका तरुणाला यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. ही कारवाई २४ नोव्हेंबर रोजी ताडी दुकान गल्ली परिसरात करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी एक धारदार लोखंडी सुरा आणि स्टीलचा चाकू जप्त केला आहे.

यवतमाळ जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणे, अवैध धंदे, अवैध उत्खनन तसेच प्रलंबित गुन्ह्यांचा छडा लावून गुन्हेगारांवर प्रभावी कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक कुमार चिंथा यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांनी पथकांना गोपनीय माहिती संकलित करून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

महागाव तालुका शिक्षक समन्वय कृती समितीची नवी कार्यकारिणी

अध्यक्षपदी रमेश पवार, सचिवपदी प्रल्हाद राठोड यांची सर्वानुमते निवड

महागाव : तालुक्यातील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, हक्क आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध समस्यांना संघटितपणे वाचा फोडण्यासाठी महागाव तालुका शिक्षक समन्वय कृती समितीची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली. सोमवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी पंचायत समिती महागाव येथे विविध शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी रमेश देविदास पवार, तर सचिवपदी प्रल्हाद देवसिंग राठोड यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी संजय करेवाड व सचिन खटके, कार्याध्यक्षपदी शंकर जायम्हेत्रे, सहसचिवपदी भोजराज पाटील व बाबुराव खंदारे, तर प्रसिद्धी प्रमुखपदी अनुप पंडित यांची जबाबदारी सोपविण्यात आली. सल्लागार म्हणून रामराव टेकाळे, डॉ. अवधूत वानखेडे व मारोती डुकरे, कोषाध्यक्षपदी व्यंकटेश बोईनवाड, तर सहकोषाध्यक्षपदी दाऊद खान व मारोती डुकरे यांची निवड करण्यात आली. यावेळी गटशिक्षणाधिकारी संजय कांबळे व शिक्षण विस्तार अधिकारी विजय बेतेवाड यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. बैठकीला गोकुळ राठोड, गजानन नांदेडकर, रमेश खंदारे पाटील, पुंडलिक पोले व संभाजी निंबाळकर यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. केवळ पदाधिकाऱ्यांच्या निवडीपुरते समितीचे काम मर्यादित न राहता शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांसाठी ठोस भूमिका घेऊन प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याचे आव्हान नव्या कार्यकारिणीसमोर असणार आहे. शिक्षकांच्या प्रश्नांवर संघटनात्मक एकजूट किती प्रभावी ठरते, याकडे आता तालुक्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.



उमरखेड येथे सुरू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंदोलनाला महागावमधून पाठिंबा

स्मारक परिसरातील अतिक्रमण हटवून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे अनावरण करण्याची मागणी

महागाव : उमरखेड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक परिसरातील अतिक्रमण हटवून स्मारकाचे अनावरण करण्यात यावे, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्या सरोजताई देशमुख यांचे १४ नोव्हेंबरपासून बेमुदत उपोषण सुरू आहे. त्यांच्या आंदोलनाला महागाव येथील सामाजिक कार्यकर्ते व समाजबांधवांनी भेट देत जाहीर पाठिंबा दिला. उपोषणाचे दहा दिवस उलटूनही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही न झाल्याने समर्थकांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. उपोषणामुळे सरोजताई यांची प्रकृती खालावत असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. प्रशासनाने तातडीने मागणी मान्य करून स्मारकाचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा महागाव येथे संवैधानिक मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. याप्रसंगी मराठा सेवा संघाचे महागाव तालुका अध्यक्ष उदय नरवाडे, प्रमोद जाधव, डॉ. संदीप शिंदे, सतीश ठाकरे, आशीष गावंडे, अतुल शिंदे, चतुर्वेद अडकिने आदी उपस्थित होते.

मुकुटबन चुनखडी खाणीत पर्यावरण व खनिज संवर्धनाचा जागर..!

३७ व्या सप्ताहात खाण व्यवस्थापनाच्या कामगिरीची निरीक्षण पथकाकडून दखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



झरी, दि. २५ : मेसर्स RCCPL प्रा. लि. यांच्या मुकुटबन येथील चुनखडी व डोलोमाइट खाणीत ३७ व्या खान पर्यावरण व खनिज संरक्षण सप्ताहांतर्गत निरीक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी निरीक्षण पथकाने खाणकामाची कार्यपद्धती, सुरक्षा व्यवस्था, पर्यावरण संवर्धन आणि खनिज संरक्षणाच्या उपाययोजनांची सविस्तर पाहणी करून खाण व्यवस्थापनाच्या कामकाजाची दखल घेतली.

कार्यक्रमाला कंपनीचे युनिट प्रमुख सुनील सूद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. निरीक्षण पथकाचे नेतृत्व माणिकगड सिमेंट वर्क्स, अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेडचे डीजीएम (माइन्स) एस. एम. सरपटवार यांनी केले. पथकात श्रीमंत सत्पथी आणि अजित पाल यांचा समावेश होता. निरीक्षणादरम्यान वैज्ञानिक खाणकाम, कामगार सुरक्षा, वृक्षारोपण, जलसंधारण, जमिनीचे पुनर्वसन, स्वच्छता तसेच वैधानिक नियमांच्या अंमलबजावणीची पाहणी करण्यात आली. खाण विभागप्रमुख के. के. राठोड यांनी सादरीकरणातून खनिज संवर्धन, शाश्वत खाणकाम आणि पर्यावरण संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. पाहणीनंतर सरपटवार आणि सत्पथी यांनी खाणीतील स्वच्छता, हरित विकास, खनिज संवर्धन व पर्यावरण व्यवस्थापनाचे कौतुक केले. कर्मचाऱ्यांची संघभावना आणि व्यवस्थापनातील समन्वय इतरांसाठी अनुकरणीय असल्याचे त्यांनी नमूद केले. समारोपप्रसंगी सुनील सूद यांनी नैसर्गिक संसाधनांचा वैज्ञानिक व जबाबदार वापर करण्याचे आवाहन केले. खनिज संपत्तीचे संवर्धन आणि भावी पिढ्यांसाठी पर्यावरणाचे रक्षण ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या उपक्रमातून मुकुटबन खाण व्यवस्थापनाने पर्यावरणपूरक आणि शाश्वत खाणकामाप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली.

प्रवाशांच्या मागणीला अखेर यश! चंद्रपूर–मुकुटबन बससेवा पुन्हा सुरू; नागरिकांना मोठा दिलासा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



झरी, दि. २५ : गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेल्या चंद्रपूर–मुकुटबन बससेवेला अखेर पुन्हा सुरुवात झाली असून, या निर्णयामुळे मुकुटबनसह परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांच्या मागणीची दखल घेत आमदार देवराव भोंगळे यांनी केलेल्या पुढाकाराला यश आले आहे.

मुकुटबन येथे शनिवारी आयोजित रक्तदान शिबिराला भेट देण्यासाठी आमदार देवराव भोंगळे आले असता, परिसरातील नागरिकांनी त्यांची भेट घेऊन चंद्रपूर–मुकुटबन तसेच राजुरा–मुकुटबन बससेवा पूर्ववत सुरू करण्याची मागणी केली होती. यासंदर्भात नागरिकांनी त्यांना निवेदनही दिले होते. नागरिकांची अडचण लक्षात घेऊन आमदार भोंगळे यांनी तातडीने चंद्रपूर आगाराशी संपर्क साधला आणि बंद असलेली बससेवा पुन्हा सुरू करण्याबाबत पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने चंद्रपूर–मुकुटबन बससेवा सुरू करण्यात आली आहे. या बससेवेचा लाभ मुकुटबन, घुग्घुस, चारगाव चौकी, शिरपूर, वेळाबाई, कृष्णानपूर, मोहदा, टुंड्रा आणि परिसरातील गावांतील नागरिकांना होणार आहे. विशेषतः चंद्रपूर येथे शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसेच वैद्यकीय उपचारांसाठी जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार आहे. बससेवा बंद असल्यामुळे नागरिकांना प्रवासासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. आता बस पुन्हा सुरू झाल्याने प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नागरिकांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत बससेवा सुरू झाल्याने परिसरातून समाधान व्यक्त होत असून, राजुरा–मुकुटबन बससेवाही नियमित सुरू करण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

लाखोंचा खर्च पाण्यात मुकुटबनकरांच्या घशात अशुद्ध पाणी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. २५ : नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेल्या जलशुद्धीकरण केंद्रातूनच अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप मुकुटबन येथील ग्रामस्थांनी केला आहे. वार्ड क्रमांक ३ मधील केंद्रातून येणाऱ्या पाण्याचा रंग बदललेला असून ते पिण्यायोग्य नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

त्यामुळे लाखो रुपयांचा खर्च करूनही नागरिकांच्या पदरी अशुद्ध पाणीच पडत असेल, तर या योजनेचा नेमका उपयोग काय, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, केंद्रातून पुरवठा होणारे पाणी पाहिल्यानंतर त्याच्या शुद्धतेबाबत शंका निर्माण होत आहे. पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता संशयास्पद असताना नागरिकांनी ते वापरायचे तरी कसे? दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका निर्माण होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित इतका गंभीर प्रश्न निर्माण होऊनही संबंधित यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा सवालही उपस्थित होत आहे.



पाणी शुद्ध असल्याचा पुरावा द्या, मगच पैसे घ्या!

जलशुद्धीकरण केंद्रातून पुरवठा होणाऱ्या पाण्याचे नमुने तातडीने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत. तपासणी अहवाल सार्वजनिक करावा आणि पाणी पिण्यास सुरक्षित असल्याची खात्री झाल्यानंतरच पाणीपट्टी वसूल करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाने केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष परिस्थितीची तपासणी करावी. केंद्राच्या कामाची गुणवत्ता, देखभाल आणि पाणी शुद्धीकरण प्रक्रियेची चौकशी करून दोषींवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी होत आहे. शुद्ध पाण्याच्या नावाखाली लाखोंचा खर्च आणि प्रत्यक्षात अशुद्ध पाण्याचा पुरवठा, हा नागरिकांच्या आरोग्याशी खेळ नाही काय? असा बोचरा प्रश्न आता मुकुटबनकरांकडून उपस्थित केला जात आहे.

महाराष्ट्राच्या विकासातील योगदानाची उपराष्ट्रपती कडून प्रशंसा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २५ : महाराष्ट्राच्या विकासात स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे गौरवोद्गार उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले. स्वातंत्र्यलढ्यापासून ते राज्याच्या औद्योगिक विकासापर्यंत त्यांनी दिलेले योगदान स्मरणीय असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रियदर्शनी सहकारी सुतगिरणी परिसरात उभारण्यात आलेल्या पूर्णाकृती कांस्य पुतळ्याचे अनावरण उपराष्ट्रपतींच्या हस्ते डिजिटल पद्धतीने करण्यात आले. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, माजी खासदार विजय दर्डा, माजी मंत्री राजेंद्र दर्डा, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार बाळासाहेब मांगुळकर, नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्यासह लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जवाहरलाल दर्डा हे स्वातंत्र्यसैनिक, दूरदृष्टीचे नेते आणि लोकसेवेला वाहून घेतलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेऊन तुरुंगवास भोगला. स्वातंत्र्यानंतर मंत्री म्हणून उद्योग, ऊर्जा आणि गृहनिर्माण क्षेत्रात योगदान दिले. औद्योगिक धोरणातून महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राला दिशा देण्यासोबतच यवतमाळच्या विकासासाठीही त्यांनी प्रयत्न केले. विकासाच्या संधी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, ही त्यांची भूमिका होती, असे उपराष्ट्रपती म्हणाले. शेतकऱ्याचा मुलगा असल्याचा उल्लेख करताना त्यांनी शेतकऱ्यांचा विकास विसरता कामा नये, असे आवाहन केले. विकसित भारत २०४७, वस्त्रोद्योगाचे भविष्य, छत्रपती शिवाजी महाराज आणि तामिळनाडूचे ऐतिहासिक संबंध तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचाही त्यांनी उल्लेख केला. शिवाजी महाराज हे संपूर्ण राष्ट्राचे राजे असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर मान्यवरांनी सुतगिरणीची पाहणी केली. विजय दर्डा यांनी प्रास्ताविकातून जवाहरलाल दर्डांच्या समाजसेवा, विदर्भ विकास आणि शेतकरी समृद्धीविषयक कार्याचा आढावा घेतला.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसोबत भोजन

जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर उपराष्ट्रपतींनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसोबत भोजन करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार त्यांनी या कुटुंबीयांसोबत भोजन करून त्यांच्याप्रती संवेदनशीलता व्यक्त केली. मात्र, शेतकरी कुटुंबांचे दुःख आणि जिल्ह्यातील शेतीसमोरील संकटे केवळ सहवेदनेपुरती न राहता त्यावर ठोस उपाययोजनांची गरज असल्याचा प्रश्नही या भेटीच्या निमित्ताने अधोरेखित झाला.

लाल मातीच्या आखाड्यात देशभरातील पैलवानांचा दमदार फड,यवतमाळात कुस्तीची विराट दंगल!

पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेशासह विविध राज्यांतील नामवंत मल्लांचा सहभाग

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २५ : स्वातंत्र्य संग्राम सेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्री हनुमान आखाड्याच्या प्रांगणात बुधवार, २५ नोव्हेंबर रोजी आयोजित भव्य इनामी काटा कुस्त्यांच्या विराट दंगलीत देशभरातील पैलवानांनी आपल्या ताकदीचा आणि कौशल्याचा कस लावला. लाल मातीतील या कुस्ती दंगलीने यवतमाळच्या क्रीडाप्रेमींना रोमांचकारी अनुभव दिला.

पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान यांसह देशातील विविध राज्यांमधून नामांकित पैलवान मोठ्या संख्येने यवतमाळमध्ये दाखल झाले होते. सर्व वयोगटांतील मल्लांनी आखाड्यात उतरून प्रतिस्पर्ध्याला चितपट करण्यासाठी जोरदार डावपेच आजमावले. विशेष म्हणजे राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी केलेल्या नॅशनल चॅम्पियन पैलवानांची दमदार एन्ट्री आणि त्यांच्या चुरशीच्या कुस्त्या हे या दंगलीचे प्रमुख आकर्षण ठरले. या लढती पाहण्यासाठी कुस्ती प्रेमी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या दंगलीत पहिल्या क्रमांकासाठी एक लाख, दुसऱ्यासाठी ७१ हजार, तिसऱ्यासाठी ५१ हजार, तर चौथ्या क्रमांकासाठी ४१ हजार रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले होते. याशिवाय ३१ हजार, २५ हजार, २१ हजार, १५ हजारांसह विविध क्रमांकांच्या कुस्त्यांसाठी बक्षिसांची तरतूद करण्यात आली होती. लहान-मोठ्या अशा अनेक कुस्त्यांचे जोड लावण्यात आले. एकूण १५ लाख रुपयांच्या इनामी बक्षिसांची घोषणा करण्यात आली होती. स्वातंत्र्य संग्राम सेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासोबतच हनुमान आखाड्यातील दिवंगत कुस्तीगीरांच्या स्मरणार्थ या दंगलीचे आयोजन करण्यात आले. यवतमाळ जिल्हा कुस्तीगीर संघाच्या पुढाकारातून पार पडलेल्या या आयोजनाने पारंपरिक कुस्ती संस्कृतीचे सामर्थ्य पुन्हा अधोरेखित केले.

महागाव-फुलसावंगी महामार्गावर रोजचा 'चक्काजाम'!

लाखोंचा सेस वसूल करूनही 'महागाव बाजार समिती' सुस्त का?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



फुलसावंगी, दि. २५ : जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून मिरवणाऱ्या फुलसावंगी बाजारपेठेला सध्या मुजोर व्यापारी आणि नाकर्त्या प्रशासनाचे ग्रहण लागले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशस्त प्रांगणात शेतमालाची खरेदी करण्याऐवजी येथील २५ ते ३० कापूस व भुसार व्यापाऱ्यांनी थेट महागाव-फुलसावंगी हमरस्त्यावरच आपले बस्तान मांडले आहे.

व्यापाऱ्यांच्या या मनमानी कारभारामुळे आणि बाजार समितीच्या 'अर्थपूर्ण' दुर्लक्षामुळे या मुख्य रस्त्यावर दररोज सकाळी ८ ते १० वाजेदरम्यान वाहतूक कोंडीचा महापूर येत असून, सर्वसामान्य प्रवाशांचा जीव टांगणीला लागला आहे. फुलसावंगी येथील बाजारपेठेत दररोज महागाव, पुसद, उमरखेड, आर्णी यांसह शेजारील नांदेड जिल्ह्यातील किनवट व माहूर तालुक्यातून हजारो क्विंटल कापसाची आवक होते. मात्र, बाजार समितीच्या यार्डात जाण्याऐवजी हे मुजोर व्यापारी थेट मुख्य रस्त्यावरच कापूस व भुसार मालाचा लिलाव पुकारत आहेत. परिणामी, हमरस्त्यावर शेतमालाच्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, संपूर्ण रस्ता अक्षरशः गिळंकृत केला जात आहे. या वाहतुकीच्या कोंडीत एसटी बसेस, शाळा-महाविद्यालयांत जाणारे विद्यार्थी, नोकरदार आणि अत्यवस्थ रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका तासन् तास अडकून पडत आहेत. 'एक-एक तास जागेवरच खोळंबून राहावे लागत असल्याने प्रवाशांच्या सहनशीलतेचा अंत होत आहे. रस्त्यावरून वाट काढण्याच्या वादातून दररोज लहान-मोठे वाद आणि भांडणाचे प्रसंग उद्भवत असून, एखादी मोठी दुर्घटना घडल्यास याला जबाबदार कोण?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. विशेष म्हणजे, कृषी उत्पन्न बाजार समिती (महागाव) या व्यापाऱ्यांकडून दरवर्षी तब्बल ३० ते ४० लाख रुपयांचा 'सेस' (बाजार फी) वसूल करते. इतका मोठा महसूल मिळवूनही बाजार समिती प्रशासन या व्यापाऱ्यांना यार्डात माल खरेदी करण्यासाठी बाध्य का करत नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासनाच्या या बोटचेप्या भूमिकेमुळे व्यापाऱ्यांची 'मनोपली' आणि मुजोरी चांगलीच वाढली आहे. जनतेला वेठीस धरून रस्त्यावर बाजार भरवणाऱ्या या मुजोर व्यापाऱ्यांवर आणि झोपेचे सोंग घेतलेल्या बाजार समिती प्रशासनावर महसूल व पोलीस प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा संतप्त नागरिक व प्रवाशांकडून दिला जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

१ डिसेंबरपासून अंजनगाव सुर्जी उपविभागातील

६९ गावांना आता दोन दिवसाआड पाणीपुरवठा

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

आगामी उन्हाळ्यात संभाव्य पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंजनगाव सुर्जी उपविभागाने आतापासूनच पाणीपुरवठ्याचे नियोजन सुरू केले आहे. त्यानुसार उपविभागांतर्गत प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील ६९ गावांना येत्या १ डिसेंबर २०२६ पासून १० टक्के पाणी कपात करून दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन उपविभाग अंजनगाव सुर्जीचे उपविभागीय अभियंता यांनी दि. १८ रोजी यासंदर्भात सर्व ग्रामपंचायतींच्या सरपंच व सचिवांना पत्र पाठवून आवश्यक सूचना दिल्या आहेत. पत्रात नमूद केल्यानुसार, सध्या शहानूर धरणातील पाणीसाठ्यात घट होत असून, उपलब्ध पाणीसाठ्यापैकी सुमारे ७० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. आगामीऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याने १ डिसेंबरपासून दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय



घेण्यात आला आहे. दरम्यान, ग्रामपंचायत स्तरावर नागरिकांमध्ये जनजागृती करून पाणीटंचाईबाबत माहिती द्यावी, नळजोडणीला तोट्या बसवाव्यात, पाण्याचा अपव्यय टाळावा तसेच उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाइ 'चे संकट अधिक तीव्र होऊ नये, यासाठी नागरिकांनी पाण्याचा अनावश्यक वापर टाळून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे आहे. या नियोजनाच्या अंमल बजावणीसाठी ग्रा.पं. सहकार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंजनगाव सुर्जी उपविभागाकडून करण्यात आले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दर्यापूरच्या वतीने येथे १ डिसेंबर २०२६ पासून एक दिवस पाणीपुरवठा सुरू आहे तो आता दोन दिवस आड होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी शक्य तेवढी आवाहन मजीप्राचे पाण्याची बचत करावी, असे उपविभागीय अभियंता अतुल काटे यांनी केले

कुऱ्हा नगरीत भक्तिरसाचा जल्लोष

१५ दिंड्या व पालख्यांसह कार्तिक दिंडी रिंगण सोहळा

कुऱ्हा - श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथील कार्तिक यात्रेच्या निमित्ताने कुऱ्हा नगरीत आयोजित करण्यात आलेला कार्तिक दिंडी रिंगण सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात पार पडला. या सोहळ्यात तब्बल १५ दिंड्या व पालख्यांसह शेकडो वारकऱ्यांनी सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा जयघोष आणि वारकरी महिलांच्या पारंपरिक फुगड्यांनी या सोहळ्याची रंगत अधिकच वाढवली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ह.भ.प. रंगरावबाबा महाराज टापरे व ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी ह.भ.प. श्यामसुंदर निचत, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पाटील, ह.भ.प. नामदेव महाराज टापरे, ह.भ.प. डॉ. योगेश महाराज पातसे, ह.भ.प. राम महाराज गवारे, ह.भ.प. बाबुलाल महाराज दंदी, ह.भ.प. अनुप महाराज देशमुख, ह.भ.प. अनिल महाराज देशमुख, ह.भ.प. दामोदर महाराज बोबडे आणि ह.भ.प. सागर महाराज पारखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोहळा संपन्न झाल्यानंतर दिंड्या व पालख्या पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाल्या. दिंडी रिंगण सोहळा समिती, आयोजन समिती, कुऱ्हा ग्रामस्थ आणि गावकऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

यावेळी आ.राजेश वानखडे, किरण पातुरकर, रविराज देशमुख, आरती वानखडे आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली. तिवसा रोडवर वाहतुकीची मोठी वर्दळ असल्याने सोहळ्यादरम्यान वाहतुकीचा खोळंबा होऊ नये, यासाठी कुऱ्हा पोलीस स्टेशनचे ठाणेदार व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घेतला.

धनश्री प्रतिष्ठान आयोजित चित्रकला व रंगभरण स्पर्धा

अमरावती/का.प्र

धनश्री सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित रंगभरण, चित्रकला स्पर्धेचे आयोजन अमर कॉलनी येथील राजश्री शाहू महाराज कॉन्व्हेंट येथे आयोजित करण्यात आले होती.



या स्पर्धेत विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला नर्सरी ते फर्स्ट या गटात प्रथम क्रमांक वेद डहाके , द्वितीय स्पर्शिका पांडे, तृतीय ध्रुवी राऊत, सेकंड ते फोर्थ गटात प्रथम विशुधी पानतावणे, द्वितीय श्रावणी कोल्हटकर, तृतीय शिवराज बारापात्रे, पाचवी ते दहावी या गटात प्रथम विदिशा पानतावणे, द्वितीय ईश्वरी गांजरे, तृतीय प्रणावी ठाकरे, तर खुला गटात प्रथम क्रमांक मुकेश आढाव, द्वितीय सक्षम आग्रे, तृतीय उज्वल वानखडे हे विद्यार्थी विजेते ठरले . स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ.प्रवीण राऊत, परीक्षक म्हणून सरस्वती महाविद्यालयाचे मुख्याध्यापक अभय गादे, पूजा डहाके, प्रमुख उपस्थितीमध्ये मराठा सेवा संघाचे जिल्हासचिव संजय ठाकरे, महानगरध्यक्ष हेमंत गावंडे, कार्याध्यक्ष विजय गाडगे यांची उपस्थिती होती. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी धनश्री प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष मंजू ठाकरे यांचे सोबत मयुरी खरबडे ,सोनाली पानतावणे, दीप्ती पाथरे, कांचन पांडे, रोशनी ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

कोरड्या दुष्काळाचे सावट; फिल्टर पाण्याच्या कॅनला वाढती मागणी

व्यावसायिकांना अच्छे दिन!

दर्यापूर/वार्ताहर

गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा पावसाळ्यात अत्यल्प पाऊस झाल्याने तालुक्यात कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी शेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली असून, भूजल पातळीत घट होत असल्याने शहरासह ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत आहे. या कोरड्या दुष्काळाचा परिणाम जनजीवनासह विविध उद्योग-व्यवसायांवरही जाणवू लागला आहे.

एकीकडे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक पाणीटंचाई व आर्थिक संकटाचा सामना करीत असताना दुसरीकडे फिल्टर पाणी कॅन विक्रेत्यांच्या



व्यवसायाला मात्र चांगली चालना मिळाली आहे. शहरासह ग्रामीण भागात शुद्ध पिण्याच्या पाण्याची मागणी वाढल्याने फिल्टर पाण्याच्या कॅनची विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

पूर्वी मोजक्या ग्राहकांपुरता मर्यादित असलेला हा व्यवसाय आता वाढत्या मागणीमुळे विस्तारत आहे. घरगुती वापरासह दुकाने, कार्यालये आणि विविध व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्येही फिल्टर पाण्याच्या कॅनला पसंती मिळत आहे. परिणामी, या व्यवसायात उतरलेल्या व्यावसायिकांना सध्या समाधानकारक प्रतिसाद मिळत आहे.

मात्र, कोरड्या दुष्काळाचे हे चित्र विरोधाभासी म्हणावे लागेल. एका बाजूला पावसाअभावी शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी वाढत असताना दुसऱ्या बाजूला पिण्याच्या पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे फिल्टर पाणी कॅन व्यावसायिकांच्या व्यवसायाला तेजी आली आहे. त्यामुळे कोरडा दुष्काळ कुणासाठी संकट, तर कुणासाठी व्यवसायाची संधी, असे चित्र सध्या दर्यापूर शहरासह ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.

संक्षिप्त

श्रीराम जाधव यांना राज्यस्तरीय पुरस्कार

चांदूर रेल्वे - महाराष्ट्र राज्य नगरपरिषद व महानगरपालिका शिक्षक संघटनेच्या वतीने अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या ८ व्या राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक व शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात नगर परिषद जिजामाता प्राथमिक शाळा, चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती येथील सहाय्यक शिक्षक श्रीराम भिकुजी जाधव यांना मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श तंत्रस्नेही शिक्षक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार अनुप धोत्रे, आमदार साजिद खान पठाण, पदवीधर आमदार धीरज लिंगाडे, शिक्षक आमदार किरण सरनाईक, माजी पालकमंत्री तथा आमदार कडू, आमदार नितीन देशमुख, नगरसेवक जयंत मसने व उपमहापौर अमोल गोगे यांची उपस्थिती होती.तसेच संघटनेचे राज्य अध्यक्ष अर्जुन कोळी, राज्य कार्याध्यक्ष सुभाष कोल्हे, राज्य उपाध्यक्ष अशोक शेंडगे, राज्य सरचिटणीस अरुण पवार, राज्य महिला आघाडी प्रमुख साधना सोळंके, जुनी पेन्शनचे राज्य अध्यक्ष सुनील खरात, राज्य सरचिटणीस धोंडीराम चपडे, किशोर पाडवी सर यांच्यासह संघटनेचे सर्व राज्य पदाधिकारी उपस्थित होते.



शनिवारी 'गाव विकणे आहे'चे प्रकाशन

अमरावती - महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अमरावती जिल्हा महात्मा फुले विचार साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक, कवी, शिल्प व चित्रकार डॉ. राज यावलीकर यांच्या 'गाव विकणे आहे' या कथासंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. शनिवार, २८ व रविवार, २९ नोव्हेंबर २०२६ रोजी मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथे हे साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. श्री गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद व सामाजिक संस्था अमरावती यांच्या वतीने व मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ समीक्षक, लेखक व वक्ते डॉ. श्रीकांत तिडके असून, उद्घाटक म्हणून दैनिक लोकमत, नागपूरचे संपादक मा. श्रीमंत माने उपस्थित राहणार आहेत. प्रमुख सत्कारमूर्ती म्हणून पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी यांची उपस्थिती लाभणार आहे.



कथा, कविता स्पर्धेकरिता साहित्य पाठविण्याचे आवाहन

अमरावती - अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे १०० वे साहित्य संमेलन पुणे येथे २८ ते ३१ जानेवारी २०२६ ला पुणे येथे होत आहे. या संमेलनाचे औचित्य साधून पूर्वी ज्या जिल्ह्यांमध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलन झाले तेथे पुणे येथील संमेलनाचे निमंत्रण देण्यासाठी ९९ नांदी संमेलनांचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावतीमध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलन के.ज.पुरोहित यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते. याच अनुषंगाने 'नांदी' संमेलनाचा मान अमरावतीला मिळाला आहे.महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे द्वारा नियोजित, विदर्भ साहित्य संघ, नागपूरच्या मार्गदर्शनात विसासंघ, अमरावतीच्या वतीने हे संमेलन रविवार दि. २०/१२/२६ रोजी मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह, शिवाजी नगर येथे संपन्न होणार आहे. 'दिव्यांगांचे साहित्य व समाजमन' ही संकल्पना घेऊन संपन्न होणाऱ्या या संमेलनात 'अमरावतीच्या संस्मरणीय व्यक्तिरेखा' या विषयावर परिसंवाद, दिव्यांगासाठी कार्य करणार्या दहा संस्थांचा सत्कार, दिव्यांग जाणीवा जागवणारे कविसंमेलन व इतर सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.या निमित्ताने दिव्यांग संवेदना जागवणाऱ्या कथा व काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून स्पर्धकांनी आपल्या कथा विशाल मोहोड (पत्ता:-विशाल भा.मोहोड, संजय व. भटकर (शर्मा प्रोव्हिजन)एम आय डी सी रोड, जनता कॉलनी नं. २ गोपाल नगर अमरावती, पिन कोड- ४४४६०७, मो. नं. ९०११५७८७७१) व कविता डॉ.राजेंद्र राऊत (पत्ता:- डॉ. राजेंद्र रंगराव राऊत शिवनेरी १६ , मराठा कॉलनी, गोपाल नगर, अमरावती. ४४४६०७, मो. नं. ९४२१७४०७३ यांच्याकडे आपला सविस्तर पत्ता व भ्रमणध्वनी क्र. लिहून दि.१० डिसेंबर २०२६ पर्यंत पाठवाव्या, असे आवाहन विसासंघ शाखा अमरावतीचे सचिव आबासाहेब कडू, निमंत्रक डॉ.शोभा रोकडे, संमेलन कार्याध्यक्ष डॉ.कुमार बोबडे, संमेलन कार्यवाह डॉ.सुभाष गवई यांनी केले आहे.

महाआरोग्य शिबिराला प्रतिसाद

३९७ रुग्णांची तपासणी ९८ रुग्ण शस्त्रक्रियेसाठी निवड

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

शिवसेना व प्रहार संघटना तालुका अंजनगाव सुर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने व शालिनीताई मेघे हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, नागपूर यांच्या सहकार्याने दहिगाव रेचा येथे निःशुल्क महाआरोग्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.महादेव संस्थान येथे हे शिबीर संपन्न झाले.

शिबिरामध्ये नागपूर येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटलमधील विविध विभागातील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहून रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले.

यामध्ये मेडिसीन, नेत्ररोग तज्ज्ञ, न्युरॉलॉजी, मेंदू शस्त्रक्रिया (न्युरो सर्जन), स्त्री रोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, शल्यचिकित्सक, कीडनी रोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, दंतरोग तज्ज्ञ, कान-नाक-घसा तज्ज्ञ,हृदय रोग चिकित्सक यांचा समावेश होता.

एका छताखाली इतक्या



विविध आजारांवरील तज्ज्ञांची तपासणी उपलब्ध असल्याने नागरिकांसाठी हे शिबीर विशेष लाभदायी ठरले.

शिबिरात एकूण ३९७ रुग्णांची तपासणी करण्यात आली असून ९८ रुग्णांची पुढील उपचारासाठी व शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली आहे.या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून प्रहार संघटनेचे संपर्क प्रमुख पिटुकले, शिवसेना जिल्हाप्रमुख सुनिल डिके, शंकरराव मालठाणे, बाबुराव पाटील उंबरकर, सुधाकर पाटील खारोळे, शिवसेना शहरप्रमुख मुन्ना उर्फ योगेश इसोकार उपस्थित होते.

शिबीर यशस्वी करण्यासाठी शिवसेना व प्रहार संघटना तालुका अंजनगाव सुर्जी यांचे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

या शिबिराचे आयोजन बाला शेरकर, सचिन शेरकर, अतुल रेचे, रोशन धुमाडे, सुरज गोडे, श्याम धुमाडे, श्रीकांत रेचे, दीप बुडळकर, हरिओम गोडे, त्रिशूल पारे, रोशन लोंडे, विशाल धुमाळे, निशांत खारोडे, प्रशांत बावन्थडे, अक्षय शेरकर, गोलू शेरकर, कृष्णा शेंडे, प्रविण उके यांनी केले होते.

मोती माता यात्रेच्या पार्श्वभूमीवर

शिरपूर-टिटंबा रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर

मेळघाट/वार्ताहर

धारणी तालुक्यातील शिरपूर-टिटंबा मार्गाची दुरवस्था आता स्थानिक नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि खराब झालेल्या मार्गामुळे वाहन धारकांना दररोज अडचणींचा सामना करावा लागत आहे.आगामी मोती माता यात्रेच्या पार्श्वभूमीवर हा मार्ग तातडीने दुरुस्त करण्याची मागणी पुढे आली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रोहित राजकुमार पटेल यांनी या समस्येकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधले आहे. यासाठी त्यांनी धारणी येथील संबंधित उपअभियंत्यांकडे निवेदन सादर करून रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली. तसेच प्रशासनाला काम सुरू करण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली आहे.शिरपूर ते टिटंबा या मार्गावर



अनेक ठिकाणी रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. खड्ड्यांमधून मार्ग काढताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून,अपघाताचा धोकाही वाढला आहे.

दरम्यान, मोती माता यात्रेला मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतात. यात्रेच्या काळात याच मार्गावरून भाविकांची वर्दळ वाढणार असल्याने रस्त्याची दुरवस्था अधिक गंभीर ठरू शकते. त्यामुळे यात्रा सुरू होण्यापूर्वीच रस्त्याचे काम पूर्ण करणे आवश्यक असल्याचे पटेल यांनी निवेदनातून अधोरेखित केले आहे.प्रशासनाला दिलेल्या निवेदनात १५ दिवसांच्या आत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मुदतीत ठोस कार्यवाही न झाल्यास परिसरातील ग्रामस्थांना सोबत घेऊन रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रोहित राजकुमार पटेल यांनी दिला आहे. त्यामुळे आता सार्वजनिक बांधकाम विभाग या मागणीवर काय भूमिका घेतो, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

रस्ते-पुलांच्या विकासासोबतच आता विद्यार्थ्यांच्या भविष्यालाही बळ

आ. गजानन लवटे यांचा ऐतिहासिक पुढाकार, २३ वाचनालयांना २० लाखांची स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

विकास म्हणजे केवळ रस्ते, पूल, नाल्या, पथदिवे आणि समाजमंदिरांची उभारणी नव्हे, तर त्या भागातील पुढील पिढीच्या हातात ज्ञानाची शिदोरी देऊन त्यांचे भविष्य घडविणे हाच खऱ्या विकासाचा पाया आहे, ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरवत दर्यापूर-अंजनगाव सुर्जी विधानसभा मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे यांनी एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक पाऊल उचलले आहे. आमदार स्थानिक विकास निधीतून मतदारसंघातील २३ वाचनालयांना तब्बल २० लाख रुपयांची स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट देण्याचा उपक्रम त्यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला असून पुस्तक वाटपाचा समारोह पार पडला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिवसेना उबाठाचे संपर्कप्रमुख सुधीर सुर्यवशी तर उद्घाटक म्हणून आमदार



गजानन लवटे उपस्थित होते.शहरांमध्ये जाऊन महागडी पुस्तके खरेदी करणे, अभ्यासासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करणे अनेक विद्यार्थ्यांना शक्य होत नाही. हीच अडचण ओळखून आमदार गजानन लवटे यांनी विद्यार्थ्यांच्या गावातच त्यांना स्पर्धा परीक्षांची पुस्तके उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला.

आजपर्यंत केलेल्या विकासकामांपेक्षाही या उपक्रमामुळे मला विशेष आनंद झाला असून तो शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया आमदार लवटे यांनी व्यक्त केली.

यावेळी संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी यांनी पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करताना काही लोकांना पुस्तकाची किंमत आणि त्यामागे लेखकाने घेतलेले कष्ट यांची जाणीव नसते.

ग्रामगीताचार्य मनोहरदादा रेचे यांनीही या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक कामे होत असतात; मात्र विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी वाचनालयांना निधी देण्याचा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

विचारपीठावर संपर्कप्रमुख सुधीर सुर्यवंशी,आमदार गजानन लवटे, जिल्हाप्रमुख पराग गुडधे,जिल्हा समन्वयक गुणवंत गावंडे,उपजिल्हाप्लामुख महेंद्र दिपटे,बबन विल्हेकर, युविसेना प्रमुख अकुश कावडकर, कपील देशमुख,दर्यापुर तालूका प्रमुख प्रमोद धानोरकर,संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते प्रा.प्रेमकुमारजी बोके,शहरअध्यक्ष राजू आकोटकर,शिवसेना गटनेता सुयोग खाडे,नगरसेवक सुनीता बाळे,श्रीकांत जूनघरे,ईब्राहीम बेग हसन बेग,मो.रेहान अ.मुनाफा,ग्रामगीताचार्य मनोहर रेचे,प्रमोद गिरनाळे,दर्यापुर तालूका ग्रंथपाल मनोज भाडेकर,अनंत ठाकरे सुनील राऊत,गणेश राउत मतदारसंघातील विविध वाचनालयांचे पदाधिकारी, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

सोनियांचे आत्मवृत्त

सोनिया गांधींचे आत्मवृत्त 'Belonging' सध्या वाचतोय. ५०२ पानांपैकी १५२ पान वाचून झाले. त्यांच्या माहेरच्या कुटुंबाचं वर्णन, राजीवची भेट व प्रेम बहरणे, राजीवचे इटलीत जाऊन सोनियांच्या पालकांना भेटणे, पुढे सोनियांचे भारतात येणे, विवाह, इथल्या चालीरीती शिकणे, अन्नाची सवय करून घेणे, इंदिरा गांधींना व्यक्तिगत कामात मदत करणे इत्यादी मजकूर या पहिल्या १५० पानांमध्ये आलेला आहे. तो वाचून जाणवलेले ठळक मुद्दे असे..



भाग- २

सोनियाशी मैत्री झाल्यावर राजीवने लगेच इंदिरा गांधींना एका खूप विशेष मुलीशी ओळख झाल्याचे कळविले आणि पुढल्याच महिन्यात पुन्हा कळविले की आपण तिच्या प्रेमात पडल्याची त्याची खात्री झाली आहे. पहिल्या भेटीत आवडलेली मुलगी योग्य असेलच असे नाही, या आईच्या उत्तरानंतरही राजीव सोनियाशी विवाह करण्याबाबत ठाम राहिला. आईला भीती वाटली. आपल्या मुलाची ज्या मुलीशी नुकतीच ओळख झाली, तिच्यासोबत विवाहाचे काय परिणाम होतील याची इंदिराजींना धास्ती होती. देश, संस्कृती, जीवनशैली सगळेच वेगळे होते. बहुदा अनेक आयांप्रमाणे आपली मोठी सून कशी असावी याविषयी इंदिराजींच्याही काही ठाम धारणा असाव्यात. परंतु मुलांवर अरेंज्ड मॅरेज लादणेही त्यांना प्रशस्त वाटत नव्हते. त्यांचा स्वतःचा प्रेमविवाह होता.

लंडन मध्ये भारताचे उपउच्चायुक्त असलेल्या पी.एन. हक्सर आणि त्यांच्या पत्नीला इंदिराजींनी सोनियाची भेट घेण्यास सांगितले. त्यानुसार हक्सर दाम्पत्य राजीव आणि सोनिया यांना घेऊन एका भारतीय उपहारगृहात जेवणासाठी गेले. तिथे तंदुरी चिकनचा पहिला घास घेताच सोनियाच्या तोंडात जणू आग पडल्याचा तिला भास झाला. इतके तिखट कधीच खाल्ले नव्हते (पण हेच तंदुरी चिकन नंतरच्या काळात तिला आवडू लागले). आगीवर उपाय म्हणून राजीवने तिला एक अतिशय गोड कुल्फीबेचाव्क आणि फालुदा खाऊ घातला, जो सोनियाला बेचव वाटला. हक्सरांनी इंदिराजींना काय कळविले ते सोनियास कळले नाही. परंतु लवकरच जून १९६५ मध्ये इंदिराजी दौऱ्यावर असताना लंडनला थांबल्या आणि त्यांनी उच्चायुक्तांच्या घरी या दोघांना बोलावून घेतले. केम्ब्रिज वरून लंडनला जाताना सोनिया अतिशय व्याकूळ आणि चिंतातूर झाली. अर्ध्या रस्त्यातून तिने राजीवला गाडी माघारी घ्यायला लावली. दुसऱ्या दिवशी मात्र हिम्मत करून ती राजीवसोबत इंदिराजींना भेटली.

त्यावेळी इंदिराजी थकलेल्या अवस्थेत पलंगावर लेटल्या होत्या. त्यांनी सोनियाला जवळ बसवून घेतले आणि चॉकलेट खायला दिली. तिच्या ड्रेसची तारीफ केली. प्रथमदर्शनी इंदिराजींचा ठेंगणा बांधा, मोठे व खोल डोळे, लांब पापण्या आणि ठळकपणे उठून दिसणारे नाक याची नोंद सोनियाने घेतली. पण दिलेले चॉकलेट ती खाऊ शकली नाही.

इंदिराजींनी फ्रेंच मध्ये काही औपचारिक प्रश्न विचारले. सोनिया इंग्रजीपेक्षा फ्रेंच मध्ये जास्त चांगली बोलू शकत असे. सोनियाला इतक भरून आले की ओक्साबोक्शी रडू लागली. इंदिरा गांधींनी तिला जवळ घेतल आणि हात पकडून फ्रेंच मध्ये म्हणाल्या 'घाबरू नकोस सोनिया, मी मानवच आहे, मी सुद्धा कधी तरुण आणि प्रेमातही होते. तुला मी पूर्णपणे समजू शकते'. सोनियाला आता थोडा धीर आला आणि अश्रू मागे सारून ती भावी सासूच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करू लागली. राजीव सुद्धा जवळ येऊन बसला आणि तिच्या खांद्यांवरून हात टाकून तिला जवळ ओढले.





त्यांना तिथूनच एका पार्टीला जायचे होते. पार्टीसाठी एक ड्रेस सोनियाने सोबत घेतला होता. ड्रेस बदलण्यासाठी राजीवने तिला बाजूची खोली दाखवली. बदलताना सोनियाच्या लक्षात आले की त्या ड्रेसच्या खालच्या काठाची शिवण उसवली असून काठ लोंबत आहे. तिने राजीवला मदत मागितली. काही क्षणात स्वतः इंदिरा गांधी सुईदोरा घेऊन त्या खोलीत आल्या आणि खाली वाकून त्यांनी तिच्या ड्रेसचा उसवलेला भाग स्वतः शिवून दिला.

इंदिरा गांधी, राजीव आणि संजय यांच्या व्यक्तित्वाविषयी सोनियांनी त्यांच्या आत्मवृत्तात अधूनमधून बरेच लिहिले आहे. देशाच्या राजकारणात धाक व दरारा असणाऱ्या इंदिराजी एक कुटुंबवत्सल आई, सासू व आजी होत्या. फिरोज गांधींच्या व नेहरूंच्या परिवारांशी त्या सतत संबंध ठेऊन असायच्या. इंदिराजींचा व्यक्तिगत पत्रव्यवहार सुद्धा खूप दांडगा होता. वाचन आणि संगीत, चित्रकला, शिल्पकला, नृत्य इत्यादी क्षेत्रातही त्यांना भरपूर रुची होती. इतिहासाची त्यांची जाण पक्की होती. जे जे अभिजात व सुंदर, त्याचा त्यांना ध्यास असायचा. पक्षांतर्गत व बाहेरच्या विरोधकांशी सामना करताना पुष्कळदा त्या तणावात असायच्या. अशा वेळी कधी कधी त्यांचा संताप घरातही अनावर व्हायचा.राहुलच्या जन्मानंतर मात्र त्याला पाहिले की इंदिराजींचा सगळा ताण दूर होत असे आणि मग फक्त एक आजी प्रसन्नतेने नातवाशी खेळत राही.

क्रमशः

किशोर देशपांडे
९८८१५७४९५४

दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी..

महाराष्ट्रातील सध्याचा दुष्काळ १९७२ मधील दुष्काळापेक्षा गंभीर असू शकतो हे आता अनेकजण सांगू लागले आहेत.आमचे मित्र आणि TISS चे प्राध्यापक आर रामकुमार यांनी EPW मध्ये या विषयावर एक लेख लिहून या विषयाशी संबंधित अनेक बाजू टेबलवर मांडल्या आहेत. त्यावर आधारित हे टिपण.

महाराष्ट्र राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून औपचारिकपणे घोषित करण्यात आले आहेत. राज्यातील पर्जन्यमान सरासरीपेक्षा दोन तृतीयांश सांगितले जाते. ही झाली सरासरी. प्रत्येक ठिकाणचे गांभीर्य भिन्न आहे. उदा २०५ तालुक्यात तर सरासरीच्या अर्धा / किंवा त्यापेक्षा कमी पाऊस झाला आहे.

राज्यातील जलाशयातील पाणीसाठा साठवणूक क्षमतेच्या ६६ टक्के आहे. मराठवाड्यातील जलाशयात तर फक्त ४० टक्के. भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत आहे. आतापासून टँकर्सनी पाणी पुरवणे सुरू झाले आहे. आणि अजून किमान आठ नऊ महिने निघायचे आहेत.

गाजावाजा केल्या गेलेल्या जल जीवन मिशन मधील ८,४७८ योजनांपैकी फक्त ३४४ पूर्ण केल्या गेल्या आहेत.खरिप पिक हवेतसे आले नाहीच पण रबी पीक देखील हातातून जाणार आहे.

लेखातील काही निरीक्षणे खालीलप्रमाणे

१. दुष्काळाचा गंभीर परिणाम शेतकऱ्यांवर होणार हे तर झालेच पण त्यापेक्षा जास्त गंभीर परिणाम शेतमजूर, छोटे शेतकरी, भाडेतत्त्वावर घेऊन शेती करणारे यांच्यावर होणार आहेत. कारण त्यांना शासकीय नुकसानभरपाई मिळणार नाही जी सात बारावर ज्याचे नाव असते त्याला मिळते.

२. तीच गोष्ट कर्जमाफीची. सहकारी सोसायटच्या, बँका यांच्याकडून कर्ज घेतलेले असेल अशांना फक्त कर्जमाफी योजनेचा लाभ मिळतो. अनेक जण पुरक म्हणून किंवा औपचारिक संस्थाकडून वेळेवर आणि पुरेसे कर्ज मिळाले नाही म्हणून इतर अनेक स्त्रोतांकडून कर्ज उचल करतात. त्यांना कर्जमाफीच्या योजनेचा लाभ मिळणार नाही. खाजगी सावकारी तर कोणत्याच रेकॉर्डवर नसते.

(मायक्रो फायनान्स कंपन्यांनी आणि त्यांच्या वसुली एजंटनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात काय धुमाकूळ घातला आहे याच्या बातम्या प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये येत आहेत. गोष्टी त्यापेक्षा विदारक आहेत.)

३. शासनाचा सारा भर वित्तीय पॅकेजवर आहे असे दिसते. अजून सढळ हस्ते आणि माफक व्याजदराने कर्ज पुरवठा करून प्रश्न सुटणारे नाहीत. ७५ लाख किसान क्रेडिट कार्ड अकाऊंट पैकी ४५ टक्के हप्ते थकलेले आहेत तर बँकांमधील शेतीशी निगडीत अर्धी कर्जे एनपीए झाली आहेत.

४. शेतीमधील अशा प्रकारचे गंभीर अरिष्ट जणुकाही शुद्ध आर्थिक अरिष्ट आहे/ असते असे भासवले जाते. प्रत्यक्षात ते झपाट्याने गंभीर सामाजिक अरिष्ट बनत आहे. बनणार आहे.

उत्पन्न बुडाले/ कमी झाले, त्यातून जगण्यासाठी , विशेषतः आजारपणासाठी, मिळेल तेथून कर्जाची उचल करणे, ती फेडता न आल्यामुळे जमिनी, जनावरे, घरातील किडुक मिडूक सोने, इतर ऐवज विकणे, शहराकडे स्थलांतरण आणि असह्या झाल्यावर आत्महत्याष्ठहे प्रकार वाढत जाणारे आहेत

५. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे केंद्र आणि राज्य शासनाला परिस्थितीचे गांभीर्य पुरेसे कळलेले नाही. रामकुमार यांच्या अनुमानानुसार जून २०२७ पर्यंत दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी १,६७,००० कोटी रुपये लागू शकतात. त्या तुलनेत सध्यातरी ज्या पॅकेजची घोषणा होत आहे ते फक्त ३०,००० कोटींच्या घरात आहे.

संजीव चांदोरकर

संविधान दिन

डॉ.बाबासाहेबाच्या लेखनीतूनी
झाले भारतीय संविधान साकार
सुंदर,संपन्न, बहुभाषिक देशा
लाभला एक नवीनतम आकार

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी जेव्हा
झाला देशी संविधानाचा स्वीकार
तेव्हा प्रदीर्घ लोकशाही म्हणून
भारतभूमीचा झाला जयजयकार

सर्वधर्मभाव, न्यायव्यवस्थेचा
संविधानाने दिला एक विचार
स्वातंत्र्य, समता, बंधुता त्रयीने
देशविकासास लागला हातभार

जगी भारत एक महत्तम देश
संविधान सांगे ऐक्याचे सार
जय भारत, जय भारत म्हणून
व्हावा जयघोष निनाद त्रिवार

राजश्री खाजोने

अद्भुत खेळी... वैभव सूर्यवंशी!



५३ चेंडूंत २०४ धावा हा आकडा थक्क करणारा आहेच; पण त्या आकड्यामागे असलेली बॅटिंग टेक्निक, टायमिंग,पॉवर जनरेशन आणि क्रिकेटिंग इंटेलिजन्स समजून घेतली, तर वैभव सूर्यवंशीची ही खेळी आणखी मोठी वाटते. कारण तो केवळ चेंडू सीमारेषेबाहेर पाठवत नाही, तर आधुनिक क्रिकेटमध्ये फलंदाजी किती आक्रमक आणि रोमांचक असू शकते, याची नवी व्याख्या निर्माण करत आहे!

२४ नोव्हेंबर २०२६. दोहा येथील क्रिकेट मैदान. ACC रायझिंग स्टार्स आशिया कप स्पर्धेत भारत अ आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात सामना सुरू होता. UAE संघाने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ८ बाद २४९ धावा उभारल्या आणि भारतासमोर २५० धावांचे आव्हान ठेवले. एकदिवसीय क्रिकेटच्या दृष्टीने हे आव्हान फार मोठे नव्हते; परंतु भारताला विजयासाठी संयमी आणि प्रभावी फलंदाजीची आवश्यकता होती. भारतीय डावाची सुरुवात झाली आणि मैदानावर उतरला अवघ्या १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी. त्याआधीच्या दोन सामन्यांमध्ये त्याला अपेक्षित कामगिरी करता आली नव्हती. त्यामुळे या सामन्यात त्याच्याकडून चांगल्या खेळीची अपेक्षा होती. पण तो काय करणार आहे, याची कल्पना कदाचित प्रतिस्पर्धी गोलंदाजांनाही नव्हती.

सुरुवातीला त्याने खेळपट्टीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला; मात्र चेंडू फलंदाजीसाठी अनुकूल असल्याचे लक्षात येताच त्याने आपली रणनीती बदलली. त्यानंतर जे घडले ते क्रिकेटच्या इतिहासात नोंदवले गेले.अवघ्या १६ चेंडूंमध्ये अर्धशतक,२८ चेंडूंमध्ये शतक,४० चेंडूंमध्ये दीडशतक आणि केवळ ५२ चेंडूंमध्ये द्विशतक! अखेर ५३ चेंडूंत २०४ धावा करून त्याची खेळी संपली. त्यात ७ चौकार आणि तब्बल २८ षटकार होते. त्याचा स्ट्राइक रेट ३८४.९० होता. भारताने हे लक्ष्य केवळ १४.२ षटकांत पूर्ण केले. ही केवळ धावांची बरसात नव्हती, तर आधुनिक क्रिकेटमधील फलंदाजीच्या क्षमतेचे एक विलक्षण प्रदर्शन होते.

पण इथे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. वैभवने एवढे षटकार मारले कसे?प्रत्येक चेंडू सीमारेषेबाहेर पाठवण्यासाठी केवळ शारीरिक ताकद पुरेशी असते का? की त्यामागे काही वेगळे तंत्र असते?क्रिकेटची तांत्रिक भाषा समजून घेतली तर वैभवच्या फलंदाजीतील अनेक गोष्टी अधिक रंजक वाटतात.

वैभवच्या फलंदाजीतील पहिली लक्षवेधी बाब म्हणजे त्याचा बॅट स्विंग आणि बॅट स्पीड.चेंडू टोलवताना तो केवळ हातांची ताकद वापरत नाही,तर पाय, कंबर, खांदे आणि मनगट यांचा समन्वय साधून फटक्यामध्ये ऊर्जा निर्माण करतो.क्रिकेटच्या तांत्रिक भाषेत याला 'काइनेटिक चेन' असे म्हणतात.शरीरातील विविध अवयवांच्या हालचालीतून निर्माण झालेली ऊर्जा योग्य क्रमाने बॅटपर्यंत पोहोचली की चेंडूला विलक्षण गती मिळते.त्याच्या अनेक आक्रमक फटक्यांमध्ये या समन्वयाचे महत्त्व दिसून येते. वेगवान बॅट स्विंग आणि चेंडूला मिळणारा स्वच्छ संपर्क ही त्याच्या पॉवर हिटिंगची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे त्याचे टायमिंग.क्रिकेटमध्ये ताकदीपेक्षा टायमिंग श्रेष्ठ मानले जाते. चेंडू बॅटच्या स्वीट स्पॉटवर योग्य क्षणी लागला तर कमी ताकद वापरूनही चेंडू लांब जाऊ शकतो.वैभवच्या फलंदाजीमध्ये चेंडू आणि बॅट यांचा स्वच्छ संपर्क दिसतो.त्याचे षटकार केवळ जोर लावून मारलेले नसतात;त्यामध्ये चेंडूची दिशा,बॅटचा अँगल आणि संपर्काचा क्षण यांचाही महत्त्वाचा वाटा असतो. चेंडू बॅटवर कधी घ्यायचा,त्याला किती वेळ द्यायचा आणि कोणत्या दिशेने फटका खेळायचा, हे फलंदाजीतील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.

त्याच्या खेळातील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे फूटवर्क.फलंदाजासाठी फूटवर्क हा त्याचा पाया असतो. चेंडूच्या लेंथनुसार पुढे जाणे, मागे सरकणे, योग्य अंतर राखणे आणि शरीराचा समतोल टिकवणे यावर फटक्याची गुणवत्ता अवलंबून असते. फुल लेंथ चेंडूवर फ्रंटफूटवर येऊन ड्राइव्ह किंवा लॉफ्टेड शॉट खेळणे आणि शॉर्ट लेंथ चेंडूवर बॅकफूटचा वापर करून पुल किंवा कट खेळणे, यासाठी अचूक फूटवर्क आवश्यक असते. वैभवची आक्रमक शैली या दोन्ही प्रकारच्या फटक्यांमधून दिसून येते. मात्र, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गोलंदाजांविरुद्ध स्विंग, सीम मूव्हमेंट आणि वेगवेगळ्या खेळपट्ट्यांवर त्याचे फूटवर्क किती प्रभावी ठरते, हे त्याच्या पुढील कारकिर्दीत पाहणे महत्त्वाचे ठरेल.

वैभवच्या फलंदाजीतील मनगटांचा वापरही लक्षवेधी आहे. भारतीय फलंदाजांची पारंपरिक ताकद म्हणजे मनगटांची लवचिकता. लेग साइडला फ्लिक, ऑफ साइडला ड्राइव्ह, पुल आणि लॉफ्टेड शॉट्स खेळताना मनगटांचा अचूक वापर फटक्याला दिशा देतो. बॅटचा अँगल बदलणे, चेंडूला योग्य दिशा देणे आणि शेवटच्या क्षणी फटक्यात बदल करणे या गोष्टींसाठी मनगटांवर नियंत्रण आवश्यक असते. वैभवच्या फलंदाजीतील ही नैसर्गिक लवचिकता त्याच्या आक्रमक खेळाला अधिक प्रभावी बनवते.पण केवळ बॅट स्विंग, टायमिंग आणि मनगटांचा वापर यामुळेच एखादा फलंदाज महान ठरत नाही. त्यासाठी आवश्यक असते ते क्रिकेटिंग ब्रेन! गोलंदाजाचा रनअप, हाताची हालचाल, चेंडूची लाइन आणि लेंथ यांचा अंदाज घेणे, क्षेत्ररक्षणातील मोकळ्या जागा शोधणे आणि गोलंदाजाची रणनीती ओळखणे, ही उत्तम फलंदाजाची लक्षणे आहेत. वैभवच्या या खेळीत सर्वांत प्रभावी ठरलेली गोष्ट म्हणजे त्याची बॅटिंग इंटेंट. तो गोलंदाजाला आपल्या अटींवर खेळायला भाग पाडतो. फलंदाज आक्रमण करू लागला की गोलंदाज आपली लेंथ बदलतो, क्षेत्ररक्षण मागे घेतो आणि बचावात्मक रणनीती आखतो. यालाच क्रिकेटच्या भाषेत बॉलरवर डॉमिनन्स निर्माण करणे म्हणतात.

त्याच्या या खेळीतील आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे वेगवान गोलंदाज आणि फिरकीपटू या दोघांविरुद्ध आक्रमण करण्याची क्षमता. पेस बॉलिंगविरुद्ध चेंडूचा वेग वापरणे, योग्य वेळी बॅट आणणे आणि शॉर्ट बॉलवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. तर स्पिनविरुद्ध फूटवर्क, क्रीजचा वापर, चेंडूचा टर्न ओळखणे आणि योग्य वेळी पुढे येणे महत्त्वाचे असते. वैभवने या सामन्यात दोन्ही प्रकारच्या गोलंदाजीवर हल्ला चढवला. त्यामुळे त्याच्या फलंदाजीचा आवाका केवळ एका प्रकारच्या गोलंदाजांपुरता मर्यादित नसल्याचे दिसून आले.

मात्र, या सर्व कौशल्यांबरोबरच एका गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मोठे विक्रम करणे आणि दीर्घकाळ सातत्यपूर्ण कामगिरी करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. स्विंग होणारा चेंडू, सीम मूव्हमेंट, दर्जेदार फिरकी, वेगवेगळ्या खेळपट्ट्या आणि दबावाच्या परिस्थितीत फलंदाजी करणे, ही त्याच्या तांत्रिक परिपक्वतेची खरी कसोटी असेल. आक्रमक फलंदाजीबरोबरच डिफेन्सिव्ह टेक्निक, संयम, स्ट्राइक रोटेशन आणि डाव उभारण्याची क्षमता विकसित झाली तर तो अधिक संपूर्ण फलंदाज बनू शकतो.

वैभवकडे आज नैसर्गिक आक्रमकता आहे,बॅट स्पीड आहे, टायमिंग आहे,आत्मविश्वास आहे आणि गोलंदाजावर वर्चस्व मिळवण्याची मानसिकता आहे. या गुणांना योग्य प्रशिक्षण, फिटनेस,मानसिक स्थैर्य आणि तांत्रिक शिस्त यांची जोड मिळाली तर त्याचा प्रवास आणखी मोठा होऊ शकतो.क्रिकेटमध्ये एक म्हण आहे,'Form is temporary, class is permanent.' फॉर्म येतो आणि जातो; पण तंत्र, गुणवत्ता आणि खेळाची समज दीर्घकाळ खेळाडूला साथ देतात. वैभवने एका खेळीत जगाला आपल्या प्रतिभेची झलक दाखवली आहे. आता त्याच्या खेळातील सातत्य आणि परिपक्वता त्याला कुठे घेऊन जाते, हे पाहणे अधिक रंजक ठरणार आहे.

अँड. धनंजय देशमुख
मो. ९३८४३८२१०२

■ गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

अकोटमध्ये मोकाट कुत्र्यांचा हैदोस ; सात जणांना चावा तीन ते सात वर्षांच्या चिमुकल्यांचाही समावेश

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव पुन्हा एकदा गंभीर बनला असून, २४ नोव्हेंबर रोजी सकाळपासून एका आक्रमक कुत्र्याने तब्बल सात नागरिकांवर हल्ला करून त्यांना चावा घेतल्याची घटना घडली. या हल्ल्यात तीन ते सात वर्षे वयोगटातील चिमुकल्यांचाही समावेश आहे. काही बालकांना गंभीर दुखापत झाल्याने पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नगरपरिषदेच्या कुत्रे नियंत्रण यंत्रणेवर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

तळोकारपुरा, टाकपुरा, मोठे बारगण, उज्ज्वलनगर आणि सरस्वती कॉलनी परिसरात या कुत्र्याने नागरिकांवर

गंभीर जखमी बालकांना अकोल्यात हलविले



हल्ले केल्याची माहिती आहे. विशेषतः लहान मुलांना लक्ष्य करण्यात आल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शहरातील चौक, बाजारपेठा आणि निवासी वसाहतींमध्ये मोकाट कुत्र्यांचे कळप मुक्तपणे फिरत असून, पादचारी, शाळकरी विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांच्या मागे कुत्र्यांचे कळप धावत असल्याने अपघात होण्याची भीतीही व्यक्त होत आहे.

यापूर्वी अकोला रोडवरील पोलीस स्टेशन परिसरातही मोकाट कुत्र्याने अनेक नागरिकांना चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. वारंवार अशा घटना घडत असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

दरम्यान, मोकाट कुत्र्यांना पकडण्यासाठी नगरपरिषदेने निविदा प्रक्रिया राबविली होती. मात्र, कंत्राटदारांकडून प्रतिसाद मिळाला नसल्याची माहिती आहे. परिणामी, कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. केवळ निविदा काढून जबाबदारी संपत नाही, तर नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेसाठी प्रभावी यंत्रणा उभारणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे. निर्बीजीकरण, लसीकरण आणि मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा अशा घटनांची पुनरावृत्ती होऊन एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पिंजरमध्ये जुगार अड्ड्यावर एलसीबीचा छापा ; १४ जुगारी ताब्यात

१ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त; सात मोबाईलसह रोकड हस्तगत

■ प्रतिनिधी | अकोला ■



जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने पिंजर येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धडक कारवाई केली. सरकारी जिनिंग परिसरात सुरू असलेल्या जुगारावर छापा टाकून पोलिसांनी १४ जणांना रंगेहात ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रकमेसह सात मोबाईल आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ४२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी ग्रामीण भागातील अवैध जुगार अड्ड्यांविरुद्ध कारवाईचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना दिले होते. त्यानुसार स्वतंत्र पथक तयार करून अवैध जुगार व्यवसायांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते.

दरम्यान, २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पिंजर परिसरात गस्त घालत असताना बसस्थानक परिसरात गोपनीय माहिती मिळाली. पिंजर येथील सरकारी जिनिंगजवळ काही जण ५२ पत्त्यांच्या आधारे पैशांची हार-जीत लावून जुगार खेळत असल्याची खात्रीलायक माहिती मिळताच पोलिसांनी दोन पंचांना सोबत घेऊन संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी जुगार खेळणाऱ्या १४ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

या कारवाईत शरद पांडुरंग बुटे, रोहिदास सुरेश तुरी, पुंडलिक शंकरराव इंगळे, मोहम्मद इमरान शेख मेहबूब, अंकित संजय जयस्वाल, शुभम संजय बोडखे, जितेंद्र शांताराम राठोड, शेख रसूल शेख अलीम, लक्ष्मण बळीराम दळवी, सैयद युसूफ सय्यद मोहम्मद, सोनू किसन पवार, मोहम्मद रियाज शेख सुलतान, अनिल भीमराव माणिकराव आणि संतोष मारोती ठाकरे यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी केलेल्या झडतीत ६१ हजार ९०० रुपये रोख, जुगाराच्या डावावरील ४ हजार ५०० रुपये, ५२ पत्त्यांचा संच आणि सात जुने वापरते मोबाईल (किंमत ७६ हजार रुपये) असा एकूण १ लाख ४२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पिंजर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, सहायक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, वसीमोद्दीन, महेंद्र मलिये, किशोर सोनोनें, मंगेश इंगळे, रविंद्र खंडारे, अन्सार शेख तसेच चालक मनीष ठाकरे यांच्या पथकाने केली.

वैयक्तिक आनंदाला सामाजिक बांधिलकीची जोड; 'आनंदयात्री' उपक्रमाची अकोटमध्ये चळवळ

मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांचा पुढाकार
६० हून अधिक नागरिकांचा सहभाग, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट

■ प्रतिनिधी | अकोट ■



वाढदिवस असो वा लग्नाचा वाढदिवस... हा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा अभिनव उपक्रम अकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी सुरू केला आहे. 'आनंदयात्री' या उपक्रमाच्या माध्यमातून वैयक्तिक आनंदाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळत असून, अल्पावधीतच या उपक्रमाने अकोट शहरात चळवळीचे स्वरूप धारण केले आहे.

स्वतःच्या आयुष्यातील आनंदाचे क्षण नगरपरिषदेच्या शाळांमधील गरजू विद्यार्थ्यांसोबत साजरे करण्याचे आवाहन या उपक्रमातून करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, आतापर्यंत ६० हून अधिक नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले आहे. वह्या, पुस्तके, स्कूल बॅग, गणवेश, पेन, टिफिन आणि पाण्याच्या बाटल्या अशा साहित्याबरोबरच शाळांसाठी वॉटर फिल्टर आणि डिजिटल बोर्ड यांसारख्या सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या उपक्रमातून केवळ शैक्षणिक साहित्याचे वाटप न करता शाळांच्या मूलभूत सुविधांकडेही लक्ष दिले जात आहे.

भूषण धुगे यांच्या योगदानातून नगरपरिषदेच्या मराठी शाळा क्रमांक १ मधील स्वच्छतागृहाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसोबतच शाळांमधील सुविधांच्या सुधारणेलाही हातभार लागत आहे.

प्रशासकीय चौकटीपलीकडील सामाजिक उपक्रम

वाढदिवस आणि लग्नाचा वाढदिवस यांसारखे खास दिवस अनावश्यक खर्चाऐवजी गरजू विद्यार्थ्यांसाठी योगदान देऊन साजरे करता येऊ शकतात, हा विचार 'आनंदयात्री' उपक्रमातून रुजविण्याचा प्रयत्न आहे. नागरिकांनी आपल्या आनंदाच्या दिवशी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवावा आणि त्यांच्या शैक्षणिक गरजांनुसार मदत करावी, असे आवाहन मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी केले आहे.

या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी नियोजित दिवसाच्या किमान तीन दिवस आधी नगरपरिषदेच्या शिक्षण विभागाला माहिती देणे आवश्यक आहे. सहभागी आनंदयात्रींची स्वतंत्र नोंदही शिक्षण विभागाकडून ठेवली जाणार आहे.

प्रशासकीय कामकाजापुरती भूमिका मर्यादित न ठेवता नागरिकांना सामाजिक कार्याशी जोडण्याचा हा प्रयत्न अकोटमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे. 'चला, आनंद वाटूया... आनंदयात्री होऊया!' या संदेशातून सामाजिक सहभागाचा नवा आदर्श निर्माण होत असून, या उपक्रमाला अधिकाधिक नागरिकांची साथ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

अकोल्यात आजपासून जिल्हास्तरीय युवा महोत्सव

अकोला : युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि संस्कृतीचे जतन करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने उद्या, गुरुवारी (ता. २६) 'जिल्हास्तर युवा महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. येथील स्व. वसंत देसाई क्रीडांगण येथील जिल्हा क्रीडा संकुलात सकाळी ९.३० वाजता या महोत्सवाला सुरुवात होईल. केंद्रीय युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या निर्देशानुसार 'विकसित भारत २०४७' या दृष्टिकोनातून यंदाच्या महोत्सवासाठी 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' ही संकल्पना ठेवण्यात आली आहे. या अंतर्गत सांस्कृतिक विभागात लोकनृत्य, लोकगीत, पथनाट्य, कविता लेखन आणि चित्रकला या कलाप्रकारांच्या स्पर्धा होणार असून, यामध्ये सहभागी होऊ शकतात.

वाहतूक समस्यांवर ठोस उपाययोजनांसाठी आराखडा करा - जिल्हाधिकारी वर्षा मीना

जिल्हास्तरीय रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत चर्चा



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील व जिल्ह्यातील वाहतुकीच्या समस्यांवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी दीर्घ उद्दिष्ट ठेवून ठोस उपाययोजनांचा आराखडा तयार करण्यात यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत जिल्हा रस्ते सुरक्षा समितीची बैठक झाली. सा. बां. कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, निमंत्रित सदस्य प्रदीप गुरूखुदे, परिवहन अधिकारी मनोज शेळके व इतर अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, शहर व जिल्ह्यातील मुख्य रस्ते व त्यावरून वाहतूक लक्षात घेऊन सुरक्षिततेसाठी दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवून ठोस उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने समग्र आराखडा तयार करावा. अपघातप्रवण स्थळांवरील अपघातांची कारणे शोधून तत्काळ उपायांची अंमलबजावणी करावी.

शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी पार्किंग स्थळे निश्चित करण्याबाबत गत बैठकीत निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमण काढण्याचे काम सुरू असून, शक्य तेवढ्या जागा पार्किंगसाठी उपलब्ध करण्यासाठी महापालिकेच्या नगररचना विभागाची कार्यवाही सुरू आहे. गांधी चौक, दुर्गा देवी मंदिरासमोर, कवच संकुलामागील जागा, खंडेलवाल ज्वेलर्समागील जागा, मीरा हॉटेलसमोरील जागा, भाटे क्लब खुला भूखंड, अग्रसेन चौक येथील सावित्रीबाई फुले शाळेचा परिसर आदी ठिकाणे सर्वेक्षणांनुसार पार्किंगसाठी योग्य ठरविण्यात आली आहेत. चार जागांसाठी निविदा प्रक्रियाही राबविण्यात आली आहे.

रतनलाल प्लॉट चौकाचे रूंदीकरण व विकासाचे काम राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित करण्यात आले असून, लवकरच चौकाचे विस्तारीकरण व नूतनीकरण करण्यात येईल. जुन्या आरटीओ रस्त्यावर, जीएसटी कार्यालयासमोर गतिरोधक बसविण्याबाबत, तसेच धर्मवीर आनंद दिघे ट्रॅफिक पार्क निर्माण करण्यासाठी आवश्यक जागेच्या कार्यवाहीबाबतही चर्चा झाली.

वेदिका जायलेची राष्ट्रीय बेसबॉल संघात सलग दुसऱ्यांदा निवड!

■ प्रतिनिधी | अकोट ■



अकोट येथील कु. वेदिका विक्रम जायले हिने बेसबॉल क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय संघात सलग दुसऱ्यांदा स्थान मिळविले आहे. लातूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर तिची राष्ट्रीय संघासाठी निवड झाली. या यशामुळे अकोटसह अकोला जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

वेदिका सेंट पॉल्स अकॅडमी, अकोट येथे इयत्ता अकरावीत शिक्षण घेत असून, सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले. तिच्या यशात आई-वडिलांचे प्रोत्साहन तसेच प्रशिक्षक, क्रीडा अधिकारी आणि शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

महाराष्ट्र बेसबॉल संघटनेचे उपाध्यक्ष इंद्रजित सर, जिल्हा क्रीडा अधिकारी भड सर, अभिजित फिरके, नारायण बटकुले, नवनीत लखोटिया, प्राचार्य विजय बिहाडे, प्रशिक्षक प्रणव डेंढव आणि क्रीडा शिक्षक अभिलाष कलमेघ यांचे तिला मार्गदर्शन लाभले. वेदिकाच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत असून, राष्ट्रीय स्तरावरही ती चमकदार कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

रवी कलोसे आज अकोला दौऱ्यावर

अकोला : राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे हे आज रोजी (गुरुवार, ता.२६ नोव्हेंबर) अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या, लाड-पागे समितीच्या शिफारशी आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणार तसेच याबाबत सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करणार आहेत.

अकोल्यात राज्यस्तरीय शालेय मुलींची फुटबॉल स्पर्धा

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचा क्रीडा विभाग, क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या पुढाकाराने अकोल्यात राज्यस्तरीय शालेय मुलींची फुटबॉल स्पर्धा लालबहादूर शास्त्री स्टेडियम आणि हिंगणा-म्हैसपूर येथील जिल्हा क्रीडा संकुलात होणार आहे.

१४, १७ आणि १९ वर्षाआतील मुलींच्या गटातील या स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन उद्या, गुरुवारी (ता. २६) सकाळी ११ वाजता रिधोरा येथील जसनागरा पब्लिक स्कूल येथे होईल.

या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील आठ विभाग आणि क्रीडापीठ असे एकूण नऊ संघ सहभागी होत आहेत. खेळाडू, प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक आणि तांत्रिक अधिकारी मिळून सुमारे ६०० जणांचा यामध्ये सहभाग असणार आहे. बाहेरगावाहून आलेल्या सर्व खेळाडू व अधिकाऱ्यांची निवास व्यवस्था रिधोरा येथील जसनागरा पब्लिक स्कूलमध्ये करण्यात आली असून, तिथून स्पर्धेच्या मैदानापर्यंत ने-आण करण्यासाठी प्रशासनाकडून स्वतंत्र वाहतूक व्यवस्थाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंना प्रमाणपत्रे, तर विजेत्या संघांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. विशेष म्हणजे, या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे तांत्रिक समितीकडून महाराष्ट्राचा राष्ट्रीय संघ निवडला जाणार आहे. त्यामुळे या स्पर्धेला मोठे महत्त्व प्राप्त झाले असून, अकोला जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, नागरिक आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नंदा खुरपुडे यांनी केले आहे.

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१९०२/२०२६ प्रोसेस नं.१४४९०/२०२६
चौ.ता. २३/१२/२०२६ दिनांक : १६/११/२०२६

अर्जदार : १. वच्छला उर्फ वाचला गजानन घाडगे २. संतोष गजानन घाडगे ३. संजय गजानन घाडगे तिन्ही रा. अमानतपुर टाकोळा, ता. जि. अकोला ४. सौ. शारदा प्रविण साप्ते रा. कदम दांडे नगर, आकाशवाणी केंद्र देवपुर, ता जि. धुळे

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयताचा पत्ता :- मयत : १. गजानन आनंदा घाडगे

पत्ता :- रा. अमानतपुर टाकोळा, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, गजानन आनंदा घाडगे यांचे दि. १०/०४/२०२५ रोजी अमानतपुर टाकोळा, येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबल वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. ह्याची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१७५१/२०२६ प्रोसेस नं.१३३०४/२०२६
चौ.ता. २७/११/२०२६ दिनांक : १७/१०/२०२६

अर्जदार : १. वंदना अशोक धुरंधर रा. लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. पवन अशोक धुरंधर रा गायत्री नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला ३. सुप्रीया अशोक धुरंधर रा. सूर्यासिटी, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. ४. मनीषा अशोक धुरंधर रा गौतम नगर, खडकपुरा, बार्शिटाकळी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : निल

मयताचा पत्ता :- मयत : अशोक उर्फ गुजाबराव धुरंधर

पत्ता :- रा. सुर्यासिटी, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक उर्फ गुजाबराव धुरंधर यांचे दि. ०३/०६/२०२६ रोजी शिवनी रेल्वे स्टेशन, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांका २७/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, अकोला यांचे न्यायालय क ०४ अकोला

किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक १४०२ / २०२६ चौकशी तारीख : १९/१२/२०२६

जाहीरनामा

अर्जदार : अनंत काशीराम वाठुरकर

.... विरूध्द.....

गैरअर्जदार : जन्म व मृत्यु विभाग अकोला

वि.न्यायालयाच्या आदेशानुसार या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की अर्जदार नामे अनंत काशीराम वाठुरकर जन्म झाला दिनांक ०३/०६/१९४० रोजी अकोला येथे जन्म झाला, असून त्यांचा जन्माची नोंद अकोला महानगरपालिका येथे नसल्या कारणाने त्यांच्या जन्माची नोंद होण्याकरिता त्यांनी Application Under Section 13 (3-A) of The Birth And Death Registration Act 1969 For Taking the Entry of Death / Birth अश्या स्वरूपाचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यावर पारीत झालेल्या आदेशानुसार या जाहिर नोटिसद्वारे त्यांचे जन्माची / मृत्य नोंद होणेसंदर्भात कुणालाही काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी पुढील चौकशी ता १९/१२/२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी स्वतः किंवा वकीलामार्फत आ नोंदवावा जर चौकशी तारीख १९/१२/२०२६ पर्यन्त कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कुणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जातील असे सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येत आहे.

आज दिनांक २९ माहे नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय तथा न्यायदंडाधिकारी
प्र. श्रेणी कोर्ट क ०४ अकोला

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, अकोला यांचे न्यायालय क ०५ अकोला

किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक १७०८/२०२६ चौकशी तारीख : १९/१२/२०२६

जाहीरनामा

अर्जदार : चंद्रकांत बाबाराव पाटील

... विरूध्द...

गैरअर्जदार : सचिव, ग्राम पंचायत, लोणाग्र

वि. न्यायालयाच्या आदेशानुसार या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते आहे की अर्जदाराचे वडील नामे बाबाराव सिताराम पोटोल मृत्य दिनांक १३/०९/१९७८ रोजी लोणाग्रा, ता. जि. अकोला. येथे मृत्य झाला, असून त्यांचा मृत्यू नोंद लोणाग्रा ग्रामपंचायत ता. जि. अकोला येथे नसल्या कारणाने त्यांच्या मृत्यु नोंद होण्याकरीता त्यांनी Application Under Section 13(3) of The Birth And Death Registration Act 1969 For Taking the Entry of Death/Birth अश्या स्वरूपाचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यावर पारीत झालेल्या आदेशानुसार या जाहिर नोटिसद्वारे त्यांचे मृत्यू नोंद होणेसंदर्भात कुणालाही काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी पुढील चौकशी ता १९/१२/२०१६ रोजी किंवा त्यापुर्वी स्वत: किंवा वकीलामार्फत आक्षेप नोंदवावा जर चौकशी तारीख १९/१२/२०२६ पर्यन्त कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कुणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जातील असे सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे.

आज दिनांक २५ माहे नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय तथा न्यायदंडाधिकारी
प्र. श्रेणी कोर्ट क ०५ अकोला

जाहीर सूचना

सर्वत्र लोकांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार जीवनकुमार रामराव अंभोरे आणि सौ. सविता जीवन अंभोरे यांनी नि. तथागत मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था अकोला तर्फे कुल मुखत्यार सिमांत मधुकर तायडे यांच्याकडून अकोला महानगर पालिका हद्दीमधील मौजे निजामपूर शिट सर्व्हे नंबर २/१ मधील गट क्रमांक भूखंड नंबर ५६ ज्याचे क्षेत्रफळ २२६ चौरस मीटर त्यावरील बांधकाम क्षेत्र २१८.९० चौरस मीटर असे आहे.

ज्यास चतुर्सिमा : पूर्वेस - प्लॉट क्रमांक ५७, पश्चिमेस - ९.०० मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस - ६.०० मीटर रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - ९.०० मीटर रुंदीचा रस्ता, अशा वर्णनाची मालमत्ता विकत घेण्याचा सौदा कायम केला असून लवकरच खरेदी करून घेणार आहेत. तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

पक्षातारातर्फे
ॲड. समीर कुशवाह
पत्रकार कॉलनी, नवीन बस स्थानक मागे
अकोला मोबाईल: ८९५६९११७४९

जनमाध्यम जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३४१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

पाण्याअभावी टमाटर-मिरचीची बाग उद्ध्वस्त

टँकरने पाणी विकत घेऊनही पीक वाचले नाही, महिला शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान, कर्जफेडीचे संकट

आष्टी शहीद/जनमाध्यम

एकीकडे शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्या घोषणा आणि सिंचनाच्या योजनांचा गाजावाजा सुरू असताना दुसरीकडे पाण्याअभावी शेतकऱ्यांची उभी पिके डोळ्यांदेखत उद्ध्वस्त होत आहेत. कारंजा घाडगे तालुक्यातील बोटोणा येथील महिला शेतकरी वंदना दिलीप फुके यांनाही यंदाच्या भीषण पाणीटंचाईचा मोठा फटका बसला आहे. लाखो रुपये खर्च करून फुलविलेली टमाटर आणि मिरचीची बाग पाण्याअभावी सुकून गेली. टँकरने पाणी विकत घेऊनही पिकांना जीवदान देता आले नाही. त्यामुळे शेतीसाठी घेतलेले कर्ज फेडायचे कसे, असा गंभीर प्रश्न फुके कुटुंबासमोर उभा ठाकला आहे.

बोटोणा येथील वंदना दिलीप फुके (५०) यांनी मौजा बोटोणा येथील सर्वे क्रमांक ४ मध्ये अर्धा एकर क्षेत्रात टमाटर, तर अर्धा एकर क्षेत्रात मिरचीची लागवड केली होती. जुलै महिन्यात खाजगी कर्ज आणि स्वतःजवळील जमा पुंजी खर्च करून त्यांनी ही बाग उभी केली. जमीन सपाटीकरण, नांगरणी, ओखरणी, मल्चिंग, बांबू, दोरी, लागवड साहित्य आणि मजुरी अशा विविध बाबींवर मोठा खर्च करण्यात आला. सुरुवातीला विहिरीतील पाण्याच्या आधारावर पिकांची वाढही चांगली होत होती. मात्र, पावसाने पाठ फिरविल्याने विहिरींनी तळ गाठला आणि संपूर्ण बागेवर पाण्याचे संकट कोसळले.



टँकरचे पाणीही ठरले अपुरे

हातातोंडाशी आलेली पिके वाचविण्यासाठी वंदना फुके यांचे पुत्र विक्रम फुके यांनी टँकरद्वारे पाणी विकत घेऊन बाग जगविण्याचा प्रयत्न केला. आधीच लाखो रुपयांचा खर्च झालेला असताना पाण्यासाठीही पदरमोड करावी लागली. मात्र, टँकरने आणलेले पाणी पिकांची गरज भागविण्यास अपुरे पडले.

ड्रायझोनचा शाप; शेती करायची तरी कशी

बोटोणा गावाचा समावेश आधीपासूनच ड्रायझोन क्षेत्रात आहे. परिसरातील जमीन खडकाळ असल्याने विहिरी खोदूनही मुबलक पाणी मिळेल याची खात्री नसते. दरवर्षी पाणीटंचाईचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे ठाकते. यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे.

एकीकडे शेतीसाठी घेतलेले कर्ज आणि दुसरीकडे उत्पन्नाची आशा असलेली दोन्ही पिके उद्ध्वस्त झाल्याने वंदना फुके यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा आणि घेतलेले कर्ज फेडायचे कसे, या विवंचनेत हे कुटुंब सापडले आहे.शासनाने या गंभीर समस्येची दखल घेऊन परिसरात कायमस्वरूपी सिंचन प्रकल्प उभारावा. पाणीटंचाईमुळे नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे.

शूरवीरांच्या बलिदानाची स्मृती जागवणार; वीरमाता-वीरपत्नींचा होणार सन्मान

शिवसेनेतर्फे आज वर्धेत देशभक्तीपर कार्यक्रम

वर्धा/जनमाध्यम

देशाच्या रक्षणासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या वीर जवानांचे बलिदान कधीही विसरता येणार नाही. मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी जिल्हा शिवसेनेच्या वतीने देशभक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम आज सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी शिवसेनेचे लोकसभा संघटक रविकांत बालपांडे राहणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, ज्येष्ठ माजी सैनिक भालचंद्रजी कठाळे, उपविभागीय अधिकारी कुश मोठवाणी, नगर रचनाकार भाग्यश्री बोरकर, राष्ट्रीय बजरंग दलाचे विदर्भ प्रांत अध्यक्ष अनुप जयस्वाल, समाजसेवक अश्विन साहू आणि नॅशनल यूथ युनियन ऑफ इंडियाचे संस्थापक घनश्याम अहारी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे ठाणे येथील प्रसिद्ध संगीतकार व गायक मदनजी दुबे यांचा 'एक शाम शहीदों के नाम' हा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम.विशेष म्हणजे, देशासाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या जवानांच्या वीरमाता, वीरपत्नी तसेच कुटुंबातील सदस्यांचा स्मृतिचिन्ह आणि साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात येणार आहे.युवकांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि देशसेवेची भावना रुजविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहीद जवानांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन प्रमुख तथा उपजिल्हाप्रमुख मिलन गांधी यांनी केले आहे.



राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेचा वर्धेत जल्लोषात समारोप

आठ विभागांतील ३०० खेळाडूंचा सहभाग; आ.मनीषा कायंदे यांच्याकडून ५ लाखांचे आर्थिक सहकार्य

वर्धा/जनमाध्यम

राज्यभरातील उदयोन्मुख टेबल टेनिसपटूंच्या कौशल्याचा कस पाहणाऱ्या राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेची वर्ध्यात उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. महाराष्ट्रातील आठही महसुली विभागांतील सुमारे ३०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवित आपल्या खेळाची चमक दाखविली. विशेष म्हणजे, स्पर्धेच्या आयोजनासाठी विधान परिषद सदस्य तथा शिवसेना नेत्या आ. डॉ. मनीषा कायंदे यांनी आमदार निधीतून ५ लाख रुपयांचे आर्थिक सहकार्य उपलब्ध करून दिले.



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि वर्धा डिस्ट्रिक्ट अमॅच्युअर टेबल टेनिस असोसिएशनच्या (WDATTA) तांत्रिक सहकार्याने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा २२ ते २४ नोव्हेंबरदरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, वर्धा येथे पार पडली. १४ व १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या गटांत सामने रंगले. अमरावती, नागपूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मुंबई आणि लातूर या आठ महसुली विभागांतील खेळाडू व प्रशिक्षकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी आमदार डॉ. मनीषा कायंदे होत्या. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश सराफ, प्रशांत (बाळा) शहागडकर, रायगडचे संघटना प्रतिनिधी संजय कडू, जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, शहरप्रमुख शार्दूल वांदिले, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख शुभांगी ठमेकर, अशोक राऊत, भारती तिवारी, अटलबिहारी पांडे, अश्विन रामटेके, असोसिएशनचे सचिव ओम तिवारी,संदीप खोब्रागडे आणि तालुका क्रीडा अधिकारी गणेश येल्लावार यांची उपस्थिती होती.

वर्धा जिल्ह्याला या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे यजमानपद मिळाल्याने जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा विभाग, टेबल टेनिस असोसिएशनचे पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन पल्लवी पुरोहित यांनी केले.

संक्षिप्त

भरधाव कारची दुचाकीला धडक; दोघे मित्र जखमी

वर्धा-भरधाव चारचाकी वाहनाने इंडिकेटर न देता अचानक वळण घेत दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील दोघे मित्र रस्त्यावर पडून जखमी झाले. अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून पसार झाला. ही घटना २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास नागपूर मार्गावरील नालवाडी परिसरात घडली. फिर्यादी मित्रासोबत दुचाकीने जात असताना पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनाने अचानक वळण घेत त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यामुळे दोघांचेही नियंत्रण सुटून ते रस्त्यावर पडले. फिर्यादीच्या गुडघ्याला मुकामार लागला, तर मित्राच्या पायाला व हाताला दुखापत झाली. दुचाकीचेही नुकसान झाले. दोघांनी वर्धा येथील शासकीय रुग्णालयात उपचार घेतले. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी संबंधित कारचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

वेणा नदीपात्रातून रेतीची चोरी; ६.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंगणघाट-वेणा नदीपात्रातून विनापरवाना काळ्या रेतीचे उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर हिंगणघाट पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ट्रॅक्टर, ट्रॉली आणि रेती असा एकूण ६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी नरसाळा घाट ते सेलू (मुरपाड) मार्गावर ही कारवाई करण्यात आली.पोलिसांना गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पथकाने पंचांसह परिसरात नाकाबंदी केली.यावेळी संशयास्पद ट्रॅक्टर-ट्रॉली येताना दिसताच पोलिसांनी ते थांबवून तपासणी केली.ट्रॉलीमध्ये काळी रेती आढळली. चालक स्वप्नील दिगांबर नेताम याने अजय ठक यांच्या संगनमताने नरसाळा घाटातून विनापरवाना रेती आणल्याचे सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले. ट्रॅक्टर, ट्रॉली आणि रेती जप्त करण्यात आली. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बँकेतून पैसे आणण्यासाठी गेलेली ८५ वर्षीय वृद्धा बेपत्ता

सावंगी (मेघे)-बँकेतून निराधार योजनेचे पैसे आणण्यासाठी जाते, असे सांगून घराबाहेर पडलेली ८५ वर्षीय वृद्धा बेपत्ता झाली. लीलाबाई गंगाधर कोसेकर असे त्यांचे नाव असून, त्या पडेगाव येथील रहिवासी आहेत. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास त्या बँकेत जाण्यासाठी घरातून निघाल्या. मात्र, बराच वेळ होऊनही परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. नातेवाइकांकडे तसेच परिसरात चौकशी करूनही त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर मुलाने सावंगी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून त्यांना पळवून नेले असावे, असा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. बेपत्ता वृद्धेने लाल रंगाचे लुगडे व लाल स्वेटर परिधान केले असून, त्यांच्याकडे बँकेचे पासबुक आणि आधारकार्ड असल्याची माहिती पोलिसांनी दिली. सावंगी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

पूजाऱ्यावर हल्ल्याचा प्रयत्न

अल्लीपूर-मंदिरात पूजा करण्यासाठी गेलेल्या पुजाऱ्यावर चाकूसदृश लोखंडी वस्तूने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची घटना अल्लीपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या हल्ल्यात पुजाऱ्याच्या हाताच्या बोटाला दुखापत झाली. फिर्यादी हे सन २००० पासून मंदिरात पुजारी म्हणून पूजा-पाठ करतात. आरोपीने त्यांना मंदिरात येऊ नये, असे यापूर्वीही सांगितले होते. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.०८ वाजताच्या सुमारास फिर्यादी मंदिरात साफसफाई व पूजा करण्यासाठी गेले असता आरोपी हातात लोखंडी चाकूसदृश वस्तू घेऊन तेथे आला.फिर्यादीने हाताने वार रोखण्याचा प्रयत्न केला असता अंगठ्याजवळील बोटाला जखम झाली. यानंतर जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

शेतातून तरुण बेपत्ता

आष्टी-शेतातून ऑटोमध्ये कापसाचे गाठोडे घेऊन येतो, असे सांगून घराबाहेर पडलेला २३ वर्षीय तरुण बेपत्ता झाला. शैलेश रमेश मनोहरे असे त्याचे नाव असून तो बोरगाव येथील रहिवासी आहे. २२ नोव्हेंबर रोजी वडील आणि आई नातेवाइकांच्या लग्नासाठी वरूड येथे गेले होते. त्यावेळी शैलेश घरीच होता. सायंकाळी वडील घरी परतले असता लहान मुलाने शैलेशचा निरोप सांगितला. त्यानंतर वडिलांनी शैलेशच्या मोबाईलवर संपर्क साधला असता फोन बंद असल्याचे आढळले. नातेवाइकांकडे आणि परिसरात शोध घेऊनही तो मिळून आला नाही. त्यामुळे अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय वडिलांनी व्यक्त केला. याप्रकरणी आष्टी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

भक्तिमय वातावरणात सामूहिक तुळशीविवाह; काकड आरतीची सांगता

हिंगणघाट/जनमाध्यम

हिंगणघाट येथील टिळक चौक परिसरातील तहसीलदार मंदिरात सामूहिक तुळशीविवाह, हरिहर भेट आणि एक महिना चाललेल्या काकड आरतीचा समारोप मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडला. यानिमित्त मंदिर परिसरात धार्मिक आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.



दरवर्षी प्रमाणे यंदाही मंदिरात महिनाभर काकड आरतीचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक उपक्रमाची सांगता ह.भ.प. रमेशपंत तांबोळी महाराज यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर विधिवत सामूहिक तुळशीविवाहाचा कार्यक्रम पार पडला. हरिहर भेट आणि चातुर्मास समारंभही मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. धार्मिक विधी, भजन आणि भक्तिमय वातावरणामुळे उपस्थित भाविकांनी या सोहळ्याचा आनंद घेतला.या कार्यक्रमाला रवींद्र महाराज गुजर, पत्रकार केशव तितरे, आशिष पाराशर, कमलाकर हिंगे, श्यामकांत उंडे, विजय ठाकरे, किशोर उगले, प्रगतबाबू तितरे, सुधाकर काटकमवार यांच्यासह पुष्पाबाई पाराशर, सुनंदा पाराशर, कविता वांढरे, सुमन उंडे, सुलोचना हिंगे, रेखा बोरटकर, छाया पिंसुड्डे, कल्पना डेकाटे, सीमा पाके, कल्पना पाके, गीता दुबे, आशा झाडे, लीला शेनाड, लीला बल्लेवार, आरती काळे, सोनू पाराशर, पूजा पाराशर, रूपा शेंडे, सोनाक्षी लाडे, रितू चाफले, रेखाबाई धात्रक, सरोज धात्रक, माधुरी तितरे, इंदिरा मेले यांच्यासह मंदिर परिसरातील असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

निमगाव सबाने येथे गावदिंडी आणि रामधूनने परिसर दुमदुमला

निमगाव सबाने/जनमाध्यम

निमगाव सबाने येथे काकडा आरती समाप्ती आणि बाबासाहेब सबाने यांच्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक व भावपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. यानिमित्त गावातून भक्तिमय गावदिंडी काढण्यात आली. रामधुनीच्या गजराने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. बाबासाहेब सबाने यांनी गावासाठी केलेल्या कार्याची आठवण आणि त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गावकऱ्यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते. गावदिंडीत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भजन, रामधून आणि भक्तिमय वातावरणामुळे परिसरात चैतन्य निर्माण झाले. बाबासाहेब सबाने यांच्या स्मृतींना अभिवादन करत ग्रामस्थांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. धार्मिक परंपरेसोबतच व्यक्तींच्या स्मृती जपण्याचा आदर्श या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.





युवकांनी अनुभवला वायुसेनेचा आकाशातील थरार

सुखोई, चिनूक, सूर्यकिरण अन् गरुड कमांडोंच्या प्रात्यक्षिकांनी युवक भारावले

वर्धा/जनमाध्यम

आकाशात घिरट्या घालणारे सुखोई लढाऊ विमान, चिनूक हेलिकॉप्टरची ताकद, सूर्यकिरण पथकाची चित्तथरारक हवाई कसरत आणि गरुड कमांडोंचे साहसी प्रात्यक्षिक. भारतीय वायुसेनेचे हे सामर्थ्य प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी वर्धा जिल्ह्यातील १०० युवकांना मिळाली. वर्धा युवक महोत्सव समिती आणि युवा शांतता प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मिशन स्काय हाय २०२६ हा उपक्रम उत्साहात पार पडला.

नागपूर येथे आयोजित भारतीय वायुसेनेच्या भव्य हवाई प्रात्यक्षिकांसाठी वर्ध्यातील १०० युवकांची चमू दाखल झाली होती. सारंग हेलिकॉप्टर पथक, सूर्यकिरण हवाई कसरत पथक, सुखोई एसयू ३० एमकेआय लढाऊ विमाने आणि चिनूक हेलिकॉप्टरच्या प्रात्यक्षिकांनी युवकांना मंत्रमुग्ध केले. गरुड कमांडोंची कार्यपद्धती, आधुनिक साधनसामग्री आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमधून युवकांना संरक्षण दलाच्या शिस्तीची जवळून ओळख झाली.

या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच वायुसेनेच्या देखभाल कमांडचे प्रमुख उपस्थित होते. विद्यार्थ्यांना वायुसेनेत भरती होऊन देशसेवा करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. स्मृतिचिन्हेही प्रदान करण्यात आली.बजाज अभियांत्रिकी संस्था, अदानी तंत्रज्ञान संस्था, जी. एस. एम. शिकवणी वर्ग तसेच ग्रामीण भागातील युवकांचा सहभाग हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.या उपक्रमाचे नेतृत्व सारंग रघाटाटे यांनी केले. गेल्या १५ वर्षांपासून मनात जपलेले स्वप्न १०० युवकांच्या सहभागातून साकार झाल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. फाल्गुनी आत्राम, खुशी साहू, हेमंत वराडे, चित्रांश झाडे आणि स्वयंसेवकांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

फवारणीच्या कामावर गेलेला तरुण बेपत्ता

हिंगणघाट-फवारणीच्या कामासाठी जेवणाचा डबा घेऊन घराबाहेर पडलेला २७ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची घटना हिंगणघाट तालुक्यात उघडकीस आली. मंगेश भाऊराव शेंदरे असे बेपत्ता तरुणाचे नाव आहे. तो पत्नीसमवेत पारडी (नगाजी) येथे राहत असून मजुरी करतो. १७ सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजता तो बुरकोणी येथील वडिलांच्या घरी आला. फवारणीच्या कामावर जायचे असल्याचे सांगून त्याने जेवणाचा डबा घेतला आणि घर सोडले. मात्र, सायंकाळपर्यंत तो परतला नाही. वडिलांनी सुनेला फोन करून विचारणा केली असता मंगेश तिच्याकडेही आला नसल्याचे समजले.

त्यानंतर कुटुंबीयांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला. दरम्यान, अनोळखी क्रमांकावरून फोन करून त्याने वडिलांशी संवाद साधल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. मात्र, त्यानंतर संपर्क झाला नाही. अखेर वडिलांनी हिंगणघाट पोलिसांत धाव घेतली. अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळविल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून पोलिसांकडून शोध सुरू आहे.

वन्यप्राण्यांमुळे पीक नुकसान; पंचनाम्यांसाठी कृषी सहाय्यकांची दिरंगाई

आष्टी (शहीद)/जनमाध्यम

वन्यप्राण्यांकडून शेतीपिकांचे नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्यांना भरपाई मिळविण्यासाठी शासनाच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. एकीकडे वन्यप्राण्यांकडून पिकांचे नुकसान होत असताना दुसरीकडे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पंचनाम्यांसाठी नियुक्त करण्यात आलेली त्रिस्तरीय समितीच वेळेवर कार्यरत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. विशेषतः कृषी सहाय्यक पंचनाम्याच्या वेळी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहत नसल्याने संपूर्ण प्रक्रिया रखडत असल्याचा आरोप होत आहे. परिणामी वनरक्षकांची अडचण वाढली असून शेतकऱ्यांना नुकसानभरपाईसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

पीक नुकसान पंचनाम्यासाठी कृषी सहाय्यक, तलाठी आणि वनरक्षक अशी त्रिस्तरीय समिती कार्यरत आहे. या समितीतील वनरक्षकाची महत्त्वाची जबाबदारी म्हणजे संबंधित पिकाचे नुकसान वन्यप्राण्यांमुळेच झाले आहे का, याची खातरजमा करणे. त्यानंतर आवश्यक पंचनामा करून संबंधित प्रकरण वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाते. नियमानुसार पीक नुकसान प्रकरणाचा अहवाल १५ दिवसांच्या आत वरिष्ठांकडे सादर करणे बंधनकारक असल्याचे सांगितले जाते.

पत्र देऊनही गैरहजेरी; मग जबाबदारी कोणाची

विशेष बाब म्हणजे पंचनाम्यासाठी उपस्थित राहण्याबाबत लेखी पत्रव्यवहार करूनही संबंधित अधिकारी घटनास्थळी हजर राहत नसतील, तर या दिरंगाईची जबाबदारी निश्चित कोण करणार शेतकऱ्यांच्या नुकसानीची वेळेत नोंद होणे आवश्यक असताना प्रशासकीय समन्वयाच्या अभावामुळे शेतकऱ्यांनाच त्रास सहन करावा लागत आहे.

पंचनामे रखडल्याने नुकसानभरपाईची पुढील प्रक्रिया देखील लांबणीवर पडत असल्याची तक्रार शेतकरी करीत आहेत.

सध्याच्या त्रिस्तरीय समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून कृषी सहाय्यक व तलाठी यांना समितीतून वगळून स्वतंत्र आणि वेळेत पंचनामे पूर्ण करणारी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची मागणी पुढे येत आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यानंतर त्यांना तातडीने मदत मिळणे अपेक्षित असताना पंचनाम्यांच्या प्रक्रियेतच विलंब होत असेल, तर नुकसानभरपाई मिळण्याचा उद्देशच निष्फळ ठरण्याची भीती आहे.

त्यामुळे वरिष्ठ वनविभाग, महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी, तसेच प्रलंबित पंचनामे व भरपाई प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१५ अंक १
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

मार्च २०२७ अखेरपर्यंत शहराला पाणी कपातीची आवश्यकता नाही - आ. सुलभा खोडके

अमरावती/प्रतिनिधीः- अप्पर वर्धा धरणात सध्या २२६.४४ दलघमी (४०.१५%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून, त्यानुसार मार्च २०२७ अखेरपर्यंत अमरावती शहराला पिण्यासाठी पुरेसा पाणीसाठा आहे. त्यामुळे सध्या तरी शहरात पाणी कपात करण्याची गरज नसल्याचे आमदार सुलभा खोडके यांनी स्पष्ट केले.

अप्पर वर्धा धरणातील जलसाठ्याच्या नियोजनासंदर्भात बुधवारी (दि. २५) सिंचन सेवा भवन येथे आढावा बैठक पार पडली. यावेळी जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पिण्याच्या पाण्याची खात्री झाल्याशिवाय सिंचन व उद्योगासाठी पाण्याचे आरक्षण देता येणार नाही.शहराची दैनंदिन मागणी, वितरण व्यवस्था आणि संभाव्य गरजा लक्षात घेऊन पाण्याचा नियोजनबद्ध वापर करावा व नियमित पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी खबरदारी घ्यावी, अशा सूचना आ. खोडके यांनी प्रशासनाला दिल्या. या बैठकीला आ. संजय खोडके, यश खोडके यांच्यासह जलसंपदा, महापालिका व मजीप्राचे अधिकारी तसेच विविध पदाधिकारी उपस्थित होते.

जाहीर नोटीस
वि.ए.बी.कट्टे साहेब, न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०१)
कि.कि.अर्ज क्र. १४४४/२०२६

अर्जदार - राजेश कृष्णराव पातुर्डे, वय ५४ वर्षे
रा.गायत्री मंदिराजवळ, जयगुरुनगर, गणेश कॉलनी, ता.जि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, नोंदणी अधिकारी
ग्रा.पं.मारडा, ता.तिवसा, जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३) प्रमाणे यातील अर्जदार **राजेश कृष्णराव पातुर्डे** यांच्या जन्माची नोंद दिनांक **२४.१०.१९७२** रोजी झाली आहे, अशी नोंद करणेचा हुकूम होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०१ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०१.०१.२०२७ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आदेशानुसार,
व.लिपिक,
शिक्का
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
अमरावती

जाहीर नोटीस
वि.ए.बी.कट्टे साहेब, न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०१)
कि.कि.अर्ज क्र. १३२२/२०२६

अर्जदार - अरविंद नागोरावजी डेहणकर, वय ५७ वर्षे
रा.यावली शहीद, अमरावती, ता.जि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, नोंदणी अधिकारी
ग्रा.पं.कार्यालय, यावली शहीद, जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३) प्रमाणे यातील अर्जदार **अरविंद नागोरावजी डेहणकर** यांनी **यशोदाबाई चंद्रभानजी डेहणकर** यांच्या जन्माची नोंद दिनांक **१२.०९.१९७०** रोजी झाली आहे, अशी नोंद करणेचा हुकूम होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०१ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १०.१२.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आदेशानुसार,
व.लिपिक,
शिक्का
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 160/19/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **जय हनुमान सार्वजनिक ट्रस्ट धानोरा अंभोरी, ता.मोर्शी जि.अमरावती**

बाबत अर्जदार - **श्री.चैतराम नवलसा पंधरे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०६.१०.२०२६** रोजी दिली.

शिक्का
अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

Govt.of Maharashtra
Regional Referral Service Hospital, Amravati
Tender Notice

Tender Reference No.:
E-1/Equipment/MS RRSH Amt./Equipment/
Installation and at RRH Amravati (2026-27)

Office of the Medical Superintendent, Regional Referral Service Hospital, Amravati, invites ONLINE BID/Tender for the year 2026-27 in two envelope systems from the Manufacturers/importers/Authorized Distributor/Consortium for the purchase of following items.

Schedule of requirements :

Sr. No.	Equipment/ Item Name	Tender (Rs.)	EMD (Rs.)	Consignee & Delivery Address
1.	See List-Annexure XIV Tender Item List (Specification Attached)	20000/-	140000/-	Regional Referral Service Hospital Amravati.

Interested eligible bidders may obtain further information of technical specifications, required quantities and other terms and conditions applicable for procurement of above items from the tendering website **https://mahatenders.gov.in.**

Bidders will have to compulsorily quote for all equipment and quantity listed in schedule of requirement and the evaluation will be conducted on combined price quoted for all equipment.

A complete set of tender documenets may be purchased by interested eligible bidder by online payment of a non-refundable fee ("Bid Tender Fee") Bidder has to pay online payment of bid fee by RTGS/NEFT via https://mahatenders.gov.in. portal to the A/c of "Officer on special Duty Regional Referral Service Hospital, Amravati," as p er the table given and within time as per schedule.

As per Govt.Resolution by Industries, Energy & Labour Department, Maharashtra State Dated 1.12.2016 - Entitles who are registered under micro, small and medium enterprises development act, 2006 are exempted from paying Tender form Fee and Earnest Money Deposits.

The bidders shall be rejected summarily upon failure to follow procedure prescribed in the bid document. The conditional bid shall be rejected.

Medical Superintendent, Regional Referral Service Hospital, Amravati reserves all the rights regarding this bid documents, procedure and cancellation without any justification.

(विमाका/अम/जाही/६७३/२०२६-२०२७)

Medical Superintendent
Regional Referral Service Hospital
Amravati

पाहिजेत
रात्रपाळीत पार्ट टाईम मशीनवर कामासाठी होतकरु मुले पाहिजे.
संपर्क
९९७५३१३५९६

Appendix G., No.6
DISTRICT & SESSION COURT AMRAVATI
IN THE COURT OF Yashwant Anand Goswami
District Judge-2 and A.S.J.Amravati, Amravati
NOTICE TO RESPONDENT OF THE DAY FIXED FOR THE HEARING OF THE APPEAL
(0. 41] r. 14)
R.C.A./164/2025
Premchand Dharamdas Gupta Dead by Legal Representatives - Vs - Ramesh Parichartji Gupta and Others
Next Date : 04.01.2027
Appeal from the Judgement and decree in R.C.A./212/2011 of the Court the

To,
1. Tara Anil Parsone
R/o Kalyan Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati. (M.S.)

Take notice that an appeal from the decree of in this case has been presented by **Premchand Dharamdas Gupta Dead By Legal Representatives** and registered in this Court, and that the 04.01.2027 has been fixed by this court for the hearing of this appeal.

If no appearance is made on your behalf by yourself, your pleader, or by some one by law authorized to act for you in this appeal, it will be heard and decided in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 23.11.2026

Assistant Superintendent,
District Judge-2 and A.S.J.
Amravati

Note : If a stay of execution has been ordered, intimation should be given of the fact on this notice.

महानगरपालिका, अमरावती
सार्वजनिक आरोग्य विभाग

जाहीरात प्रारुप - जाहीरात नं.०७

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, अमरावती महानगरपालिका, अमरावती - २०२६-२७

१५ व्या वित्त आयोगा अंतर्गत Polyclinic Specialist पदाकरीता Walk-in-Interview द्वारा पदभरती - २०२६-२७

राष्ट्रीय आरोग्य अभियान, अमरावती महानगरपालिका अंतर्गत कंत्राटी तसेच Specialist पदांची Walk-in-Interview ने पदभरती करावयाची आहे.

१) स्पेशालिस्ट पदे (Incentive Based) रिक्त पदाचा तक्ता

अ.क्र.	पदांची नांवे	रिक्त पदे
1.	Psychiatrist	2
2.	Physician (Medicine)	4
3.	Pediatrician	4
4.	Opththalmologist	3
5.	Dermatologist	4
6.	E.N.T.	4
	Total	21

टिप - सदर पदांची थेट मुलाखत (Walk-in-Interview) प्रत्येक मंगळवारी घेण्यात येईल.

थेट मुलाखतीकरीता सोबत अर्ज सादर करण्याची पध्दत -

१) जाहीरात ऑनलाईन व वृत्तपत्रातून प्रसिध्द केली जाईल.

२) त़सेच अमरावतीचे वेबसाईट www.amravaticorporation.in वर जाहीरात उपलब्ध राहील.

३) दिनांक १.१२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून

४) जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून प्रत्येक मंगळवारी उमेदवारांनी मा.अतिरिक्त आयुक्त/मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी दालनात आपली सर्व शैक्षणिक कागदपत्रे घेऊन (एक original set व एक Xerox set Self-attested करुन) उपस्थित रहावे. ही पदभरती ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून प्रत्येक मंगळवारी मा.आयुक्त यांच्या दालनात walk-in-interview ठेवण्यात येतील, याची नोंद घ्यावी. (रिक्त पदे असेपर्यंत)

वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
महानगरपालिका, अमरावती
Digitally signed by
Vishal Sopanrao Kale
Dt.29.06.2026

आयुक्त
महानगरपालिका, अमरावती
Digitally signed by
Mangesh Manohar Gondavale
Dt.18.09.2026

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बड़नेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ८३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९

ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस
वि.ए.बी.कट्टे साहेब, न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०१)
कि.कि.अर्ज क्र. १३१८/२०२६

अर्जदार - अरविंद नागोरावजी डेहणकर, वय ५७ वर्षे
रा.यावली शहीद, अमरावती, ता.जि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, नोंदणी अधिकारी
ग्रा.पं.कार्यालय, यावली शहीद, जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३) प्रमाणे यातील अर्जदार **अरविंद नागोरावजी डेहणकर** यांनी **सिताराम हिरामणजी डेहणकर** यांच्या जन्माची नोंद दिनांक **२२.११.१९७५** रोजी झाली आहे, अशी नोंद करणेचा हुकूम होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०१ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ११.१२.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आदेशानुसार,
व.लिपिक,
शिक्का
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२३८४/२०२६
रजनी दामोधरराव गुडधे व ईतर -वि- निरंक
पुढील ता.२२.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : १. रजनी दामोधरराव गुडधे, वय ६७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. विद्याशाली दामोधर गुडधे (लग्नापुर्वीचे नांव) सौ.विद्याशाली बाबाराव तायडे (लग्नानंतरचे नांव) वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. कु.सुदर्शना दामोधर गुडधे,(लग्नापुर्वीचे नांव) सौ.सुदर्शना सामेश्वर ससाने (लग्नानंतरचे नांव) वय ४४ वर्षे व्यवसाय - घरकाम
४. शालिनी राजदीप गुडधे, वय ४४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
५. राज्यंश राजदीप गुडधे, वय २० वर्षे, व्यवसाय - शिक्षण
६. राजवीर राजदीप गुडधे, वय १४ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
अर्जदार नं.६ अज्ञान तर्फे आई अर्जदार नं.४ अ.पा.क.
सर्व रा.उत्तम नगर, गल्ली नं.४ भीमटेकडी जवळ, अमरावती
-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत दामोधरराव बारकाजी गुडधे** यांचे दिनांक **२५.०७.२०१७** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार रजनी दामोधरराव गुडधे व ईतर वि.निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रजनी दामोधरराव गुडधे व ईतर वि.निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

शिक्का

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३३८/२०२६
नेहा नितीन दांडगे अधिक तीन -वि- निरंक
पुढील ता.१७.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Neha Nitin Dandge, Age 56 Yrs. Occu.: Household
R/o Dasra Road, 302, Madhav Nagar, Ukli, Behind HVPM Amravati
2. Harsha Sanjay Saoji, Age 54 Yrs. Occu.: Household
R/o K-52, Apartment, Flat No.B-302] Karve Nagar, Pune
3. Manohar Madhusudan Joshi, Age 51 Yrs. Occu.: Service
R/o 2602, Deer Field, Dr.Edison TWP New Jersy (USA)-08820-4416
4. Madhusudan Pandurang Padhye, Age 87 Yrs. Occu.: Retired
R/o Madhav Nagar, Behind HVPM Amravati
-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sumati Madhusudan Padhye हे दिनांक 22.08.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Neha Nitin Dandge+3 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Neha Nitin Dandge+3 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

शिक्का

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर,३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४१४/२०२६
विमल बकारामजी भलावी अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.१७.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Vimal Bakaramji Bhalavi, Age 75 Yrs. Occu.: Household
R/o Ward No.1, at Po.Karla, Tq.Chandur Rly. Dist.Amravati.
2. Yuvaraj Pramod Bhalavi, Age 08 Yrs. Occu.: Education
R/o Ward No.1, at Po.Karla, Tq.Chandur Rly. Dist.Amravati.
3. Mayur Pramod Bhalavi, Age 06 Yrs. Occu.: Education
R/o Ward No.1, at Po.Karla, Tq.Chandur Rly. Dist.Amravati.
(Appli.No.2 & 3 through their natural guardian Bakaramji Sakharamji Bhalawi being a grand father)
-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Pramod Bakaramji Bhalavi हे दिनांक 12.11.2025 रोजी **अंजनगांव बारी, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Vimal Bakaramji Bhalavi+2 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Vimal Bakaramji Bhalavi+2 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२१.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

शिक्का

वणी नगर परिषद, जि.यवतमाळ
(आरोग्य विभाग)

क्र./नपव/आवि/ई-निसु/तिसरी वेळ/१७९३/२०२६ दिनांक २५.११.२०२६

ई-निविदा सुचना (तिसरी वेळ)

मुख्याधिकारी नगर परिषद वणी, जि.यवतमाळ यांच्यावतीने खालील नमुद कामाकरीता १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने नोंदणीकृत असलेल्या/निविदेतील अटी व शर्तीमधील नमुद केल्याप्रमाणे आवश्यक पात्रता पूर्ण करणाऱ्या अनुभवी व पंजीबध्द कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची असून ई-निविदेची विस्तृत माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

कामाचे नांव	अंदाजपत्रकीय किंमत	ई-निविदा प्रपत्राची किंमत	अनामत रक्कम	कामाची मुदत
वणी नगर परिषद, आरोग्य विभाग अंतर्गत घरोघरी जावून घंटागाडी व ट्रॅक्टरद्वारे शहरातील विलगीकृत कचरा गोळा करुन घनकचरा व्यवस्थापन केंद्रावर पोहचविणे	८१३४२४१.५०	८२००	८२०००	कामाच्या आदेशापासून ६ महिने

सदर कामाचा सविस्तर ई-निविदा सूचना/तपशील, कामाच्या सर्व तारखा, अटी व शती तसेच पुढील सर्व कार्यवाही दि.२६.११.२०२६ पासून ते ०३.१२.२०२६ दु.०२.०० वाजेपर्यंत शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

स्वा/-
विद्या खेमराज आत्राम
अध्यक्षा
नगर परिषद, वणी

स्वा/-
राकेश लक्ष्मण बुग्गेवार
उपाध्यक्ष
नगर परिषद, वणी

स्वा/-
अनिल लाभचंद चिंडालिया
आरोग्य सभापती
नगर परिषद, वणी

स्वा/-
डा.सचिन शंकरराव गाडे
मुख्याधिकारी
नगर परिषद, वणी

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

संविधान दिनानिमित्त आकाशवाणीवर राज्यस्तरीय विशेष कार्यक्रम

अमरावती- भारतीय संविधान दिनानिमित्त आकाशवाणी अमरावती केंद्राच्या वतीने गुरुवार, २६ नोव्हेंबर रोजी 'ऐतिहासिक निवाड्यांचा घटनात्मक प्रवास' हा राज्यस्तरीय समन्वित विशेष कार्यक्रम प्रसारित करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून सकाळी ८.४० वाजता एकाच वेळी या कार्यक्रमाचे प्रसारण होणार आहे.भारतीय संविधानातील लोकशाही, स्वातंत्र्य,समता, न्याय व बंधुता या मूल्यांसह देशाच्या लोकशाहीला आकार देणाऱ्या महत्त्वपूर्ण ऐतिहासिक न्यायालयीन निवाड्यांचा आढावा या कार्यक्रमातून घेण्यात आला आहे. संविधानाची व्याप्ती,घटनात्मक मूल्ये आणि न्यायव्यवस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका यावरही प्रकाश टाकण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे निवेदन नितीन भट आणि अवंती मोरे यांनी केले असून,लेखन व सादरीकरण कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांचे आहे.हा कार्यक्रम आकाशवाणी अमरावतीच्या एफएम १०१.५ मेगाहर्ट्झवर तसेच महाराष्ट्रातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून ऐकता येणार आहे.या विशेष कार्यक्रमाचा श्रोत्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय रेडिओ श्रोता महासंघ, अमरावतीच्या वतीने करण्यात आले आहे.

श्री सच्चिदानंद खटेश्वर महाराज संस्थानात पुण्यतिथी महोत्सव उत्साहात

अंजनगाव बारी- श्री सच्चिदानंद खटेश्वर महाराज संस्थान,कोंडेश्वर रोड,अंजनगाव बारी येथे पुण्यतिथी महोत्सवानिमित्त सप्तअध्यायी पारायणाची सांगता तसेच २४ नोव्हेंबर रोजी कार्तिक पौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दहीहंडीचा कार्यक्रम पार पडला.तसेच गावातील भजनी मंडळ आणि महिला भजनी मंडळांनी भक्तिमय वातावरणात भजन सादर केले. कार्यक्रमाला गावकरी, प्रतिष्ठित व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. खटेश्वर महाराज यांनी तीर्थक्षेत्र कोंडेश्वर येथे तब्बल ५० वर्षे तपश्चर्या केली. गाई आणि कुत्र्यांप्रती त्यांना विशेष प्रेम होते. जोडमोह येथील त्यांच्या समाधीस्थळासह जोडमोह आणि कोंडेश्वर येथे जनावरांसाठी त्यांनी गोशाळांची व्यवस्था केली होती,असे सांगितले जाते.खटेश्वर महाराजांचे भक्त महाराष्ट्रासह इतर अनेक राज्यांत आहेत. दरवर्षी त्यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त समाधीस्थळी भाविकांची मोठी गर्दी होत असून, धार्मिक श्रद्धा आणि भक्तिभावाने हा उत्सव साजरा केला जातो.



राज्यातील १४१ लाख हेक्टरवरील पिके नष्ट

पुणे-राज्य सरकारने केंद्राकडे सादर केलेल्या सविस्तर अहवालात राज्यामधील १४१ लाख हेक्टरवरील शेती नष्ट झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच २६६ तालुक्यांमधील दुष्काळ गंभीर स्वरूपाचा असल्याचा निष्कर्ष याच अहवालात देण्यात आला आहे.

महसूल विभागातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले, की ३७ हजार गावांमध्ये दुष्काळी स्थिती आहे. दुष्काळाची तीव्रता शास्त्रोक्त पद्धतीने ठरविण्यासाठी राज्यव्यापी सत्यापन प्रक्रिया राबविण्यात आली होती. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कृषी विभागाच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध यंत्रणांनी केलेल्या सत्यापनाचे अंतिम निष्कर्ष पाहूनच अंतिम अहवाल तयार करण्यात आला. त्याआधारे राज्य सरकारने केंद्राला दुष्काळग्रस्तांच्या मदतीचे ज्ञापन (मेमोरेंडम) पाठवले आहे. ३३ तालुक्यांमधील दुष्काळ 'मध्यम' तर चार तालुक्यांमधील दुष्काळाची श्रेणी 'सामान्य' असल्याचे अहवालात म्हटले आहे. ही श्रेणी निश्चित करण्यापूर्वी सर्व दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमधील निवडक चार हजार गावांमधील पीक परिस्थिती विचारात घेण्यात आली आहे.

या अहवालानुसार राज्याचा २०२६ चा बहुतांश खरीप हंगाम बागात वाया गेला आहे. खरिपाचे एकूण सरासरी क्षेत्र १४४ लाख ३६ हजार हेक्टर आहे. शेतकऱ्यांनी त्यापैकी १४० लाख २६ हजार हेक्टरवर अन्नधान्य पिकांचा पेरा केला होता. बहुतेक सर्व जिल्ह्यांमधील पिके वाया गेलेली आहेत. 'दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील सर्व पिकांखालील (ऊस, भाजीपाला, फळपिके, चारापिके, फुलपिकांसह) एकूण क्षेत्र १६२ लाख ३३ हजार हेक्टर होते. यातील १४१ लाख ५३ हजार हेक्टरवरील पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. म्हणजेच या क्षेत्रातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी लागणार आहे. त्यासाठी एकूण १५ हजार ३८६ कोटी रुपयांच्या निधीची मागणी या अहवालात करण्यात आली आहे. बाधित क्षेत्रामध्ये सातारा, नांदेड, बीड, सोलापूर व अमरावती या पाच जिल्ह्यांचे क्षेत्र सर्वाधिक आहे. तसेच, शेतकऱ्यांसाठी सर्वात जास्त निधीची मागणी सोलापूर, नांदेड, बीड, अहिल्यानगर व अमरावती या जिल्ह्यांसाठी करण्यात आली.

राज्यातील दुष्काळग्रस्त भागाची स्थिती व अपेक्षित मदत निधी या बाबत राज्याने पाठवलेल्या अहवालाची केंद्र शासनाच्या पातळीवर छाननी सुरू आहे. मदत वाटपाबाबत लवकरच सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे.

सूरज मांढरे, कृषी आयुक्त

बाधित शेतकऱ्यांचे क्षेत्र आणि मदतीसाठी मागितलेला निधी

पिकाचा प्रकार	अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे बाधित क्षेत्र व मदतीसाठी मागितलेला निधी (कंसात)	बहुभूधारक शेतकऱ्यांचे बाधित क्षेत्र व मागितलेला निधी (कंसात)	एकूण बाधित क्षेत्र व एकूण मागितलेला मदत निधी (कंसात), (बाधित क्षेत्र हेक्टरमध्ये तसेच निधीचे आकडे कोटी रुपयांमध्ये)
जिरायती पिके	८७,५३,१७७.६४ (७,४४०.२०)	१९,०१,३७२.७४ (१,६१६.१७)	१,०६,५४,५५०.३८ (९,०५६.३७)
बागायती पिके	२४,१४,०६७.२४ (४,१०३.९१)	३,९१,००३.३४ (६६४.७१)	२८,०५,०७०.५८ (४,७६८.६२)
बहुवार्षिक पिके	६,०२,६२५.७२ (१,३५५.९१)	९१,२४२.२३ (२०५.३०)	६,९३,८६७.९५ (१,५६१.२०)
एकूण	१,१७,६९,८७०.६० (१२,९००.०२)	२३,८३,६१८.३१ (२,४८६.१७)	१,४१,५३,४८८.९१ (१५,३८६.१९)

अशी आहे दुष्काळी तालुक्यांची स्थिती

जिल्हा	दुष्काळबाधित तालुके	बाधित क्षेत्र (हेक्टरमध्ये)	मागणी केलेला निधी (कोटी रुपयांमध्ये)
पालघर	३	२८२१०.६०	२३.१५
रायगड	७	४६५.२६	०.४०
रत्नागिरा	६	१७८८.०९	८.३३
सिंधुदुर्ग	८	२८६९६.७८	२२.२५
नाशिक	१३	६४८८६.६६	४६४.८०
धुळे	४	३८६७५७.३४	४३६.३८
नंदुरबार	६	३०४६४५.४२	३४४.१९
जळगाव	१५	६४५४०२.४०	७१०.५१
अहिल्यानगर	१४	६१९९९६.९६	७३५.०६
पुणे	१०	३९८००८.०७	४६७.९९
सोलापूर	११	८०२३५३.१३	११६०.४७
सातारा	११	९८२३५६.२०	२२०.९९
सांगली	१०	२८५५६२.९१	४९१.२१
कोल्हापूर	८	५१३१०.८७	८३.७०
छत्रपती संभाजीनगर	९	७०४२५७.५३	६००.९८
जालना	८	६५४६३७.४४	६४८.४६
बीड	११	८६२२८२.९१	८२८.२३
लातूर	१०	६३४२८५.४८	६०८.३५
धाराशिव	८	५५७९२४.६७	४८४.६९
नांदेड	१४	९३१०९५.७४	८६८.४५
परभणी	९	५५९३७०.००	५१८.३०
हिंगोली	४	३९४५८१.८०	३९१.१२
बुलडाणा	१३	३७६८२९.७२	६४६.०९
अकोला	७	३६०९८३.३४	३४२.२०
वाशीम	६	३८६४८०.९६	३७०.३४
अमरावता	१४	७७१९६०.००	७३४.४४
यवतमाळ	१६	७०६७९१.८३	७०६.०५
वर्धा	८	३०३०८७.६८	२९६.४८
नागपूर	१४	३९०४३७.४८	४३८.६९
भंडारा	४	१०७२८.४४	१३३.२५
गोंदिया	८	३९४६८.२७	४९.६९
चंद्रपूर	१४	४३३०२९.३३	३७१.८०
गडचिरोली	२	४५४८०.२९	५१.६१
एकूण	३०४	१४१५३४८८.९१	१५३८६.१९

सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयात 'विकसित भारतासाठी क्वांटम तंत्रज्ञान' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा

अमरावती/ का.प्र.



सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र अभियांत्रिकी विभागाच्या वतीने AICTE-VAANI (भारतीय भाषांच्या संवर्धन व विकासासाठी उपक्रम) अंतर्गत विकसित भारतासाठी क्वांटम तंत्रज्ञान या विषयावर ३ दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचे मुख्य उद्देश प्राध्यापक,संशोधक आणि विद्यार्थ्यांना क्वांटम कंप्युटिंग, क्वांटम कम्युनिकेशन, सायबर सुरक्षा,कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग आणि ब्लॉकचेन ह्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे,संशोधनाला प्रोत्साहन देणे, भारतीय भाषांमध्ये तांत्रिक शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून हिंदी माध्यमातून कार्यशाळा नियोजित करण्यात आली.कार्यशाळेकरिता कुमार गौतम (NIT दिल्ली),जयेश पाराशर (इंदूर) विशाल चंदे (इंदूर) आणि डॉ.तपन कुमार जैन (IIIT नागपूर) आणि डॉ.सतीश सोलंके (विद्यावर्धिनी कॉलेज, पालघर) ह्या तज्ञ मार्गदर्शकांचा समावेश होता. ह्या तज्ञांनी क्वांटम तंत्रज्ञानाच्या मूलभूत संकल्पना क्वांटम कंप्युटिंग, क्वांटम मशीन लर्निंग, क्वांटम कम्युनिकेशन, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच आरोग्य क्षेत्रातील क्वांटम तंत्रज्ञानाचे उपयोग यावर सखोल मार्गदर्शन दिले. वरील कार्यशाळेकरिता संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता व प्राचार्य डॉ.संजय खेरडे (कार्यशाळेचे अध्यक्ष) ह्यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. संगणक शास्त्र अभियांत्रिकी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. विजया शांडिल्य ह्यांनी संयोजिका म्हणून जबाबदारी सांभाळली. सल्लगार समिती मध्ये डॉ.शीतल धांडे,डॉ. आशिष बर्डेकर,डॉ. केतकी इंगोले ह्यांचा समावेश होता. डॉ. सीमा राठोड कार्यशाळा समन्वयक आणि डॉ. हर्षा गुल्हाने सहसमन्वयक ह्यांनी योग्य रित्या नियोजन करून कार्यशाळा यशस्वी आयोजित केली. विकसित भारत २०४७ च्या संकल्प पूर्ततेसाठी अश्या तांत्रिक आणि संशोधनाभिमुख उपक्रमाचे अनन्य साधारण महत्व असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले. आयोजकांनी सर्व तज्ञ मार्गदर्शक, मान्यवर आणि सहभागींचे योगदानात करिता आभार मानले.

विठ्ठल-रुख्मिणीच्या जयघोषात रिंगण, फुगडी आणि भजनांचा उत्साह

अंजनगाव बारी/ वार्ताहर

श्री विदर्भ कन्या आई रुख्मिणीमाता पालखी पायदळ दिंडी सोहळा श्री क्षेत्र बडनेरा ते श्री क्षेत्र कौंडण्यपूर या मार्गावर सुरू असून, या पालखीचे एकादशीच्या पावन पर्वावर मासोद येथील गिरीश हरिश्चंद्र चौधरी यांच्या निवासस्थानी आगमन झाले. यावेळी पालखीचे ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात व भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

यावेळी महिला व पुरुषांनी फुगडी खेळत,भजन आणि विठ्ठल-रुख्मिणीच्या जयघोषात भक्तिरसाचा आनंद घेतला. संपूर्ण गावात उत्साह,आनंद आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले. या संपूर्ण सोहळ्याच्या स्वागत व आयोजनासाठी,पालखी निघते अशा सुचिता अनिल वणवे, गिरीश चौधरी शुभम मसराम,अक्षय कुंभरे,नितीन बावणे,शैलेश तलहांडे,आकाश सयाम, आकाश गवळी, वेदांत बोरकर,रोहित कातलाम, कार्तिक कटलाम,जयश्री गिरीश चौधरी, हरीष चौधरी,सोनाली चौधरी, वैभव नंदनवर, समर्थ बोरकर,खंदारे बंधू,केवतकर बंधू, गवळी बंधू, अभिषेक उमप,सोनू पाठक, आशिष धर्माल, अविनाश मसराम, अविनाश मालठाणे, चांभारे बंधू, कालबाडे बंधू,संजय गावडे यांच्यासह गावातील महिला मंडळ, पुरुष मंडळ, भजन मंडळ, गणेश मंडळ, दुर्गादेवी मंडळ, युवक मंडळी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभाग घेतला.गावकऱ्यांच्या एकजुटीने आणि सामूहिक सहकार्याने पार पडलेल्या या पालखी सोहळ्याने मासोद गावात भक्ती, परंपरा आणि सामाजिक एकतेचा सुंदर संदेश दिला.

पोलिसांकडून आदर्श गणेश व दुर्गोत्सव मंडळांचा गौरव



अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी

गणेशोत्सव आणि दुर्गोत्सव हे केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक बांधिलकी जपणारे उत्सव ठरावेत, या उद्देशाने यंदाच्या उत्सवात विविध मंडळांनी राबविलेल्या विशेष उपक्रमांची अमरावती ग्रामीण पोलिसांनी दखल घेतली. विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांचा वापर, शिस्तबद्ध आयोजन तसेच सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आदर्श निर्माण करणाऱ्या गणेशोत्सव व दुर्गोत्सव मंडळांचा अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन येथे प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हुड यांच्या देखरेखीखाली अंजनगाव सुर्जी, रहिमापूर चिंचोली, पथ्रोट पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील आदर्श गणेशोत्सव व दुर्गोत्सव मंडळांसाठी हा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हुड, अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सूरज बोंडे, संबंधित पोलीस ठाण्यांचे ठाणेदार अभय चौथनकर व प्रशांत देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर भास्कर, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशाली काळे, पोलीस निरीक्षक अनिल चांदोरे, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनवणे तसेच नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हुड यांनी गणेशोत्सव व दुर्गोत्सव मंडळांनी विसर्जन मिरवणुकीदरम्यान पारंपरिक वाद्यांचा वापर करून सांस्कृतिक परंपरेचे जतन केल्याबद्दल विशेष कौतुक केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की,गणेश व दुर्गा उत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक उपक्रम राबविल्याने एक नवीन संदेश घराघरात पोहोचला जातो.पोलीस प्रशासनाच्या या उपक्रमामुळे आगामी काळात उत्सव अधिक शिस्तबद्ध, संस्कृती जपणारे आणि समाजोपयोगी ठरतील,असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

चिंचोली पोलीस स्टेशन अंतर्गत सन्मानित मंडळे
तिसरा क्रमांक : बाल गणेश मंडळ, सैदापूर
दुसरा क्रमांक : बळीराजा गणेश मंडळ अभिनंदन, रत्नापूर
प्रथम क्रमांक : नीलकंठ गणेश मंडळ, सातेगाव

पथ्रोट पोलीस स्टेशन अंतर्गत सन्मानित मंडळे
तिसरा क्रमांक : हनुमान गणेश मंडळ, परसापूर
दुसरा क्रमांक : बाल सर्वोदय गणेश मंडळ, खामजनानगर
प्रथम क्रमांक : आझाद हिंद गणेश मंडळ, रासेगाव

अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन अंतर्गत सन्मानित मंडळे
तिसरा क्रमांक : विदर्भ गणेशोत्सव मंडळ, शनिवारा, अंजनगाव
दुसरा क्रमांक : न्यू विश्वहिंद गणेश व क्रीडा मंडळ, सुर्जी, अंजनगाव
प्रथम क्रमांक : बाल गोपाल गणेश मंडळ, पांढरी खानमपूरे

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ एसआयआर

२८ आणि २९ नोव्हेंबरला अमरावती जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबिर

चांदूररेल्वे/ वार्ताहर

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ०१ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आयोगाच्या १७ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या सुधारित आदेशानुसार या कार्यक्रमास मुदतवाढ देण्यात आली असून, अनुपस्थित / स्थलांतरित / मृत / दुबार (ASDD) मतदारांकरिता गणना प्रपत्र (Enumeration Form) उपलब्ध करून देण्यात आले आहे.या गणना प्रपत्रावर करावयाच्या कार्यवाहीकरिता वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

अनुपस्थित / स्थलांतरित / मृत / दुबार (ASDD) मतदारांना आपली नावे मतदार यादीत नोंदविण्याकरिता गणना प्रपत्र (Enumeration Form) दाखल करणे सुलभ व्हावे यासाठी शनिवार दि. २८ते २९नोव्हेंबर या दिवशी सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार अमरावती जिल्ह्यातील सर्व २७०४ मतदान केंद्रावर मतदार नोंदणी करिता विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. शिबिरामध्ये सर्व मतदान केंद्रावर बी.एल.ओ. उपस्थित राहणार आहे.

अ.क्र.	कार्यवाही	कालावधी
१	गणना प्रपत्र तयार करणे व मुद्रित करणे	१८ डिसेंबर पर्यंत
२	गणना प्रपत्राचे वितरण व संकलन	१८ ते ३० नोव्हेंबर
३	गणना प्रपत्र निकाली काढणे	१० डिसेंबर पर्यंत
अ.क्र.	**पुनरिक्षणाचे टप्पे**	**कालावधी**
१	नोटीस टप्पा / दावे व हरकतींचा निपटारा	३१ऑगस्ट ते १५डिसेंबर
२	अंतिम प्रकाशन	२२ डिसेंबर

नागरिकांना जाहीर आवाहन - अमरावती जिल्ह्यातील ३६ - धामणगाव रेल्वे, ३७ - बडनेरा, ३८ - अमरावती, ३९ - तिवसा, ४० - दर्यापूर, ४१ - मेळघाट, ४२ - अचलपूर आणि ४३ - मोर्शी या आठही विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांनी व अनुपस्थित / स्थलांतरित / मृत / दुबार (ASDD) मतदारांपैकी जे मतदार खरेखुरे मतदार असून काही कारणास्तव त्यांचे गणनापत्रक भरून गेले नसेल, त्यांचे गणनापत्रक व अशा मतदारांची गणना ASDD या वर्गवारीमध्ये झालेली असेल अशा मतदारांना गणनापत्रक भरून देणेकरिता मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबिराची पुन्हा एक संधी उपलब्ध झालेली असून अशा मतदारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे जाहीर आवाहन आशिष येरेकर (भा.प्र.से.) जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अमरावती यांनी केले आहे.

अमरावती ते शेगांव पायी वारीच्या रौप्य महोत्सवानिमित्त आ.खोडकेंनी नोंदवला सहभाग

अमरावती/ का.प्र.

संत गजानन महाराजांच्या जीवन चरित्रात घडलेल्या चमत्कारिक घटनांमुळेच भाविकभक्तांच्या अंतःकरणात त्यांच्याविषयी भक्ती आणि त्यांच्या उपदेश वचनाविषयी श्रद्धा निर्माण झाली. व त्या विलक्षण श्रद्धेमुळे सर्व भाविकभक्तांच्या मनात श्रद्धा,भक्ती, निष्ठा आणि सात्विकता अंकुरित होऊन ते आत्मोद्धाराच्या मार्गाने जीवनाची वाटचाल करू लागले आहे.असे प्रतिपादन आ.सुलभा खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा शेगांव स्थित ब्रह्मांडनायक संत श्री गजानन महाराज यांच्या दर्शनासाठी अमरावती ते शेगांव पायी वारीचे आयोजन करण्यात आले.आपल्या नियोजनबद्ध कार्यक्रम तालीकेनुसार मंगळवारी या पायी वारीला तपोवन परिसर स्थित स्वर्गीय श्री श्रीकांतरावजी कृष्णरावजी चावजी यांच्या निवास स्थानाहून पालखीचे प्रस्थान झाल्यावर सुरुवात झाली.पंचवटी चौक येथे या पालखीचे आगमन होताक्षणी आ.सुलभा खोडके व आ.संजय खोडके यांच्या हस्ते श्री गजानन महाराज माऊलींच्या प्रतिमेस नमन - वंदन - पूजन व माल्यार्पण करण्यात आले.यावेळी खोडके दाम्पत्यांचे



हस्ते संत गजानन महाराजांची आरती करण्यात आली.'गण गणात बोते ' चा नामजप करीत ही पायी वारी वाटचाल करीत असताना खोडके दाम्पत्यांनी या पायी वारीत सहभाग नोंदवला होता.तपोवन येथून सुरु झालेल्या अमरावती ते शेगांव वारी चे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे.मंगळवार २४ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर दरम्यान मार्गक्रमण करणाऱ्या या पायी वारीचा मार्ग पंचवटी कॉलनी, नवसारी,संत गाडगेबाबा वृद्धाश्रम,वलगाव, खारतळेगाव, धामोरी, म्हैसपूर फाटा, श्री काळा मारोती देवस्थान, शिंगणापूर-खोलापूर,आराळा, लखापूर, दर्यापूर, बाभळी टी पॉईंट, सांगळूद बस स्टॅन्ड, येवदा, वरुड (वुरलट) फाटा, वडनेरगंगाई, आकोट, लोहारी, मुंडगाव, पिदवड,निंभा फाटा या मार्गाने श्रीक्षेत्र शेगाव येथे जाणार आहे. पंचवटी चौक, अमरावती येथील श्रींच्या पालखी आगमन प्रसंगी आ.सुलभा खोडके, आ.संजय खोडके, नगरसेवक प्रमोद महल्ले, सारिका महल्ले, योगेश सवई, नगरसेवक - मीनल सवई, वंदना श्रीकांत चावजी, दिपक यादव, डॉ.प्रशांत गहुकार, सचिन मोहोड, दिगंबर पोफळी, गणेश घुलक्षे, राजेंद्र महल्ले, दिपक पैकीने, माधव राऊत, संदीप औशिकर आदिसह भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

कर्जाच्या विळख्यात अडकला बळीराजा

हतबल शेतकऱ्याने मुख्यमंत्र्यांकडे मागितली 'किडनी' विकण्याची परवानगी

-नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाटपूर येथील धक्कादायक प्रकार -कर्जमाफी, दुष्काळ निधी व पीक विमा रखडल्याने ओढवली वेळ

अमरावती/प्रतिनिधीः- बँका आणि खासगी कर्जाच्या वाढत्या डोंगराखाली दबलेल्या एका शेतकऱ्याने अखेर हतबल होऊन थेट स्वतःची किडनी विकण्याची परवानगी मागितली आहे. कर्जमाफी, दुष्काळ निधी आणि पीक विम्याचे पैसे अद्याप न मिळाल्याने कर्जाचा बोजा असह्य झालेल्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाटपूर येथील शेतकरी ह.भ.प. विठ्ठल महाराज घोरसाड यांनी हे टोकाचे पाऊल उचलले आहे. या संदर्भात त्यांनी बुधवारी (दि. २५) जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले आहे.

विठ्ठल महाराज घोरसाड हे कीर्तनकार व भागवतकार असून शेती हाच त्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून सततची नापिकी आणि दुष्काळामुळे शेतीतून काहीच उत्पन्न मिळाले नाही. त्यातच वडिलांचे दीर्घकालीन आजारपण आणि दोन मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी त्यांना बँकांसह खासगी व्यक्तींकडून कर्ज घ्यावे लागले. नियमित पीक विमा भरूनही नुकसान भरपाई मिळाली नसल्याने कर्जाचा हा विळखा अधिकच घट्ट झाला आहे.



वाढत्या कर्जामुळे यंदा घोरसाड कुटुंबाला दिवाळीही साजरी करता आली नाही. 'कर्जाच्या ओझ्यामुळे आता आत्महत्येशिवाय दुसरा कोणताही पर्याय समोर उरलेला नाही. शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी तसेच स्थानिक खासदार व आमदारांना मदत करण्यास सांगावे. अन्यथा, मला किडनी विकण्याची परवानगी द्यावी, जेणेकरून त्या पैशातून कर्ज फेडून कुटुंबासोबत दिवाळी साजरी करता येईल,' अशी आर्त व्यथा त्यांनी निवेदनातून मांडली आहे.

या घटनेमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांवरील कर्जाची दाहकता आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील दिरंगाईचे गंभीर वास्तव पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे.

अदानी समूहाचा जलविद्युत प्रकल्प रद्द करा



अमरावती/प्रतिनिधीः-

-संघर्ष समितीने दिला आंदोलनाचा इशारा

चिखलदरा तालुक्यातील आडनदी परिसरात अदानी समूहाचा १५०० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प उभारला जात आहे. प्रकल्पाचे कामही सुरू झाले आहे. हा प्रकल्प तातडीने रद्द करण्याची मागणी प्रकल्प विरोधी संघर्ष समन्वय समितीने केली आहे. अन्यथा लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याचा इशारा आज बुधवार २५ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत समितीच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी ॲड. बंड्या साने, सुनील घटाळे, सुशील डोले, अर्जुन युवनाते, किसन गन्नू अखंडे, सुंदर शालिकराम धिकार, बुडा राजू अखंडे, सुबोध जंगम आदी उपस्थित होते.

मेळघाटात अदानी समूहाच्या विविध प्रकल्पांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मेळघाट हा सातपुडा पर्वत रांगांमध्ये वसलेला समृद्ध व संवेदनशील वनप्रदेश आहे. येथे वाघ, बिबट्या, रानडुक्कर, अस्वल यांसारख्या वन्यप्राण्यांचे अधिवास आहे. २४० हेक्टरमध्ये पसरलेले घनदाट जंगल नष्ट केल्याने वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासावर व त्यांच्या भ्रमणावर गंभीर परिणाम होऊ शकतो. वृक्षतोड झाल्यास परिसरातील हवामान बदल व जलस्रोतांवरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.समितीचे म्हणणे आहे की, प्रकल्पासाठी सुमारे २४० हेक्टर वनक्षेत्र बाधित होऊन ☞(पान २ वर)

कोणार्कच्या स्वच्छता कंत्राटाची आयोग करणार चौकशी

-सदस्य रविकुमार कलोसे यांची घोषणा -मनपात ५० टक्के रिक्त पदांच्या भरतीचे आदेश

अमरावती/प्रतिनिधीः-



राष्ट्रीय स्वच्छता कामगार आयोगाचे सदस्य, राज्यमंत्री दर्जा प्राप्त रवि रामू कलोसे यांनी अमरावती महानगरपालिका आणि कोणार्क कंपनी यांच्यात झालेल्या स्वच्छता कंत्राटाची संपूर्ण माहिती आज बुधवार २५ नोव्हेंबर रोजी घेतली. याप्रकरणी सखोल चौकशी करून पुढील महिन्यात मनपाला संबंधित निर्देश देण्याची घोषणा केली. ते महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पत्रकारांशी बोलत होते. आयोग सदस्य कलोसे म्हणाले की, स्वच्छता कर्मचाऱ्यांना शासनाच्या अनेकानेक योजनांचा लाभ आतापर्यंत पोहोचला नाही, याकडे त्यांनी महापालिकेचे लक्ष वेधले. त्यांनी स्पष्ट केले की, खाजगी स्वरूपातही कोणी सेप्टिक टँक साफ करतो, ड्रेनेज साफ करतो, तर त्यालाही स्वच्छता कर्मचारी मानले जाईल आणि त्याला शासनाच्या योजनांचा सर्व लाभ देण्याचा प्रयत्न केला जाईल.कोणार्क कंपनी कंत्राटासाठी पात्र आहे की नाही, याचीही चौकशी करण्याची घोषणा त्यांनी केली. अमरावती महापालिकेत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे ६१९ पदे मंजूर आहेत, त्यापैकी १७२ पदे भरली आहेत. अशा स्थितीत ५० टक्के रिक्त पदांच्या भरतीचे निर्देश त्यांनी आज दिले आहेत. मेहतर वाल्मिकी समाजाच्याच कर्मचाऱ्यांची भरती होईल, यावरही त्यांनी भर दिला. स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिलेल्या☞(पान २ वर)

मेळघाटातील 'आडनदी' प्रकल्पाच्या सर्वेक्षणात गंभीर अटीभंग

-कामाची चौकशी करून परवानगी रद्द करा शिवसेना महानगर प्रमुख हरमकर यांची मागणी

अमरावती/प्रतिनिधी:



मेळघाटात चिखलदरा तालुक्यात प्रस्तावित असलेल्या अदानी समूहाच्या १५०० मेगावॅट क्षमतेच्या 'आडनदी पंड स्टोरेज प्रकल्पा'च्या सर्वेक्षण कामादरम्यान वनविभागाच्या अटी व शर्तींचा भंग होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची प्रत्यक्ष चौकशी करून परवानगी रद्द करावी, अशी मागणी शिवसेना अमरावती महानगर प्रमुख प्रवीण हरमकर यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अदानी हायड्रो एनर्जी टेन लिमिटेड या कंपनीला मेळघाट प्रादेशिक वन विभागामार्फत टोपोग्राफिकल सर्वेक्षण तसेच मर्यादित स्वरूपाचे जिओ-टेक्निकल काम (२४ बोअरहोल) करण्यास अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली होती. या परवानग्यांमध्ये कोणतीही वृक्षतोड न करणे, रस्ते तयार न करणे, अतिरिक्त खोदकाम न करणे आणि काम पूण☞(पान २ वर)

■ परवानगी पेक्षा अतिरिक्त खोलीवर ड्रिलिंग

परवानगीपेक्षा अधिक खोलीपर्यंत ड्रिलिंग सुरू असल्याचा स्थानिकांचा दावा असून झाडांवर खुणा करणे व झाडे तोडल्याच्या तक्रारी आहेत. तसेच ग्रामसभेची संमती, जनसुनावणी आणि पर्यावरण परिणाम मूल्यांकन (EIA) अहवाल सार्वजनिक न केल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. मेळघाटातील अनेक गावांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असताना कंपनीच्या कामाबाबत प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचा आक्षेपही नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणी घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी व पंचनामा करावा, अटीभंग आढळल्यास परवानगी रद्द करून संबंधित यंत्रणेवर कारवाई करावी, जनसुनावणी व सर्व आवश्यक परवानग्या पूर्ण होईपर्यंत काम थांबवावे आणि चौकशीचा लेखी अहवाल द्यावा, अशा मागण्या प्रवीण हरमकर यांनी केल्या आहेत.

लैंगिक अत्याचारप्रकरणातील मुख्य आरोपीला २० वर्षांची शिक्षा

-पोक्सो न्यायालयाचा निकाल; १६ साक्षीदारांची तपासणी, दुसऱ्या आरोपीची मुक्तता

अमरावती/प्रतिनिधीः- उन्हाळी कला-क्रीडा शिबिरात झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या प्रकरणात न्यायालयाने मुख्य आरोपीला २० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. राजेश अर्जुन थोरात (वय ३५, रा. मोर्शी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक २, अमरावती येथे २५ नोव्हेंबर रोजी हा निकाल देण्यात आला. याच प्रकरणातील दुसऱ्या आरोपीची पुराव्याअभावी संशयाचा फायदा देत मुक्तता करण्यात आली. सरकार पक्षाने न्यायालयात सादर केलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी २५ एप्रिल ते २२ मे २०२५ या कालावधीत चांदूर रेल्वे येथील नेहरू विद्यालयात आयोजित उन्हाळी कला-क्रीडा शिबिरात सहभागी झाली होती. या शिबिरात राजेश थोरात आणि देवेंद्र मेश्राम हे नृत्यकला व अन्य प्रशिक्षण देत होते. याच काळात आरोपींची मुलीशी ओळख झाली. राजेश थोरात मुलीला मोबाईलवर संदेश पाठवत असल्याचेही तपासात समोर आले. ११ मे २०२५ रोजी दुपारी मैत्रिणीकडे जात ☞(पान २ वर)



राजकमल रेल्वे उड्डाणपुलाच्या तोडकामासाठी वाहतूक बंद

२६ नोव्हेंबरपासून नवीन वाहतूक मार्ग लागू

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती-बडनेरा रेल्वे मार्गावरील राजकमल चौक, हमालपुरा, जयस्तंभ चौक आणि रेल्वे स्टेशन चौक यांना जोडणाऱ्या जुन्या रेल्वे उड्डाणपुलाच्या पाडकाम व पुढील बांधकामासाठी अमरावती शहर वाहतूक पोलिसांनी नवीन वाहतूक अधिसूचना जारी केली आहे. ही अधिसूचना गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून लागू होणार आहे. सन १९६३ मध्ये



सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत (सा.बा.वि.) बांधण्यात आलेल्या या उड्डाणपुलाचे आयुर्मान संपुष्टात आले असून संरचनात्मक लेखापरीक्षणानंतर पुलाची अवस्था धोकादायक असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानुसार दि. २५ ऑगस्ट २०२५ पासून या उड्डाणपुलावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली होती. आता महारेलमार्फत नियुक्त मे. टी. एन. टी. इन्फ्रा लि. या विकासकाकडून जुन्या पुलाचे पाडकाम, मलबा उचलणे आणि गर्डर लाँचिंगचे काम केले जाणार आहे. कोणतीही जीवितहानी किंवा अपघात होऊ नये म्हणून उड्डाणपुलासोबतच खालच्या बाजूने बेलपुरा व ☞(पान २ वर)

चांदूर रेल्वेच्या शेतशिवारात चोरट्यांचा धुमाकूळ

-पंधरा दिवसांत एकाच शेतकऱ्याच्या दोन पाणबुडी मोटारी चोरीला

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-



चांदूर रेल्वे परिसरातील शेतशिवारात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून शेतकऱ्यांच्या शेती उपयोगी साहित्याच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. चांदूर रेल्वे येथील शेतकरी विजय पुंडलिक गोखे यांच्या शेतातील मागील पंधरा दिवसांत लोबी कंपनीच्या दोन सबमर्सिबल पाणबुडी मोटारी चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे.

केवळ पाणबुडी मोटारीच नव्हे, तर मोटारीच्या केबल, स्प्रिंकलरचे पितळी नोझल, पाईप तसेच शेतीसाठी लागणारे इतर साहित्यही चोरट्यांकडून चोरले जात असल्याचे समोर येत आहे. शेतीच्या सिंचन व्यवस्थेसाठी आवश्यक असलेले साहित्य चोरीला जात असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून शेतीच्या कामांमध्येही अडथळे निर्माण होत आहेत. विशेष म्हणजे, अशा चोरीच्या ☞(पान २ वर)

धनंजय गंधे यांचे निधन

तिवसा/प्रतिनिधीः- येथील एका शेतकरी कुटुंबातील ३७ वर्षीय तरुणाचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान अचानक निधन झाले. धनंजय उर्फ रामकृष्ण गंधे (रा.होळकर चौक,तिवसा) असे त्या तरुणाचे नाव आहे.गेल्या काही दिवसांपासून तो एका आजाराशी लढत होता.मात्र यातच आज सकाळी त्याची प्राणज्योत मावळली. त्याच्या या अकस्मात निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.त्याच्या मृत्यू पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.



महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांचा संप मागे



अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी-कामगार संघटनेच्या मागण्यांसाठी सुरू असलेला संप आज (दि.२५) अखेर मागे घेण्यात आला. महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी कर्मचारी व कामगार संघटनेच्या पदाधिका-यांशी समन्वय साधून त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत आश्वासन दिले. त्यानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपला संप मागे घेण्याचा निर्णय घेतला.

आज अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संप मागे घेत कामकाज पूर्ववत सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी ☞(पान २ वर)

फ्लॅटमधील कुंटणखान्याचा पर्दाफाश

तीन महिला ताब्यात, गुन्हे शाखेची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः-



फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रसाद कॉलनी परिसरात असलेल्या एका फ्लॅटमधील कुंटणखान्याचा पर्दाफाश झाला. संबंधित फ्लॅटवर यापूर्वी दोन वेळा कारवाई झाल्याची माहिती असताना पोलिसांनी पुन्हा छापा टाकला. या कारवाईत तीन महिलांना ताब्यात घेण्यात आले आहे.

शहरातील प्रतिष्ठित रहिवासी परिसर म्हणून प्रसाद कॉलनीची ओळख आहे. अशा भागातील एका फ्लॅटमध्ये कथित अवैध व्यवसाय सुरू असल्याची चर्चा परिसरात होती. स्थानिक रहिवाशांना यामुळे त्रास होत असल्याच्या तक्रारीही समोर येत असल्याचे सांगितले जाते. या माहितीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी संबंधित ठिकाणी कारवाई केली. पोलीसांना फ्लॅटमध्ये तीन महीला आढळून आल्या असून, त्यापैकी एक महीला ही एका तरुणीकडून वेश्या व्यवसाय करून घेत होती. तर तीच्यासोबत एक मैत्रीण सुध्दा होती. ताब्यात घेतलेल्या महिलांपैकी एक☞(पान २ वर)

कारची दुचाकीला धडक,पति- पत्नी ठार

-जळका फाट्याजवळ भीषण अपघात

यवतमाळ/प्रतिनिधीः- वणी-यवतमाळ राज्य मार्गावरील जळका फाटा येथे भरधाव कारची दुचाकीला धडक बसून झालेल्या भीषण अपघातात पती-पत्नी ठार झाले. ही हृदयद्रावक दुर्घटना आज बुधवार २५ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास घडली. बंडू बन्सी सिडाम (वय ५३) व सविता बंडू सिडाम (वय ४५) अशी मृतांची नावे आहेत. हे दाम्पत्य वणी तालुक्यातील वांजरी या गावचे रहिवासी आहेत. अपघाता नंतर घटनास्थळी ☞(पान २ वर)



नामदेवराव दारोकार यांचे निधन

कुऱ्हा/प्रतिनिधीः-



येथील जय गुरूदेव प्रिंटिंग प्रेसचे संचालक राजेंद्र नामदेवराव दारोकार यांचे वडील नामदेवराव चिवाजी दारोकार यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुलं, तीन मुली, स्नुषा, जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा आहे.नामदेवराव दारोकार यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

श्रीक्षेत्र कौंडण्यपूर नगरी हरिनामाच्या गजराने दुमदुमली

कार्तिक मास सोहळ्याची दहीहंडी उत्साहात; हजारो भाविकांची उपस्थिती

कुऱ्हा/प्रतिनिधीः- जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठलच्या गजराने श्रीक्षेत्र कौंडण्यपूर नगरी भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेली. माता रुक्मिणीचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे नऊ दिवस





धार्मिक पर्वात दररोज पहाटे काकडा आरती, भजन, कीर्तन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विदर्भातील विविध संस्थांच्या पालख्या व वारकरी मंडळांचे आगमन झाल्याने कौंडण्यपूर नगरीला भक्तीमय स्वरूप प्राप्त झाले होते. गावातील प्रत्येक परिसर हरिनामाच्या गजराने भारावून गेला होता.

२५ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता हभप पंकज महाराज महल्ले यांच्या नेतृत्वात भव्य नगरप्रदक्षिणा काढण्यात आली. यामध्ये गावकरी, पंचक्रोशीतील वारकरी व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. संस्थेचे ☞(पान २ वर)

